पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद

१

उद्गीर प्रकरण

१७६०

[किंमत—१३ आणे किंवा १ शिलिंग ४ पेन्स]

संपादक—गो. स. सरदेसाई, बी. ए.

गव्हर्न्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई
१९३०

(या प्रकाशनांतील संपादकीय टीका व मतें यांजबद्दल कोणतीहि जबाबदारी सरकारावर नाहीं.)

00104161

श्री.

पौ छ ९ रबिलाखर

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामिचे सेवेसी.

विनंती सेवक बापूजी माहादेव व दामोदर माहादेव सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ २४ माहे सफर मुाा इंद्रप्रस्थ स्वामीचे कृपावलोकने येथास्थित असे विशेष. स्वामीकडील कृपापत्रे छ ९ जिल्हेजची सरकारच्या जोडीबराबर छ २० मोहरमी पावलीं. तेथें आज्ञा कीं, नादरशाहाकडील व दिलीच्या अमिराचें व हिंदुस्थानच्या राज्याचें वगैरे जें नवलविशेष वर्तमान येत जाईल तें लिहीत जाणें म्हणोन आज्ञा केली. यैसीयास पूर्वी नवाब उमदतुलमुलुक शांत जाले, तेव्हा मुजरद कासदांची जोडी सेवेसी राा केली; व येक जोडी दुसरीहि पाठविली. त्या दोही जोड्याबराबर या प्रांताचें साकल्य वृत्त लिहीले आहे. सेवेसी श्रुत जाले असेल. सांप्रत नादरशाहाकडील वर्तमान यैसे आहे कीं, याचा रुमवाल्याचा सल्लक जालियां हा स्वदेशास परतून आला. आपल्या मुलकाचा बंदोबस्त करून प्रस्तुत येकाच ठिकाणी काहीक दिवस छावणी करून राहिला आहे. मिर्जा नसरुला पातशाहजादा व तहमासकुलीखां या दोघास काबुलेकडे मार्गस्त केले. महमदशाहास व नवाब वजीर व नवाब मनसूर अलीखान यांस पत्रें पाठविली आहेत, जे मजला हिंदुस्थानातून येऊन आठ नव वर्षे जालीं. अद्याप तुम्ही स्वदेशाचा कांहीं बंदोबस्त केला नाहीं. परस्परें यैकतों जे, चाकर कोण्ही चाकरीच्या मार्गें वर्तत नाहींत, आपलाले ठिकाणीं खावंद होऊन राहिले आहेत. याकरितां मुलकांत गनिमाचा गलबला विशेष आहे. म्या इतकी तुम्हांस ताकीद केली असतां तुम्हीं मुलकाच्या बंदोबस्ताचा काहींहि प्रेत्न न केला. मजसारखा पक्षपाती असतां, सर्व प्रकारें मी तुम्हास अनकूल असतां, आज तुम्ही आपले पातशाहीचा बंदोबस्त न कराल तर कधीं करणार? अद्यापहि कांहीं गेले नाहीं. दोन दिवस सुखावर मन न ठेवितां मिरजा नसरला व तहमासकुलीखांनास पंचविसा हजारा स्वारानसी काबुलेहून बोलाऊन घेणें व स्वंता तुम्ही बाहेर निघून हे व तुम्हीं दोन वर्षेपर्यंत श्रम करून दक्षण हिंदुस्थानचा बंदोबस्त करणें. माझी गरज असालियां मीहि तयारच

आहे आणीख फौज लागेल तर पाठवीन. यैसी बहूत दीलगरीनें[1] पत्रें आलीं. पा(तशा)ह वजीर सफदरजंग, राजे अफजूखां, येह्याखां, मिरमुनसी यानी लाल बागांत येकांत केला. च्यार घटकापर्यंत परस्परे जाबसाल बहूत समाधान पावले. अवीच तर नादरशाह येकवचनी. जो यांसी करार केला त्यांत अंतराये तिलतुल्य केला नाहीं. आतांहि बंदोबस्त करूं इछितील तर साहित्य करावयास सिध आहेत. येवंच या प्रकारची पत्रें आलीं याकरितां समाधान पावले. अद्याप उत्तरें लिहीलीं नाहींत. पाहावें काये लिहीतात. दुसरें उमदुलमुलकाच्या जागिरा व तालुके कूल पातशाहजादियास जाले. अमीरखानाचे कदीम अमील होते. तूर्त त्याजवरच बहाल ठेविले आहे. सरदारानी माधोसिंगास च्यार परगणे, टोंक, तोडा, मालपुरा, नेवाई अठरा लाखाची जागा, माधोसिंगासी मुकरर करून राजश्री खंडेराव होलकर यासी राणाजीकडे पाठविले; आणि रा. गोविंदराव तमाजी यांसी सरदारानी लिहीलें कीं, रा. निबाजी खाटके व रामराव मुनसी ईश्वरसिंगासमीप मार्गस्थ केले आहे. ते सांगतील त्याप्रमाणें ईश्वरसिंगास समजाऊन माधोसिंगास जागा देवणें. खावंदाची मरजी या प्रा ठैराव जाला. हें वर्तमान ईश्वरसिंगास कलले. ते समई सेखावंताचा याचा कलह होता. हे वर्तमान पावतांच सिवसिंगासी सलूक केला. व त्यास आपले रफीकें[2] केलें. कूल रा(ज्या)तील रजपूत जमा केले, व नवी फौज निगादास्त मांडली. राणाजीनी येक फौज भारतसिंगासांगाते देऊन जाजपुराकडे पाठविलें, व कोटेवाला व शाहापुरेवाला वगैरे यानी आपलाले जागां तयारी केली आहे. राणाजीहि मागून सिधता करून निघणार. हे वर्तमान यैकून ईश्वरसिंगानी राये नरायेणदासजीस भारी फौज समागमें देऊन पुढें पाठविलें; व त्या मागून कोठेवाला वगैरे याच्या मुकाबल्यावर राजामलजीस पाठवणार होते; व राणाजी निघाले तर त्याच्या मुकाबल्यावर स्वता ईश्वरसिंगानी निघावें, हे तजवीज ठैरली. इतक्यांत छ ९ सफरीं सोमवारी राजामलजीस देवअज्ञा जाली. ईश्वरसिंगास व सवाई जैपुरात लाहाणमोठ्यास परम खेद जाला. बल्की तमाम हिंदुस्थानास मलजीचा मातम[3] जाला. मोठा कर्ता माणूस होता. ईश्वरइछेस उपाये नाहीं. जे होणे ते तो जालें. तथापि ईश्वरसिंगाची वासना मुकलॅस[4] सरदाराच्या नेमणुकी प्रा माधोसिंगास जागा द्यावीसी नाहीं. येक लडाई मारावी. प्रस्तुत भारतसिंग दाहा बारा हजारानसीं पुढें आला आहे. यास जोवर खंडेराव होलकर सामील जाले नाहींत तोवर जरब द्यावी. मग होता होईल तें पाहावें. यैसा याचा मनोगत आहे. यास्तव राये नरायेणदास भावाची

१ प्रेमानें. २ दोस्त.
३ शोक. ४ समजुतीनें.

मातम न करतां दर मजल चाललेच गेले. राणाजीच्या फौजेचा * * * (भातरसिंग) जीचा दो कोसाचा तफावत राहिला आहे. परस्परें दृष्टादृष्ट होते. पाहावें कैसा प्रसंग होतो. आभयेसिंगानी बख्तसिंगास लिहीलें होतें कीं राणाजी ईश्वरसिंगावर जातात. तुम्हासहि साहित्यविषई त्यांनीं पत्रें लिहीलीं आहेत. कुमक करणें उचीत आहे. त्यास अभयेसिंगाची वासना कीं, बख्तसिंगाने राणाजी-कडे जावें, व आपण बिकानेरचे राज्य घ्यावें; व बख्तसिंगाची हेत कीं, बिकानेरचे राज्य निमे आपण घ्यावे, व निमे अभयेसिंगानी घ्यावे. यैसा त्यांचा यांचा परस्परे मनोविकल्पसा आहे. मातुश्री गयाश्राध करून श्रीप्रयागास आली. प्रयागी मकरस्नान संपादिले. सिमगी पौर्णिमा करून देशास चालणार. बहुधा चालली असावीं. दोन जोड्या आमच्या प्रयागास गेल्या आहेत. आज उद्या येतील. सफदरजंगाचे दरबारी वर्तमान आले कीं, पुत्रासी अजुर्दा आहेत; म्हणून वाराणसीसच राहूं म्हणतात. हे गोष्ट नवाबानी आम्हास पुसली. आम्हीं विनंति केली कीं, हे गोष्ट फटकाल आहे. हें स्थलें येसी आहेत कीं, हिंदू होत असतां या स्थलास गेलियावरी क्षेत्रास सोडावे यैसा हेत होत नाहीं. यास्तव राहूं म्हटले असेल. या गोष्टीवर लोकानी जी लबाडी केली असेल या प्राा विनंती केली. यावरी निशा जाली. परंतु जागजागां * * * वर्तमान आहेत. तथ्य वर्तमान आलियां लिहून पाठऊ *सेवेसी श्रृत होय बहूत काय लिहिणें. कृपा केली पाहिजे, हे विनंती.

¶ *This is an important letter giving news of the Imperial Court to the Peshwa at Poona. It is sent by the Maratha agents Hingne brothers from Delhi. The letter of Nadirshah quoted in the report will convince the student how closely Ahmadshah Abdali followed the policy of Nadirshah.*

No. 2] [पौ. *5-4-1747*

श्री.

पो छ ९ रबिलाखर

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेसी.

विनंती उपरि उमदतुंनमुलुक[1] शांत जालियावर नवाब सफदरजंग याची मुसोहिबत[2] बहुत जाली. त्यास बेनुखालीफ यासी जोड केल्याखेरीज बंगालीयाचें काम कोणेप्रकारे होते? याकरितां पातशहास अर्ज केला कीं, नवाब सफदरजंग आम्हांसीं येकसुं असलियानें हजरतची उत्तमप्रकारें कामे होतील. नाहींतर

---

१ अमीरखान २५-१२-१७४६ ला खून जाहला. २ स्नेह.

यानीं येथें एक गोष्ट सांगितली. न कले, हजरतच्या ध्यानांत काय येईल ? म्हणजें पातशाही कामाचा डव्हेला[1] होईल. त्यावरून पातशहा बोलले की, सफदरजगाच्या व बाळाजीरायाच्या दरमीयान मी आहे. याप्रमाणें बोलून सफदरजंगास पाई देव्हडीजवळ येकांती घेऊन सांगितले कीं, बाळाजीरायापासून मजला फारशी उमेद आहे. आणि ते सत्यवादी आहेत. याकरितां त्यासी तुम्हीं साफ राहून पातशाही काम कर्णे. सफदरजंगानी विनंती केली कीं, 'पहिल्यापासून माझी त्यांशी दुशमनी होती. हजूर आलियावर राव महादेव यांनीं बाळाजीरायाच्या माझ्या दरम्यान ईश्वर दिल्हा; त्याप्रमाणें म्याही दिल्हा. कधींही कोणास शपथ दिल्ही नव्हती, ते त्यांस दिल्ही. खज्याना लुटुन आणिला होता, तो राव महादेव यांच्या पुत्राजवळ दिल्हा. वकील सरदारांजवळ पाठविला. त्यासी वाराणसीची गोष्ट सांगितली. त्याजवरून मजला विशम वाटलें. अत:पर जे हजरतची मर्जी तेच मजला करणें.' या प्रमाणें बोलणे जालियावर दुसरे दिवशी पातशहानीं खालशाचे दिवाण नवाब यह्याखां यांसी सफदरजंगाकडे पाठविले. आणि आम्हासही आज्ञा केली. त्यावरून सफदरजंगाचे घरीं आम्ही गेलों. बहुतसें शिष्टाचारें बोलून सारांश हाच कीं ज्याप्रमाणें तुम्ही मसीं वर्ताल त्याप्रमाणें मी तुम्हांसी वर्तेन आणि नामकदूर[2] तुमचे कार्यास अंतर करणार नाहीं. याप्रमाणें जालियावर तनखा वगैरे ठरली. इतकियांत वाराणसीचे लिहिलें बलवंतसिंगाचे आलें कीं मातुश्रींनी[3] दसाराम जमीदार यासी कबिल्यासुद्धा घेऊन चालली; आणि आम्हास सांगुन पाठविलें कीं, यासीं अर्धे राज्य देणें, नाहींतर फौज उतरेल. यासी आम्ही दसारामास आणून यासी शिक्षा द्यावी तर हजरत वारंवार लिहीतात कीं, ते माझीच मातुश्री जाणून त्याचें साहित्य करणें. तुमची चार माणसे मारली तरी त्यास हरगीज[4] न बोलणें. कां कीं, माझ्या म्हटलियावर माझे घरांत आली. त्यासी कव्हावन जालिया आम्हास शब्द लागेल यैसी हजरतची ताकीद, आणि हे लोक ऐसी करितात की, हलक्याहून हलका असेल तेही ऐसे कर्म न करी. या प्रमाणें अर्जी बलवंडसिंगाची आली. ते वजिनेस[5] आम्हास दाखविली. आणि हसून बोलिले कीं, हे तुमची सत्यवादी भलेपण. तेव्हा आम्हीं विनंति केली कीं, मातुश्री या प्रमाणें करितील ऐसें नाहीं. बराबरचे लोकानी कर्म करून नाव याचे बदनाम केले. तरी नवाबानी बहुतच थोरपण केले. जमीदार आम्ही आणून देतो; परंतु या गोष्टीवर नवाबाची शुक्रगुजारीच[6] श्रीमंत करतील. याप्रमाणे जाले वर्तमान सेवेसी

---

१ बिघाड.
२ शक्ति आहे तों.
३ पेशव्याची आई काशीबाई.
४ बिलकूल.
५ मुद, हुबेहुब.
६ तारीफ.

लिहिलें असें. मातुश्रीस जमीदाराचा मजकुर लिहिला. त्याचे वर्तमान नवाब सफदरजंगास आले कीं, रा कृष्णराऊ[1] याणी कागद गंगाप्रवाह केले; आणि मन मानेसे बोलले. आम्ही तो मातुश्रीच्या तर्फेनें सागितलें कीं, दसाराम पटणे-कराच्या कैदेत होता. त्यानी बहुत मीनत केली. याकरितां आम्ही सोडविला. अत:पर आम्हासी त्यासी गरज नाहीं. नवाबानी आमचा बहुत अहेल[2] सोसून यात्रा उत्तम प्रकारे आमची केली. या गोष्टीची कोठपर्यंत शुक्रगुजारी करावी. याप्रमाणे जालें वर्तमान सेवेसी लिहिलें असें. बहुत काय लिहिणें. कृपा केली पाहिजे, हे विनंती.

¶*Letter of Peshwa's agent at the Emperor's Court communicating to him the favourable impression the Emperor had obtained of the Peshwa's doings. His mother Kashibai's pilgrimage gave some offence to Safdarjang.*

No. 3] [*8-3-1747*

श्री

पौ छ ६ रबीलाखर

श्रीमंत राजश्रीपंतप्रधान स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक बापुजी महादेव व दामोदर महादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ताा. छ ७ माहे रबिलावल मुाा इंद्रप्रस्थ स्वामीच्या कृपावलोकने यथास्थित असे विशेष. पुर्वी सरकारच्या जोडी बरोबर सविस्तर वर्तमान लिहून पाठविले आहे. पाऊन श्रुत होईल. सांप्रत सरदारांनीं स्वामीच्या आज्ञेप्रमाणे माधोसिंगास टोंक, तोडा, मालपुरा व नेवाई, हे चाऱ्ही परगणे नेमून बुंदी हाड्यास द्यावी व हाड्यानीं ईश्वरसिंगाची रफाकत[3] करावी; व सरकारचे पैसे द्यावे; व नेणवे, व समिधी, व करवार हे तिन्ही परगणे रावराजा व प्रतापसिंग यानी खावे. ऐसा तह करून राजश्री खंडेराव होळकर यांस हजारा स्वारानसी राणाजीकडे पाठविलें कीं; राणाजीची फौज सरदेवर आली आहे. ईश्वरसिंगानीहि आपली फौज त्याच्या मुकाबल्यावर पाठविली आहे. या दोही फौजेचे झुंज होऊन, यावे. ज्याप्रमाणें नेमणुक केली आहे त्याप्रमाणें वर्तवणें; व इकडे राजश्री रामराव मुनसी व निबाजी खाटके, बक्षिराम ऐसे त्रिवर्ग महाराजा ईश्वरसिंगापासी पाठविले कीं, यास समजाऊन चार गोष्टी उत्तमप्रकारें सांगून तहाप्रमाणें फैसल करून परस्परे सौरश्य करून देणे. त्यास रामराव वगैरे जयनगरास आले; व खंडेराव

---

१ चासकर काशीबाईचा भाऊ. २ आबाळ ? त्रास. ३ साहाय्य.

जाऊन राणाजींचे फौजेत शामील जाले. राणाजीची फौज सरदेवर आली. इकडून राये नारायेणदासजीहि भारी फौजे सुधां जाऊन पावले. परस्परें कोसा कोसाचे अंतर राहिलें. राणाजींचे कारभारी यांनीं आपल्याआपल्यांत स्नेहाचा ठैराव करून नारायणदास सडेच फौजेंतून जयपुरास आले; व त्याचे कारभारी त्यांजकडे गेले. नारायणदासाच्या ईश्वरसिंगाच्या मसलती उदंड जाल्या. रायजीनें उदंड समजाऊन सांगितलें कीं, मल्हारबाचा लेक येऊन मधें पडला आहे, झुंज करू नका म्हणतो, व सरदाराची मर्जी खामखा स्नेह करवावयावरच आहे. झुंज केलियानें राणाजींची तो काय कथा परंतु मराठ्यासीं विरुध वाढते. यासी विरुध करणे सलाह नाहीं. याकरितां सांप्रत सलाच करावा. त्याहीवर रजपुत कोण्ही तन[1] देत नाहींत. कोणाच्या भरवसीयावर हा प्रसंग कर्तव्य? ऐसे नानाप्रकारें रायजीनें समजाऊन सांगितलें. ईश्वरसिंग सहसा न मानी. म्हणो लागले कीं, राज्य प्राक्तनी असल्याचें भोगावें. नाहीतर अशानें काय होतें. जे होणार तें हो. येकदां झुंझ तो केले पाहिजे. राजामलजी मेले. विद्याधरजी खाटेवर पडला. रजपूत तन देत नाहीं. तुम्हीं सलाच्या गोष्टी सांगतां. तेव्हां राज्याचा भार माझ्या प्राक्तनास आला. अस्तु आतां मीच बाहेर निघतों. जें होणार असेल तें हो. यैसें बोलोन डेरे बाहेर केले. राजा बहुत दुरागृहांत पडला. व कोणेही प्रकारें संधी करीनासा जाणून राइजींनी लाइलाज झुंजतो हेच गोष्ट कबूल केली. तेव्हां राज्यानी रायेजीपासून मुचलका घेतला व सहज रायास लष्करां * * *

* * * *

¶ *This fragmentary letter of Hingne to the Peshwa from the Court of Delhi, gives news of the movements of Ishwarsingh, King of Jaipur, and the Marathas.*

No. 4] *[20-3-1747*

श्री.

पौ छ २१ रबिलाखर

श्रीमंत राजश्री पंत प्रधान.
स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक बापुजी महादेव व दामोदर महादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ता। छ १९ माहे रबिलावल मु॥ इंद्रप्रस्थ स्वामीचे कृपा अवलोकनेकरून स्वस्तक्षेम असे विशेष. इकडील साकल्य वर्तमान अजुरदार

---

१ तन देणें=पुढाकार घेणें.

जोडियांबरोबर लिहून पाठविले आहे, त्याजवरून विदित जाले असेल. सांप्रत राजश्री माहाराव दुरजनसाल कोट्याहून स्वार होऊन उदेपुरास गेले. तेथुन राणाजी व एकत्र होऊन आपल्या फौजेच्या पुस्तगेरमीवर[1] निघाले म्हणून वर्तमान आलें. त्याजवरून महाराज राजश्री ईश्वरसिंग यानीहि सवाई जैपुरीहून कूच केला. लोकांनीं बहुत मना केले. इतकी त्वरा करणें सला नाहीं. केवळ राणाजी येऊन निगृहावर पडले, ऐसे जाणावे, तेव्हांच कूच करावा, ऐसे उदंडानी म्हटलें. परंतु कोणाचेंहि नायकतां कूच करून दरकूच जाऊन आपलें फोजेत शामील जाले. चितांत आहे कीं, राणाजीचे फोजेस जक[2] दिधलीच आहे. हली जोपर्यंत राणाजी आपले फोजेत सामील जाले नाहींत तोंवर उरली फौज मारून घ्यावी, ऐसें चितांत आहे. कोटेवाला परतून येऊन कोट्यांत पावला. राणाजी मागती उदेपुरांत दाखल जाले म्हणतात. ईश्वरसिंगाच्या चितांत कीं राणा युध्यास नच ये तर त्याच्या मुलकांत स्वाऱ्या करून ते अजीज करावे. जेरीदाही[3] होत जातो. पहावे ईश्वर ईच्छा काय आहे, व कैसा प्रसंग पडतो. यद्यपि राजश्री खंडेराव होळकर याजपासीं समुदाय थोडा आहे, तथापि तितक्यानसीच त्यांनीं यांस आडत्रासास आणिलें. खाण्यापिण्याची परम मर्यादा जाली आहे. त्रृण धान्य बहुत महर्ग आहे. जैपुरकर तो केवल स्वपराक्रमेंच या कर्मास प्रवर्तले आहेत. व राणाजी तो केवळ स्वामीचे आश्रयावर या कर्मास प्रवर्तले, ऐसा आबालवृद्धीपर्यंत लौकीक जाला आहे. प्रांती जे आपण करतील तेच ईश्वर इच्छेनें होईल. पुर्वी पातशाहानी माहाबतजंगास[4] लिहिले होते कीं, बंगाल्याचा दारमदार बाळाजीरायाचे विद्यमानें राज्यासी जाला. तुम्ही खातरजमा राखून खजाना पाठऊन देणें. येथून कराराप्रमाणें बाळाजी-रायाचे रुो देवऊन ऐसा फर्मान गेला होता. त्याचें उत्तर आले कीं, हजरत या प्रमाणें लिहितात ; व बाळाजीराव याची पत्रें येतात कीं, जर रघोजी भोसले बंगाल्याकडे आलेच तरी सरदार फौजेसुधा तयार आहेत. तुमच्या कुमकेस येऊन पावतील व आम्हासहि रघोजीची पत्रें वरचेवर येतात कीं, मी येतो. तर हा बंदोबस्त कोणे प्रकारचा ? जर राज्यासीं चुकोता जाला तर रघोजी काय म्हणून येणार ? व बाळाजीराव ऐसे काय म्हणून लिहितात ? व हा संदेह अद्याप किमर्थ दूर होत नाहीं ? जोवर हा संदेह दूर जाला नाहीं तोवर माझ्यानेहि फौज दूर करवत नाहीं. व मुलुकही आबाद होत नाहीं. गंगेच्या कांठचा मुलुक तो वैराण. येथे एक कवडी उत्पन्न नाहीं. पल्याडील पाच रुो येतात

---

१ साहाय्य, उपराला.
२ जक = पराभव.
३ खडा.
४ अलिवर्दीखान.

ते फौजेस खर्चतात. खजाना कोठून येईल व कोठून पाठवावा? बरें यैसेहि असतां रघोजी अगर त्याची फौज या साली नच आली तर अखर सालपावेतों सिबंदी वजा जाऊन जो कांहीं ऐवज बाकी राहील तो हजूर रवाना करीन, ऐसे पत्र आले. यांत सारांश इतकाच कीं, जोपर्यंत रघोजीचा यावयाचा पुर्ता संदेह दूर जाला नाहीं, व मुलुक आबाद जाला नाहीं, तोंवर पुर्ता खजाना देवणार नाहीं. इतकें तात्पर्य दिसून आलें. त्यास येथून मागती ताँकीद गेली आहे कीं, क्षेपनिक्षेप रघोजी येतच नाहीं. तुम्ही फौज काशास ठिवतां? दूर करा व मुलकासही उत्तम प्रकारे कौलबेल देऊन पुरती वसाहत करा. दुश्चित किमर्थ राहतां? व खजाना झाडियानसी पाठवा. जर उणा अधीक येईल तर तितकाच उणा रुो बाळाजीरायास पावेल. त्याची तनखा तुम्हावर केली जाईल व सरकारचा जितका ऐवज राहील, त्याची सजावली[१] त्यासच सांगु. एवंच पुर्ता रुो जलद पाठऊन देणे, ऐसें धमकाऊन लिहीलें आहे. परंतु जोपर्यंत आपल्याकडून लिहिले गेले नाहीं, तोंवर त्याची खातरजमा कसी होते? जेटवड जवळ आली. जर या साली रघोजीचे अगर त्याचे फौजेचे निघणे होत नाहीं, हा निश्चय स्वामीस पुर्ता कळला असिला तर काय चिंता आहे? सलाह असलिया ज्याप्रमाणें हजरून लिहिलें आहे त्याप्रमाणें आपणहि लिहावे. नादरशहाकडील वर्तमान आलें कीं बगदादचा पातशा अहमदशा आहे, त्याच्या विद्यमानें रुमवाल्यासीं व नादरशाहासी सलुखा जाला. रुमेकडून खातरजमा जाली. इराणचा तो बंदोबस्त आहेच. दुरानेमधें कोण्ही कोण्ही थोडी बहुत लबाडी केली होती. त्यांच्या पारपत्यास्तव हिरात म्हणून दुराणचे शहर काबुलेपासून सतरा मजली आहे, तेथें नवरोजाकारणें म्हणजे छ ९ रबिलावलीं दाखल होणार होता. तेथुन सिकारपुराकडे म्हणजे अटकेपार दाऊद पोतऱ्याचा मुलूक आहे, त्याच्या व आणीख कोण्ही काबुलच्या जिल्ह्यांत पठाण आहेत, त्याच्या शासनास फौज पाठविणार. व गरज पडल्या हिरातेहून स्वताहि येऊन पावणार, ऐसे वर्तमान वरचेवर येऊन पावले. त्यास ऐसा जबरदस्त दोलक्षा

* * * * * * * *

तरतूद करून ऐसा वजिरानी अर्ज केला. त्यानंतर पातशहानीं फेरोजंगाकडे[२] पाहिलें. हे बोलले कीं, आसफजहापासी चालिस हजार फौज तो मुकरर बारमाही असते. काम पडल्यावर आणीखहि विजापुरी वगैरे दक्षणी तीस चालिस हजार स्वार जमा होऊ सकतात. एवंच सतर एंसी हजाराची तो भरती तयारच

---

१ तगादा. २ गाजी उद्दीन निजामुल्मुल्कचा वडील मुलगा.

जाणावी. याजवेगळे मऱ्हाठे तो कमबेश[१] लाख फौज आहे. हेहि असफजाहासी सलुख राखतात व त्यांच्या म्हटल्यात आहेत. समयास रफीक[२] होतील. आज्ञा जालिया त्यासहि लिहून पाठऊं. पातशहा बोलले कीं बरें ; वर्तमान तो लिहा ; व त्याची काय मसलहत ते लिहून आणवा. बहुधा फेरोजंगानें बापास लिहिले असेल. मग पातशहांनीं सफदरजंगाकडे पाहिलें. हे बोलले कीं, मजपासी जो खजाना व माल आहे तो हजरतच्या निसार[३] आहे. येथें व सुब्यांत व ठाण्यांत मिळोन चाळीस हजार स्वार मजपासीं मोजूद आहेत. समयास जो पैका आहे तोहि वेचून ज्यासमई हजरत * * उभे राहतील ते समई आपल्या जानमालासी तसदुक[४] होईन. फते देणे ईश्वराचे स्वाधीन आहे. त्याजमधें जर मऱ्हाठे माझे पुरते रफीक आणभाषपूर्वक होत असिले तर हजरतनी तसदी न करावी. मग मजला आणीख कोण्हाची गरज नाहीं. रजपूत वगैरे कोण्हीहि पाहिजेत नाही. एक फौज त्यांची व एक फौज माझी इतक्यानसीच जो प्रसंग पडेल तो समजून घेऊं. ऐसिया जी ही गोष्ट सांगितली, पातशहानी सर्वांची अनुमतें मात्र घेतलीं, कोण्हास कांही उतर दिधले नाही. परंतु नित्यानी च्यार च्यार सा सा घटका एकांत हाच मजकूर असतो. पातशहास कोण्हाचाहि भरवसा वाटत नाहीं. कांहीं अंधपुत्राचा मानितात ; परंतु समयास सलुक करायास लागतो त्याजपेक्षा काहीक अधिक आपल्याकडीलहि धावादावाची लढाई नादरशहाच्या तुल्य मानितात. अद्याप या गोष्टीचा सरवा (सराव ?) आम्हासी कोण्ही कांहीं सरवा (सराव ?) केला नाही. परंतु वजीर सफदरजंग, गाजुदीखां, राजे अफजुखां वगैरे जेव्हा याचे घरास जावें तेव्हां हे बोलतात कीं, जर नादरशहा दक्षणेस परभारें गेला तर तुमचे लोक काय करतील. जर इकडे आला तर तुम्ही काय तरतूद करून दाखवाल. आम्ही पृथक पृथक त्यासी हेच बोलतो की, जर तो परस्परें दक्षणेस येतो तर या गोष्टीची चिंता ईश्वर इच्छेने येथें कांहींच नाहीं. येका(ल)कीं काय प्रसंग होतो. यावत्शक्ति त्यास कोण्ही जिवें सोडावें असे तर नाहीं. मग नकळे. आयुष्य असालियां निघोन गेला तर नकले. जर हिंदुस्थानांत आला तर इकडील तरतूद तुमच्या विचाराचे स्वाधीन आहे. ज्या प्राा तुम्ही सांगाल त्या प्राा करतीलच करतील. सफदरजंग व वजीर बोलले कीं, तुम्ही आपल्या तरफेने बाळाजीरायांस लिहून त्यांची काय सला व ते याप्रसंगी कसकसी तरतूद करतील तेहि आणवा, ऐसें या उभयतांनीं सांगितलें. ऐसियास नादरशाह लक्ष वाटे तो न ये. कदाचित आला तर स्वामीचा काय विचार ? कांहीं तरतूद आपल्याकडून

---

१ मुकरर.   २ मदतनीस.

३ स्वाधीन.   ४ हजीर.

बनून येईल किंवा नाहीं. जर आली तर कोण्या प्रकारें, कोणत्या स्थळीं, किती फौजेनसीं, कोण्या करारावर, कसकसें चितांत असेल ते लिहून पाठविलें पाहिजे. कीं रोकडे पातशहास अर्ज करावयास जागा होईल; कीं तेहि याप्रमाणें बंदेगीस[1] हजर आहेत व याप्रमाणें तरतूद करूं इछितात. पातशहाचे मनांत विश्वासहि आहे कीं, जे मऱ्हाठे बोलतील ते करतील. तर आपला मनोदय काय तो लिहिला पाहिजे. सेवेसी श्रुत होय. बहुत काय लिहिणे. कृपा केली पाहिजे, हे विनंती.

¶ This letter giving details of the discussions in the Emperor's Court, shews how the Peshwa and his agents quietly worked themselves into the Emperor's favour and how he came to depend upon the Marathas in case of emergency. There is also a mention of a threatened invasion by Raghuji Bhosle into Bengal.

No. 5] *[3-5-1747*

श्री

पौ ३० जमादिलौवल.

श्रीमंत राजश्री......बापु स्वामीचे सेवेसी

पोष्य चिंतो कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी, येथील कूशल तागाईत छ ३ जमादिलौवल पर्यंत यथास्थित जाणोन स्वकीये कूशल लेखन आज्ञा करित असिलें पाहिजे. विशेष. माधोसिंग याची फौज राजसिंग घोडचढा व कर्नाराम व नंदलाल दिवाण व सुरतसिंग शिवब्रम्हपोता ऐसें तोफखाना ऱ्हेकले व सुतरनाळ व जिजाला व बाणाचे उंट यैसें जुंजाचें सामानासी हाडोती प्रांतांचीं ठाणीं उठविलीं. धुम फारच केली. ऐसें जाणोन राजश्री मल्हारजी होळकर आम्हास घेऊन निघाले. कूच दरकूच कोटे प्रांतास बारियासी आलों. आखेराम कोटेकर तोहि शामील जाला. दरकुच मांगरोळ प्रांत हाडोती येथें गांठ घातली. छ १ जमादिलौवलीं च्यार घटका मार्गाल दिवसापासून च्यार घटका रात्र पावेतों गोळागोळीचें युध्य जालें. उपरांत रात्र जाली तैसेंच घेरा घालून कंबरा बांधून घोड्यावर च्यार प्रहर रात्र उभेच राहिलों. छ २ जमादिलौवलीं जुंज प्रातःकाळापासून अस्तमान पावेतों जालें. कछव्याची तमाम फौज बुडविली. लुटुन पस्त केलें. मोठे मोठे पटाईत कछव्याकडील कामास आले. मोठें येश स्वामीस आलें. तमाम हिंदुस्थानांत नक्ष बसला. सरकार पागेस शेंसवाशें घोडे व उंटें आलीं. राजश्री सुभेदाराकडील व आम्हांकडील कांहींक लोक ठार पडले

---

[1] संवेस.

व जखमी जाले. घोडीं ठार पडलियाची याद मागून सेवेसी लिहून पाठउं. राजश्री मल्हारजी बावास डाव्या हाताच्या मनगटास गोळीची जखम लागली. चाटून गेली. हालकी जखम असें. ईश्वरें खैर केली. त्याची चिंता न करावी. राजसिंग घोडचढा व साळग्रामसा हे दोघे सरदार मातबर व मोठे पटाईत कछव्याचे मारले गेले. सेवेसी श्रुत होये. विशेष काय लिहिणें. कृपा लोभ असों दीजे, हें विनंती.

¶ Letters 5 and 6 contain a description of a pitched battle on 2nd May 1747 near Mangrol (in the territory of Bundi) between the brothers Ishwarsingh and Madhaosingh, two sons of Sawai Jaisingh, who were fighting for the throne of Jaipur. With the help of Malharrao Holkar and Jayappa Sinde, Ishwarsingh inflicted a crushing defeat on his brother. The affair is reported by one Chinto Krishna to Bapu.

No. 6] [*7-5-1747*

श्री.

छ ३ जमादिलाखर

श्रीमंत राजश्री......बापु स्वामीचे सेवेसी.

पोष्य चिंतो कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ ७ माहे जमादिलौवल पर्यंत येथास्थित जाणोन स्वामींनीं आपलें स्वकुशल लेखन आज्ञा करित असलें पाहिजे विशेष. आमचें वर्तमान तर अंतरवेद प्रांताहून उजेनसि आलों; पुढें देशास यावें तों हाडोतीं प्रांतें माधोसिंगाचे फौजेनें तमाम ठाणीं उठविलीं. धूम फार केली. त्याकरितां राजेश्री......सुभेदार यानी आम्हां समागमें * * * * कूच दरकूच मौजे मांगरोल प्रांत * * * * कछव्याचे फौजेस बारा कोस धा * * * * * * घातली. छ १ जमादिलौवलीं दिवस च्यार घटका * * * * * राहिला. त्यासमयीं गांठ पडली. युद्ध (च्यार) घटका रात्र पावेतों गोळागोळीचें जालें. उपरांत च्यार प्रहर रात्र पावेतों घोड्यावर बसलेच राहिलों. त्यास कछव्याची फौज राजसिंग घोडचढा * * * * व कनीराम व नंदलाल दिवान व सुरतसिंग शिवब्रह्मपोता येसें फौज दहा बारा हजार व तोफा, न्हेकले, जेजालाचे उट वगैरें प्यादे झुंजाचा सरंजाम सुद्धां होते. त्यास छ २ जमादिलौवली रविवारीं रुजू इंदुवारीं झुंज प्रातःकाळपासून अस्तमान पावेतों जालें. कछव्याची फौज दरोबस्त लुटून पस्त केली. तोफा, न्हेकले, घोडे, उंटें, हत्ती सर्व लुटून घेतली. माधोसिंगाचे (लोक) मोठे मोठे पटाईत कामास आले. कितीक ज * * * * * सांपडलें, शें दोनशें पळुन गेले. वरकड * * * * * * * विलीं. हिंदु-

स्थान प्रांतीं मोठा नक्ष जाला. मोठें येश स्वामीस आलें. सरकार पागेस घोंडीं शें सवारें आलीं व उटें आलीं व हत्ती येक आला. ईश्वरें मोठें येश दिल्हें. हत्ती कोटेकरास दिल्हा. कोटेकराचे लोक राजश्री अखेराम पचोली व जालमसिंग झाले, व धायेभाई वगैरें रजपुत दोन तीन हजार फौज होती; त्यांनीं स्वामी सेवेसी अंतर न केलें. आम्ही व राजश्री खानाजी जाधव, डाव्या बाजूस राजश्री सुभेदाराच्या होतों. शिंद्याच्या निशाणास शब्द लागों दिल्हा नाहीं. आपले बाजूस अवघ्याच्या आधीं उठावणी केली, स्वामी सेवेसी अंतर न केलें. श्रुत होये. सदैव पत्र पाठऊन परामृष करीत जावा. विशेष काय लिहिणें. कृपा लोभ असो दीजे, हे विनंती.......................

No. 7] [*1747*

श्रीशंकर.

साहेबाचे शेवेसी विनंती विज्ञापना यैसीजे. इकडील वर्तमान तरी फौजेचा मुक्काम मनोहरपुरा[1] संनिध आला. मुलुकास उपसर्ग बहुत होत आहे व दिवान कनिरामजीचीहि पत्रे आली कीं मर्जी हाती नाहीं. त्याजवरोन बहुत चिंतातूर जाली आहे. राजे कारभारी बहुत विचारात पडिले आहेत. याजवरी इभरत बहुत गोल्प[2] पडिली आहे. भट राजे सदासिवजी याजकडे आजी रात्री साहा घटका गेलो होतो; तो बहुत विचारात बैसले होते. इतकियांत राजे माधोसिंगजी याचे हुजूरचे बोलावणे, चोपदार जलद आला कीं, बहुत जलद बोलाविले आहे. तैसेच तातडीने हुजूर भटजी गेले. आम्हासी बोलिले कीं दिढा प्रहरा दरबारास जातो, तुम्ही येणे, इतके बोलोन हुजूर गेले. दबाव बहुत पडिला आहे. साहेबाचे प्रतापे करून सर्व कामाचा निर्गम करून सेवेसी येत असो. आज्ञापत्र येईल त्याप्रोंच वर्तनूक होईल. राजे माधोसिंगजी यांनीं सावधता बहुत करविली आहे. अमेरीची बंदोबस्ती उत्तम करविली. जमाव किल्यावर पाठवितात. गुम्मावक्षी याजला अमेरीस उतरावयासी पाठविले आहे. जागा जागा नाकेबंदी किल्लियाची व शहराची करितात. बरकंदाज ठेवितात. काली दो प्रहरा कबिला सर्व थोरले राणी देखील सर्व अमेरीस पाठविला. आपण सडे शहरात आहेत. आजि आशिर्वादास हुजूर भोजनग्रहात गेलो होतो. दोन घटका हुजूर होतो. बहुत विचारात राजे पडिले आहेत. हरसाहेजीस बोलावणे गेले आहे. त्याजपासी पाच सात हजार फौज आहे. दो चौ दिवसात तेहि दाखल होतील. आनखी

---

१ जयपुरच्या उ. ४० मैल. २ भारी.

हि तरतूद होते. परंतु त्याचा विचार सर्व साहेबास श्रुत आहे. दबाव सर्व प्रकारें उत्तम पडिला आहे. मर्जीप्रमाणें सर्व गोष्टी होईल. . उदईक जो विचार होईल, येथील प्रसंग जो ध्यानास येईल, ते सविस्तर लिहून साहेबाचे सेवेसी पाठवीत असो. विशेष काय लिहिणे. कृपा वृधीमान केली पाहिजे हे विज्ञापना. राजश्री सटवाजी राजाले (?) याचे कारकून वसुलाचे ताकिदीस दिवान कनिरामजी बराबर आले. ते येथेच आहे भटजीकडे जात असतात. श्रुत जाले पाहिजे हे विज्ञाप्ती.

¶ *This news-letter seems to be addressed to the Peshwa from the Maratha camp near Jaipur. It describes the great terror and anxiety the presence of the Maratha forces had created in the mind of Madhosing.*

No. 8] [*1-8-1747*

श्री

श्रीमंत राजश्री......भाऊ स्वामीचे सेवेसी.

विनंती सेवक कृष्णराव बापुजी साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता छ ५ रजब पावेतो यथास्थित असे विशेष. स्मरणपूर्वक कृपापत्र प्रविष्ट होऊन सनाथ जाहालो. ऐसेच सदैव कृपा करणार स्वामी समर्थ आहेत. नवल विशेष वर्तमान लिहिजेसें नाहीं. यात्रेदाखल येदाची मुलुख (गीरी) जाहाली. (दी) लीचे पातशाः नाचरागरंगामध्ये निमग्न आहेत. दुसरा नादरशाहाचा भाचा आदलशा म्हणून फौजेसह वर्तमान दिलीवर यावयाचे विचारें कंधारेस आला. पुढे काय होईल ते पाहावे. मजल दरमजल सेवेसी येतो. भेटी-अंती सविस्तर निवेदन होईल. कृपा करणार स्वामी समर्थ आहेत. बहूत काय लिहिणे हे विज्ञापना.

¶ *Krishnarao Bapuji (Parasnis ?) writes to Bhausaheb news from the Court of Delhi and news about the threatened invasion of Nadirshah.*

No. 9] [पौ. *21-4-1748*

श्री.

छ ३ जालेवल.

पु॥ तीर्थरूप राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी.

विनंती उपरी राजश्री बगाजीपंत यांचे पत्र छ १३ राखरचे छे २३ मिनहूस आपणास आले. त्या पत्रांतील मजकूर पातशाही वजीर व शाहाजादा व अमीर यांची व पठाणांची लढाई झाली. वजीर कामास आला. उभयपक्षी बहुत लोक

---

१ ११–४–१७४८.

मारले गेले. पातशाहाची फौज काईम राहिली. पठाणानीं सिकस्त खादली. हें साद्यंत वर्तमान आपण लिहिलें ते कळो आलें. राजश्रीस तुमचे विचारें आलें तर निवेदन करणे. नाहीतर पुसतील तेव्हां सांगणे, म्हणून स्वामीनी लिहिले. तर बऱ्हानपुराहून कासीद आले. त्यानी जबानी वर्तमान राजश्री स्वामीजवळ सांगितलें कीं, दिल्लीची पत्रें नवाबास आली. त्याचा मजकूर कीं, पातशाहाजादियाची व पठाणाची लढाई वरजोर जाली. वजीर कामास आला. दुतर्फा लोक फार मारले गेले. पठाणाचा मोड जाला. हे वर्तमान सांगितलें. दुसरें वर्तमान सांगितलें कीं श्रीमंत राजश्री पंत प्रधान दिलीस गेले. पातशाहाची मुलाजमत जाहली. पातशाहानी श्रीमंतास पुसिलें, तुमचे काय मुद्दे आहेत ते लेहून द्यावे. त्याजवरी श्रीमंतानीं उत्तर केले कीं, हजरतीची फत्ते जालियावर अर्ज करूं. आधी ज्या कार्यास आलों, ते फत्ते जाले म्हणजे आमचे कार्य होईल यैसा अर्ज केला. त्याजवरून पातशाहा बहुत खुषवख्त जाले. हे वर्तमान राजश्रीनी श्रवण केल्यावर आम्हास पुसिलें. तुम्हाकडे कांहीं वर्तमान आले की काय? त्याजवर आम्ही विनंती केली कीं कागदपत्र अद्यापि आला नाहीं. परंतु जबानी खबर याप्रमाणेंच आईकतो. त्याजवरी राजश्री बोलिले. प्रधान पंतानी पातशाहासी बहुत उत्तम समर्पक उत्तर केले. आम्ही सांगितल्याप्रमाणें दिलीस गेले. पातशाहा संतोषी जाले. उत्तम गोष्टी केली. तीर्थरूपांचा स्तव फारच केला. समाधान पावले. आम्ही उत्तर केले कीं साहेबाचे पुण्ये प्रतापे सर्व गोष्टी होतात. साहेबांची पूर्ण कृपा राजश्री प्रधान-पंतावर. तदनरूप त्याचींही पातशाहासी जाबसाल केला. या मजकुरावरून राजश्री बहुतच संतोष पावले. दोन तीन वेळ तीर्थरूपांचा स्तव केला. सांप्रत आपण वर्तमान लिहिलें हेहि राजश्री स्वामीस निवेदन करून: सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *New-letter sent from Delhi to Bhausaheb stating an account of the fight of the Emperor with Abdali, in which Vazir Kamruddin Khan was killed; and of the subsequent visit of the Peshwa to the Emperor who was highly pleased with the former's demeanour.*

No. 10] [*May 1748*

श्री.

पुरवणी श्रीमंत राजश्री......पंतप्रधान
स्वामीचे सेवसी.

विनंति. नवाब अमीरखान जिवंत असतां आम्ही राजा रघुनाथदास हैदर-कुलीखानी याचा पुत्र लाला नरसिंगदास नवाब मशारनिलेच्या विचारानरूप

बंगाल्यास पाठविला, तेव्हां महाब्रतजंगास[1] लिहिलें होतें जे पातशहाच्या आज्ञेप्रमाणें श्रीमंत स्वामीनी बंगाल्याच्या तहाची बोलीचाली राजश्री स्वामीसी ठीक करून राजश्री रघोजीबावांस बंगाल्यास जायाची मनाई पाठविली आहे. कदाचित आज्ञा उल्लंघन करून जाईल म्हणून वराडांत संत्रा लिगाडें त्याजभोंवतीं उभीं केलींत, व सरदारांस दोन तीन वार पत्रें पाठविलीं कीं, इतका प्रयत्न केला असतां कदाचित निघून बंगाल्याकडे चाललाच तर तुम्ही पटणे व गयाप्रांतीं आडवे होऊन तंबी करणें. त्यास श्रीमंतस्वामीच्या आज्ञेप्रमाणें सरदारानी तयारी केली. बुंधेलखंडाच्या सरदेवर आहेत. पटणे गयाप्रांती येतात. रकारनामक आला तर पारपत्य करतील. तुम्ही आपल्या नायबांस लिहून पाठवणे कीं, या फौजेचा कोण्हेहि गोष्टीचा संदेह न धरतां सुखरूप आपल्याले स्थलीं स्वस्थचितें राहात व पातशाही खजाना झाडियानसी पाठऊन देणेकीं कराराप्रमाणें पैका श्रीमंत-स्वामीचे विद्यमानें राजश्री स्वामीस पावे; व पुढें त्या मुलकाचा उपद्रव तुटे, येैसे आम्ही व अमिरखानानी महाबतजंगास लिहिलें होतें; व लाला नरसिंगदासा-हातींहि हेंच सांगून पाठविलें होतें. त्यास नवाब महाबतजंगानें थैल्या तीन पाठविल्या आहेत. त्यास सरदारांच्या थैल्या दोन पाठऊन सेवेसी बजिनस थैली पाठविली आहे. अवलोकनेनंतर जें लिहिलें असेल तें कळों येईल. आम्हांस तों इतकेंच लिहिलें आहे, व नरसिंगदासाहातीं लिहविलें आहे कीं, जेव्हां राज्या-सींच बोली चाली ठीक जाली; तेव्हां रघोजीबावाचा यावयाचा संशये किमर्थ ? राज्यांचा चाकर आहे. मुलकाचा तह जाला. आतां बोलाऊन घ्यावा. यैसेंही असतां श्रीमंत स्वामीसारख्यांस जेव्हां तो जाईल यैसा संशये आहे. तेव्हां माझ्यानें फौज कसी दूर करवते व मुलुक कोण्याप्रकारें वस्ता होऊं पाहतो व झाडून पैका मी कोठून पाठऊं ? असो मी युध्यप्रसंगास सिधच आहें. आला तर मारितच आहे. न आला तर अखरसालपर्यंत जो खजाना जमा होईल तो पाठऊन देतच आहे. तुम्ही सरदारांस लिहा कीं, जर रघोजी येणारच असला तर रामगड अथवा पचेट अगर उडेशोच्या[2] मार्गें बंगाल्यांत येईल, तुम्ही पटणे गया प्रांतीं बसून काये कराल ? जर तुम्हांस आगाउ समाचार तहकीक पावला कीं रघोजी तत्वता वराडांतून निघाला व क्षेपनिक्षेप बंगाल्यास येतो यैसे तुम्हांस ठीक कल-ल्यावर तुम्ही न बोलावतां व न लिहितां नीट बंगाल्यास येणें. तुम्ही व आम्ही मिळून त्यांस मारूं. जर आम्हांस आगाऊ समाचार पावतो तर आम्हीच सरदारांस वर्तमान पावतें करितों. माझें पत्र पावेल तेव्हां त्यानी नीट बंगाल्यास यावें, यैसें माहाबतजंगानें आम्हांस लिहिलें. व नरसिंगदासाकडूनहि लिहविलें त्याचें

१ अलीवर्दीखान. २ ओर्छा.

उत्तर आम्ही त्यांस ताबडतोब लिहून पाठविलें कीं, लक्षवाटे रघोजीबावास श्रीमंत स्वामींनी दक्षणेंत गोवले आहे. यकूण वीस विश्वे त्यास येऊं देतच नाहींत. कदाचित येखादा वाटा चालला तर सरदार बुंदेलखंडाच्या सरदेवर जाऊन बसले आहेत. यांच्या दबावानें कदापि तों येणारच नाहीं. तथापि आलाच तर दरकूच जाऊन पारपत्य करितच आहेत. तुम्ही आपल्या जागां मात्र सावध राहणें व पातशाही खजाना झाडियानसी पाठऊन देणें. या प्रकारें आम्ही माहाबतजंगास उत्तर लिहिलें; व हजुरच्या उमद्याकडून याच प्रतीची द्रव्याविशाईं ताकीद लिहविली आहे. स्वामींनीं थैलीचा जाब जो लिहावयाचा असेल तो सीघ्र आम्हांपासीं पाठविला पाहिजे. ईश्वरइच्छेने व स्वामीच्या प्रतापें रघोजीबावांचें येणें होनच नाहीं. यैसा भरंवसा असिला तर येतद्विषई जे खातरजमा करून ल्याहावयाची ते लिहावी व रुपयाविषई बहुतसी ताकीद करून ल्याहावी की तनग्वा हेप्रमाणें पांच लाख रुपये पत्रदर्शणी बापूजी माहादेवापासीं पावते करावे. व पातशाहीखजाना येकदाम बाकी न ठेवितां झाडियानसी दिलीस रवाना करा, म्हणजे करारप्रमाणें राजश्री स्वामींचे रुपये श्रीमंत स्वामीचे हातून सत्वर पावते होन आणि पुढें उपसर्ग त्या मुलकाचा तुटे. रुपये सत्वर न पावल्या, पातशाह आमचीहि तनग्वा तुम्हांवरच करिल व आपल्याहि खजिन्याची सजावली आम्हांसच सांगेल. तेव्हां अम्हांसतो ज्यारीतीनें काम होय त्यारीतीनें सजावली करावी लागेल. यास्तव पैका सत्वर पाठवावा. याप्रकारें द्रव्याविशई ताकीद लिहिलिपा. जर यंदा रघोजीकडील खातरजमा असली तर माहाबतजंगास खोलून लिहावें कीं रघोजीस सहसा येऊं देत नाहीं. जिंमा आमचा जाला. तुम्ही सिबंदी दूर करणें व पैका झाडियानसी दिलीस पावणें. यैसें लिहिलेप्रमाणें लाला नरसिंगदासासाठींहि च्यार गोष्टी लिहाव्या कीं तो उमदा माणुस आहे. आमच्या जावमालास तुम्हांपासीं ठेवला आहे. त्याचा गौर सर्व प्रकारें करित जावा. यैसेंहि अगत्यरूप लिहिलें पाहिजे. सेवेसीं श्रुत होये. बहुत काय लिहिणें. कृपा केली पाहिजे हे विनंति.

¶ *Hingne from Delhi to Peshwa at Poona. Reports the fear which the Emperor entertains about Raghoji Bhosle invading Bengal and stopping the Bengal revenues coming into Delhi.*

श्री.

पु॥. राजश्री बलवंतराऊ स्वामी

. . गोसावी यासी,

विनंती उपरी मोगलांच्या[1] सलाहि घडला होता. हे कचे वर्तमान आज पाच महिने होत आले, तुम्हास आम्हीहि लिहीले होते, व श्रीमंतानी लिहीले होते त्याजवरून कळेल. त्यास आम्हास फौजसुधा श्रीमंतानी घोडनदीवरून रवाना कार्तिक शुध येकादसीस केलें ते कार्तिक वद्य चतुर्थीस शहरोस[2] दाखल जाहालो. तेच दिवसी मोगलाने शहर सोडून फौजसुधा कूच केले. बाबूराव फडणीस कारभारी होते त्याचे शरिरास ठीक नाही व बकसीगिरी (गोवि)दपंत तात्यांस[3] सांगितली. आपला धंदा राहिला नाहीं हा येक मनात राग येऊन उठोन श्रीमंताकडे गेले. आम्ही बहुताप्रकारें आग्रह केला; परंतु मानले नाहीं. उठोन गेलेच तेव्हा श्रीमत् विश्वासरायाजवळ[4] चाकरी सारी करणे लागली. त्याच दिवसापासून मोगलाचे आमच्या फौजाचे जुंज सुरु जाहाले. संप्रदाये जुजाचा. भोवताले उभे राहावे. केंही[5] मारावी, बंद करावी, पातल सापडल्यावर उठावे त्याप्रमाणे प्रत्यह होत असे. तोफा पाच सातदा लागू केल्या. मोगलाच्या फौजेवर मार बसविला. बाणहि टाकीत आसो. दोन तीन जुंजे उजवे बाजूस गोपाळराव[6], मल्हारराव[7], महिपतराव कवडे आनी आगाडीस बाजूस बरीच केली. मोगल सिंदखेडास जाऊन तेथे जाधवराव[8] होते. आमच्या फौजा दतबाकडील[9] भोइटे, वाबले, व हुजरातचे आटोले, बोरगे हे सिदखेडा भोवते महिनाभर होतेच. जाधवरायास उखळू दिल्हे नवतेच. यासाठी वलीआहद फौजसुधा जाधवरायाचे कुमक करून आणावयासी निघोन सेवटी सिदखेडास येऊन जाधवराव मिळऊन घेतले. दुसरे दिवसी माघारा मोगल फिरला त दिवसीं मार्गसीर्ष शुध प्रतिपदेस आम्ही जागा पाहून तोफा सुरू मोगलाच्या गचींवर[10] फौजेच्या केल्या. तमाम फौजा पाठीमागे तोफाच्या उभ्या केल्या. येक बाजू दत (बा) राहिले ** थोडासा डोंगर होता त्याच बाजूस तोफा लागू केल्या. गोले तोफाचे मोगलाच्या फौजेत फार बेष

---

१ निजामाचा.

२ औरंगाबादेस.

३ लिमये खासगीवाले.

४ पेशव्याचा वडील पुत्र.

५ धान्यादि लुटणारी टोळी.

६ पटवर्धन.

७ रास्ते.

८ रामचंद्र जाधव, चंद्रसेनाचा मुलगा.

९ दत्ताजी सिंदे.

१० गच = आवळून राहिलेला जमाव.

लागू जाहाले. तेव्हा सोसेनासे जाहाले आणि नवाबानी फौजेस हुकूम केला व इभ्रामखान गाडदी यास सांगितले की बेजरब चालून जाऊन तोफा सोडवणे. तेव्हा इभ्रामखान गाडदी पाच हजार गाडद्यानसी तोफखाना आपला सोडून बाहेर येऊन आमच्या तोफावर चालून घेतले. डोंगर लाहान, आमच्या बागडोंगरी[१] येवढा होता, तो बेजरब घेतला. नीट चालून आले तेव्हा आम्ही तोफा मोठ्या नेटाने काढून फौजसुधा उभे राहिलो. दतबाचे टोलीवर पुढे गाडदी मागे वेकटरा[२]ऊ निबालकर हे चालून आले. मोठी मार जाहाली. आमचे गाडदी व जेजाला हा मार आम्ही दिल्हा. मोठ्या तमाश्याने चालून आले. बुरूज करून उभे छातीचा कोट करून उभे राहिले. लोकानी घोडे बाजे बाजे[३] घातले, परंतु हत्यार लागले नाही. मोठा तट दोहीकडे जाहाला. लोकानी सोसली फार. हात-धोड्यावर[४] ते व आम्ही उभे, याप्रमाणे च्यार पाच घटका मार जाहाली. दतबाची फौज दोन तीनदा उठली, परंतु गाडदी उखळले नाहीत. काही लोकाचे हात लागले. त्याही फौजेने फार सोसली. मोठेच जुज जाहाले. सेवटी जसे सोमवारचे जुंज गायेकवाडाचे जसे तट राहिला, याप्रमाणे तट होऊन बेमुमार * * * * हाली दोन तीनशे घोडे माणूस जखमी व ठार जाहाले मग ते तिकडे दम धरून मागे सरले. आमच्याहि फौजा याप्रमाणे दम धरून फिरल्या. मोगलाकडील दोनसे घोडे माणूस जखमी व ठार जाहले. मातबर दोन चार जाधवरायाकडील व हणवंतरा[५]याकडील ठार जाले. याप्रमाणे जुज जाहाले. तदोतर पाच सावे रोजी सलुखाचा पेगाम[६] नवाबाकडून आला. मग याही घालमेलीस तोडजोडीस पंधरा दिवस लागले. मग पंचवीस लाखाची जागीर करार मोगलाने केली. परगणे लेहून दिल्हे. नलदुर्ग किला दिल्हा. हा करार होऊन भेटीचा योग छ १७ रबिलाखर मार्गसिर्ष वद्य चतुर्थीस जाहाला. भालकीवर भेटी जाहाल्या होत्या, त्याप्रमाणे श्रीमत विश्वासराऊ याच्या व नवाबाच्या जाहाल्या. समारंभ ठीक जितका आम्हास सुचला तितका करून बंदोबस्ताने केला. ठीक जाहाले. या कारभारांत जानबा, शाहानवाजखान नाहीत. विठल सुंदर निजामआलीचे दिवाण व बाजदआलीखान होते. याचे मार्फतीने सलूख जाहला. प्रथम स्वारी रायाची. येश बरेच आले. तुम्हास कलावे म्हणून सविस्तर लिहिले आहे. मेहनत चाकरी थोडी बहुत होणे ती जाहाली. रायाची मर्जीहि बरी आहे राजश्री गोविंदपंत * * * * *

१ मामवडजवळची टेकडी.
२ निजामाकडील.
३ पृथक् पृथक्.
४ दगडफेकीच्या अंतरावर.
५ निंबाळकर.
६ बोली.
७ निंबाळकर.
८ विश्वासरावाची.

आम्ही ऐके जागा आहो. तात्यानी जुंज देखले नवते, परंतु यासमई फार दम धरून चागले ठहरले; बहूत बेष केली. गोपाळराव, केशवराव पानसी, आम्ही, तात्या, दतबा सारे प्रस्तुत येक विचारे रहश्यें आहों. काही वाकडे नाही. श्रीमत् राजश्री नाना, भाऊ पैठणावर होते. पुढे आले. याउपरी नवाबाच्या यजमानाच्या भेटी येका दो दिवसा होतील. कळावे. सविस्तर दर्शन होईल तेव्हा कळेल *

सेवेसी गोविद सिवराम नमस्कार विज्ञापना. रावजी कृपा करीत जावी. संशय कोणे गोष्टीचा नसावा. बळवतराव, तुम्ही, आम्ही, नाना येक अहा हे फार उत्तम आहे (हे) विज्ञापना.

¶The letter, addressed by Nana Purandare, all in his own hand, to Balawantrao Mehendale, vividly describes the action of Sindkhed on 12th December 1757. This Sindkhed appears to be the seat of Jijabai's father, Lakhuji Jadhao, about 50 miles east of Aurangabad.

No. 2] *[4-7-1759*

श्री.

छ २४ जिलकाद

सितैन आशाढ

सेवेसी विज्ञापना यैसीजे छ८ जिलकाद बुधवारी च्यार घटका दिवस राहतां नबाब सलाबतजंग याचे येथे दरबार जाला. नबाब निजामआलीखान वगैरे कुल दरबारास आले. सियादतखान यास नांदेडच्या सुबेदारीचा खिलत च्यार * * * * करूलाखान भवानगिरीचा आमील यास बदस्तूर साबीक[१] बाहालीचा सिरपाव दिल्हा. पौ * * * अमिळास सिरपाव दिल्हा. शामजीपंत शहानवाजखानी हैदराबाद सुभ्याचा पेषकार होता, त्यास इस्तकलालीचा[२] शिरपाव तीन पारचे दिल्हे. कितेक सरदार वगैरे यास आपलाले स्थळास रुकसत[३] केले. बी॥

१ शेख आलीखान जुनेर्दी	१ * * *
१ खाजे अलमवस * * *	१ * * *
१ मुकरबखान * *	
३	२

येणे प्रो रुकसत देऊन दरबार बरखास्त जाला. त्याउपरी उभयेता नबाब च्यार घटका खिलबतेत बसले होते. रेणकादासपंत, राजे विठलदास याचे

---

१ पूर्वीच्या. २ इस्तकलाल=जोर, पराक्रम. ३ रवाना.

रफिक[1] यास सा हजारी मनसब व साहेब नौबत तजवीज केली आहे. छ मजकूरच्या दरबारांत तसर्लीमात होणार होती ते न जाली. एका दो दिवसी होईल. बंदगोनअलीच्या[2] दरबारात हरकारियाचा दारोगा गुलामनक्षबंदखान होता त्यास तर्गीर[3] करून निजाम अलीखानकडील मीरमुसाखान यास दारोगे हरकारगिरीचा सिरपाव दिल्हे. सियादतखान याजपासून नजर तीस हजार नादेडचे मुबदारीवर जातेगाव जागिर दिल्हे. याची नजर पाच हजार. येकूण पस्तिस हजार करार केले आहेत. सेवेसी विदित होय हे (विज्ञापना)

¶*News-letter from the Nizam's camp to Poona. It gives an account of the Durbar which Salabat-Jung held to distribute gifts and presents to his Sardars, in order to secure their goodwill and help against a possible break of relations with the Peshwa.*

No. 3] [*4-7-1759*

श्री.

छ २४ जिल्काद
मिनैन आशाढ.

श्रीमंत महाराज राजश्री पंत प्रधान
स्वामीचे चरणसेवेसी.

सेवानुसेवक मित्रराम आनंदराव चरणावरी मस्तक ठेऊन सिरसाष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम ता। छ८ माहे जिलकाद मुकाम हैदराबाद स्वस्त क्षेम जाणून माहराजीं निजानंद लिहिती आज्ञा केली पाहिजे. सांप्रती येथील वर्तमान तर राजश्री जाधवरायांचे[4] पंच महाल वगैरे सनदपत्र होणार आहे. कोण कोणते परगणे होतात, सनदपत्र रा। चे होतास आलिया उपरी वर्तमान सेवेसी निवेदन करू. रा। आपले मायेत पूर्वीपासोन जे आहेत ते सेवेसी विदित्य आहे. नवाब भावाभावाचें वर्तमान तरी सर्व कारबार धंदा दरबार निजामअली खानाकडे. नवाब सलाबतजंग वैमली वाछाई करावी. भावाभावाचें चित एक आहे, आणि निजामअलीखां हरदम यादी आपली करितात आणि रा। राजे विठ्ठलपंत[5] नेही आपले मायेत पूर्ण आहेत. बशालतजंग नी कृष्णानदी पार होऊन पुढें गेले. नवाबाची छावणी येथें जाहली. मराठे अमीर लोक रजा घेऊन छावणीस

---

१ स्नेही. २ निजामली. ३ बडतर्फ,
४ रामचंद्र जाधव, चंद्रसेनाचा पुत्र, ५ विठ्ठल सुंदर.

जाणार आहेत. रा जाधव रायाचा पालकलेक हैबतराव जाधव यासी रा जानबा निंबाळकर याचे रार्खाची लेकी सोयरीक जाली. कळले पाहिजे. जासुद जोडीया येतात. त्यास उत्तर देऊन सत्वर पाठवीत जाणे. हे विनंती.

¶*The writer gives the state of things at Hyderabad and mentions how Ramchandra Jadhao was being promoted.*

No. 4] [*5-11-1759*

श्री.

सेवेसी विनंती सेवक केशवराव लक्षुमण सा नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता छ १४ रबिलावल रविवार मुकाम नाहलगांव नजीक जाणून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. अहमदखान जमादार इभ्रामखान याकडे गेले होते. त्यासी तूर्त लढाईच्या मजकुरामुळे ज्या कार्यास गेले होते ते कार्य घडोन आले नाही. म्हणून मारनिलेनी आपले ठिकाणी बहुत अर्जुदा जाले आहेत. याचा हेत की काही एक कार्य साहेबापासी करून दाखवावे. उपरातीक स्वामीची आज्ञा घेऊन जावे. त्यावरून साहेबाकडे आले आहेत. सर्व मजकूर साहेबास निवेदन करितल, तो ध्यानात आलीया नंतर कृपा करणार साहेब समर्थ आहेन. दुसरे, ईभ्रामखान याच्या चितात की, काही मोगलाची आपला सलोखाची मजकूर आपणास आज्ञा जालीया करू म्हणून अहमदखान सागतात. त्यासी स्वामी ज्या प्रा आज्ञा करितील त्याप्रमाणे मारनिले वर्तणूक करतील. याजवर सर्व प्रकारे कृपा करणार स्वामी समर्थ. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापी. अहमदखान याचे लोक आम्हापासी साठ माणूस छ १ रबिलावलापासून छ मजकूर पावेतो होते. साप्रत लोकासुधा स्वामीकडे आलेत. याची खर्चवेचाची परामृश करणार स्वामी समर्थ. आम्हापासून मारनिलेस आदा रुपये ५०० पाचसे पावले आसेत हे विज्ञाप्ती.

¶*The letter mentions how the Peshwa tried to win over Ibrahimkhan Gardi from the Nizam's service. The task was entrusted to Keshav Laxman Panse, Officer of Artillery.*

No. 5] [*7-11-1759*

श्री.

सेवेसी विनंती सेवक केशवराव लक्षमण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता छ १६ रबिलोवल प्रहरात्र मुकाम नजीक बुणगे. स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जालो ते मोगलाचे बाजूने जवळ उजवीकडे चालत होतो.

लोक व जेजालेदाज वगैरे करोल गाडदी पुढे घालून उजवेबाजूस थोडकेसे करोलानी तोड लाविले. तेथे गोळीचा जखमी चांगला माणूस जाला. त्यावर तोफाची मारगीर केली. सा सात बार केले. गोटात मोगलाचे गोळे पोहचले व बाणही पंचवीस तीस सोडले. त्यापैकी दोन तीन बाहेर पडिले. बाकीचे लस्करात पडिले. तोफेचे गोळ्याने आम्हाकडील सेख दाऊद गाडदी याचे दोघे गाडदी ठार जाले. हा मजकूर संध्याकाळ पावेतो जाला. मग सेवक लोक सुधां व तोफा घेऊन मोगलाचे जवळ बाणाचे अंतरावरोन होता. तेथून सर्व सांभाळून निघालों तों रात्र दोन घटका जाली. तेव्हां तोफांचे मार्गे करून चालिलो. स्वामीचे कोणीकडे लस्कर गेले हे ठिकाण लागेना. यास्तव सर्व लोकांचेही साहत्य कांही जवळ नव्हती. यास्तव बुणग्याजवळ येऊन राहिलो. प्रातःकाळी सेवेसी येऊन भेटतो. आणीक ही तोफा वगैरे सर्व सामान घेऊन स्वामी जवळ पोहचतो. रात्रीची वाट चुकलो, तो फौजेबरोबर जवळ वोहळा नाल्याची वाट, यास्तव स्वामीजवळ यावयासी अंतर पडिले. तोफा जवळहि असले पाहिजे, म्हणून एव्हाच यावयासी अंतर जालें. बुणग्याजवळ फौज कोणाची नाहीं. तीन कोस मोगल सार्‍या फौजा एक्या तोंडे मोगलाच्या आहेत. बुणग्याचे आगे कोणी नाहीं. ये विसीचा बंदोबस्त जाला पाहिजे. आमचे पलीकडे गोपाळराव व रास्ते व कवडे तीन फौजा होत्या. सेवेसी कळावें म्हणून लिहिले. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The letter describes the position of the armies before the actual action began.*

No. 6] [*14-11-1759*

श्रीशंकर.

पौ छ २३ रोवल

आर्सीर्वाद उपरी येथील कुशल ताा छ २३ माहे रावल जाणून स्वकीये कुशल लिहिणे. विशेष वार्तमीची पत्रें अले तें पाठविले आहेत. हे श्रीमंतास दाखवणे. आम्ही बुधवारी निश्रा प्रहरा पुढे जाणार. तेथील भीडभांडा[1] येईल तर उतम आहे. सांइकाल च्यार घटिका रात्र पावेतो तथौंटे (तेथेंच?) पावली पाहिजे. त्याजला वार्तमी जाली. हा खबरदारी होईल. कार्यास आंतर पडेल. शब्द सर्वत्र लावतील.

---

१ जमाव व तोफा.

त्याची भीड दजावीयास (?) आहे ते येईल. किसनसिंगासहि त्याचे लिहिले गेले. तोहि येणार. खर्च पडला. कार्य न जाले तर सरकार शब्द लावील.

येथे जमाव.

२५	स्वार	
३७५	माणसे	
४००		
	१५०	खाा सिबंदी
	४०	कासी पाटील
	२५	साहापूरचे सेंगर
	१५	राम चौधरी
	५	माडण
	१५	मोजेसा
	७५	मलारपत
	३२५	
	५०	केसरीसिंग
	३७५	

काही स्वार प्यादे पाचसातसे आले तर उत्तम प्रेत्न करता येश दाता श्रीजी आहे. बहुत काये लिहिणे, हे आसीरवाद.

¶*News-letter from a reconnoitering party.*

No. 7] [*22-11-1759*

श्री.

पौ छ १ रबिलाखर.

सेवेसी विसाजी कृष्ण [बिनिवाले] व महिपतराव लक्ष्मण [पानसे] कृतानेक साा नमस्कार विज्ञापना ताा छ १ राखर पावेतो मु॥ किले अहमदानगर स्वामीच्या कृपेकरून सेवकांचे व कीले मजकूर वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामींनी आज्ञापत्र छ २६ रावलचे जासुद जोडीबाा रवाना केले ते छ २७ रावली पावले. मस्तकी वंदून सनाथ जाहलो. तेथे आज्ञा की च्यार पाचसे खंडी कैली जिनस व चाळीस पन्नास खंडी वजनी जिनस येणे प्राो जसा मिळेल तसा सवगाईची वाट न पाहातां आधी खाो करून * लफत जमा करणे म्हणोन आज्ञा. येशास जिनस खाो करावा * यासि प्रारंभ केला. काही जिनस थोडा थोडा खाो केला. परतु नवा कारभार. जिनसाची अमदानी नाही. याजकरिता ज्याप्राो मिळतो त्याप्राो

खर्ाो करितो आणि तमाम वाण्यासहि कौले[1] दिल्हा आहे. जसा जसा मिळेल त्याप्राो खर्ाो करून हर जिनस किल्यात जमा करितो. परतु राजश्री नारो बाबाजी [नगरकर] व राजश्री बाळाजी माहादेव माडोगणे याजकडून च्यार पाचसे खंडी केली जिनस किल्यास.................आज्ञा जाहली. त्यास वरचेवर ताकीद होऊन आठ दाहा रोजात गला किल्यास येऊन पाहोचेसी आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. से दोनसे मजूरदार माणसे ठेऊन खंदक व सफेलीचे[2] काम चालीस लावणे म्हणोन आज्ञा. यैशास तूर्त सुगीचे दिवस, मजूरदार माणूस फारसे मिलत नाही. परंतु सेपनास माणसे सुनार गवडे बेलदार मिळोन ठेऊन खदकाचे व सफेलीचे काम चालीस लाविले आहे. येथे नेहमी कारखाना लागला म्हणजे पुढे महिन्या पधरा रोजा मजूरदार माणसे मिलतील. तूर्त सेपनास माणूस ठेऊन खदकाचे उकरावयाचे व गडगे घालावयाचे काम व सफेलीचे येणे प्राो सुरू केले आहे. तूर्त सफेलीचे काम चिखल धोड्याचेच करितो व खदकास गडगे घालितो, व फारच खंदक रेखला[3] आहे तेथे उकरावयासि काम लावितो. याप्राो तूर्त कारखाना सुरू केला आहे. सेवेसी श्रुत जाहले पाहिजे. पधरा † हजार रुपये पाठविले आहेत म्हणोन आज्ञा लिहीली होती; त्यास येथे आद्यापवर आले नाहीत. पैकावीण खोलंबा जाला आहे. सत्वर येऊन पावे ते जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

The writers Visaji Krishna and Mahipatrao Laxman write about the purchase of ammunition and repairs of the ramparts and trenches of the Ahmednagar Fort.

No. 8] [*23-11-1759*

श्री.

पौ छ २ जावर (?)
मिनेन गुरुवार

† विनती सेवक आंताजी माणकेस्वर साा नमस्कार विज्ञापना. श्रीमत राजश्री दादासाहेब लस्करात फौजसुधा भोजनास गेले. आम्हास व रायाजी पवार, सटवोजी गावडे यासी देऊन येथे चौकीस ठेऊन गेले आहेत. आज्ञेप्राो काल जेथे नाका लाविल्या होत्या त्या चौकीस खबरदार असो. श्रीमतहि सध्याकाली येतील. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

Antaji Mankeshwar writes that he, Rayaji Powar and Satvoji Gavade are appointed by Raghunathrao Dadasaheb for picketing.

---

१ कौल=करारमदार. २ सफेली=तटाची भिंत; ३ भरला.

† यापुढील मजकूर निराळ्या वळणाचा.

No. 9] *[25-11-1759*

श्री.

पै. ६ छ रबिलाखर

सेवेसीं विसाजी कृष्ण व महिपतराव लक्ष्मण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ ४ रबिलाखर दोन प्रहर रात्र पावेतो मुाा किले अमदानगर स्वामीच्या कृपे करून सेवकाचे व किले मजकुराचे वर्तमान येथास्थित असे विशेष. छ मजकुराचे आज्ञापत्र सांडणी स्वाराबाा रवाना जाहले ते दोन प्रहर रात्रीस पावले. तेथे आज्ञा कीं सोमवारचा मुहुर्त आहे, परंतु लांब पडते. किला सावकाश पाहवयासी बनणार नाही. याजमुले गुरुवारी दशमीस मुहुर्त आहे. तेथील जोसी यांसी पुसोन ठेवणे म्हणोन आज्ञा. येशास गुरुवारी दशमीसही मुहुर्त चांगला आहे. येथील जोसी यानी सांगीतले. येशास गुरुवारी दशमीस येऊन सावकासीने किला पाहवा. दशमीसहि मुहुर्त चांगलाच आहे. वरकड उदइक सोमवारी मुकाम नारायेणडोहोवर आहे. मंगलवारी शाहापुरावर आहे, म्हणोन आज्ञा. येशास नारायेणडोहो किल्या खालील गाव. तेथे मुकाम केल्याने जिरायंत फार आहे, परंतु जिरायेत गेल्यास काही गुता नाहीं. परंतु गुनवडीहून नारायणडोहो पाच कोस आहे. तेथुन कोलेवाडी कोसभर आहे. रुई पासुन कोलेवाडी पाच सां कोस आहे. तेथे जागा चांगली. पाणी वैरण चांगली आहे. शाहपुरावर जागा चांगली नाही. दगडी रान. पाणीहि ओढ्यास कमीच आहे. कोलेवाडी जागा चांगली, दगड नाहीं. किलाहि अर्डाच तीन कोस राहतो. जागाहि फारच चांगली. आम्ही काल जातीनें जाउन पाहिली आहे. उद्यां कोलेवाडीसच मुकाम करावा. यात मर्जीस येईल त्याप्रमाणें आज्ञा करावी. आज्ञा येईल तरी दोघा मधुन एक जण ज्यास आज्ञा होईल ते येऊन पोहोचों. आज्ञापत्र पाठविणार स्वामी समर्थ आहेत * उतर साडणी स्वारा बराबर आलेयाने लौकर येउन पोहचेल तेणेप्रमाणे वर्तणुक करून. सेवसी श्रुत जाले पाहिजे, हे विज्ञापना.

¶*The fort of Ahmednagar, an old Mohammadan capital, was recently acquired by the Peshwa and formed an object of pride for him.*

The writers invite the Peshwa to come and visit the fort personally.

No. 10] [*16-12-1759*

विनंति उपरी

जानोजी भोसले थोडे. त्यावर मुधोजी उलटून गेला. जूज होणार हे खबर आली आहे. येविसी पेशजी लिहिले. आज्ञा होईल तसे लेहून पाठऊ.

तोफखाना कडील नेमणुकेची दारू वगैरे किरकोल जिनस स्वारीचा राहिला, त्याविसी गोविंदपतास आज्ञा व्हावी कीं, सत्वर येऊन पावे; व नगरचेही नेमणुके प्रा। लौकर यावे.

ऐवज येथें तीन लाख आणविला तो यावा. खासास्वारीबा।हि दोन लाख यावे. दीड लाख बा। आणिले. त्यांतला विजगनगरची† खरीदी, गाडदी, काही नालबंदी किरकोळ असेच जाले. रोजमराहि चालीस पंनास हजार जाला. सिल्क उडाली. तेव्हा पैठणाहून यैवज आणावा लागला.

नगरास येणें जालीयावर तेथील काम सर्व पाहून आज्ञा त्यास करावी. येथून सांगितले ते विनंति करतील. हवालदार राणोजीराव खानवीलकर अगर तसाच कोणी ठेवावा. इमारत चाली लागली पाहिजे. फरावाग बहुत उतम आहे. तेथें जवळ राहणे यासहि स्थळ चागले आहे.

स्वामींनीं शरीरप्रकृति लिहिली त्यांत क्षीण आहे. त्यास बहुत प्रकारे पथ्य चांगलें करावें. जवळ मजल करावी येथे फौज खडीगणती गगेवर येते-दिसी घेतली. ते सा हजार जाली. बिनीची पथके हजारेक होते. अजून जमा होत. येथें आलियावर नलवडे खतल घाटगे वगैरे पांचसे पर्यंत आले. फिरून पत्रे पठविली आहेत.

खासास्वारीबा। हजार दोन हजार फौज नेमणे ते नेमून त्यास आज्ञा व्हावी. आगदी लोक नाही हे उत्तम नाही. चौकीचा बंदोबस्त उत्तम प्रकारे आसावा. पुण्यासहि दोन तीनशे राऊत नेमून ठेवावे.

आवरंगाबाजेत पाचसासे फौज हजार दोन हजार प्यादा आहे. तेथे काही घ्यावे तर फार करून आपलेच लोक आहेत. फौज जमा वीस हजार असती तर सहजांत कांही तरी काम होते. प्रस्तुत घास दाणे घेतो. शहरास काही प्रकार करावा की काय किंवा दौलताबाजचे होईल तेव्हांच जे करणे ते. येक नि * * य नाही ते * * माझी प्रस्तुत बरीच आहे. दोहो तिही दिसांआड येकदां जेवतो. संभाळून जेवावे लागते. पथ्य अगदीं नाहीं. जड मात्र फार खात नाहीं. औषध पहिले चालते तेच आहे. जखमेचे कातडे आजून बळकट जाले नाहीं. शिरेवर म्हणून आंग दुखत थोडेसें असतें. वरकड पहिलेहून सर्व प्रकारें

† गच्या जागीं य असावा. विजयनगरहून कांहीं खेरदी केलेली असेल.

याप्रमाणें महिनाभर करावे. पुण्याहून कूच जाले. भिवरेथडीचे व नगरचे पाणी मानेलसें वाटतें. प्रकृतीस पडेल तेव्हां खरें.

आणाजी साटम याचा कांहींतरी निकाल काढून त्यास आम्हाकडे पाठऊ (न) द्यावें. घरींच राहिले आहेत. वतनाचे गाणे सेवटास न जाई; तरी उमेदवार करून ठेवावे. त्यास घरीं राहू न द्यावें.

बरें आहे. शक्त अजून चांगली येत नाहीं. पाठीमुळें दंड नमस्कार नाहीं. ते चाली लागल्या याहून बरे वाटेल. थोडथोडा प्रारंभ आहे.

दादाची व रायाची शरीरप्रकृति बरीच आहे.

बाबूजी नाइक विठलपंत बाबाचे वगैरे थोर पथके आजून दोनही फौजांतील कोणी जमा होत नाहींत. बहुधा एकदांच सारे येतील तर नकळे. गंगातीरीं वैरण मिळत नाहीं. एके जागा दोनचार दिस जालीया कुच करावे लागते. येथून जावे तिकडे रोख पडतो, हे तिवंधा (त्रेधा?) आहे.

रा। छ २९ रा। कर हे विनंति.

¶*The whole letter is in the hand of Sadashivrao Bhau and is addressed to the Peshwa, asking orders about various points in connection with the ensuing campaign against the Nizam. The Peshwa was in bad health already and the Bhau himself suffered from the after-effects of the wound he had recently received in his attempted assassination.*

No. 11] [*27-12-1759*

श्री.

छ २२ जमादिलाखर
माघमास सु॥ सितैन.

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक दताजी सिंदे कृतानेक दंडवत विज्ञापना. सेवकाचे वर्तमान ता। छ ७ जमादिलावल मो। कुंजपुरा. स्वामीचे कृपावलोकने करून यथास्थित असे विशेष. सरकारचे आज्ञापत्र छ १० रबिलोवलचे पाठविलें ते छ २ जमादिलावली सादर जालें. तेथे आज्ञा छ ६ रबिलोवली दरबार करून बसलो होतो. त्यास मारेकरी मुसलमान यानी संध्याकाळचे समई पाठीमागून येऊन कटारेची हूल चालविली. ते पाठीवर थोडीसी चुबकणी लागली. खुनी धरले. सोध मनास आणितां मुजफरखान व हैदरखान याजकडे मुदा शाबूत जाला. तेव्हां त्यास व या मनसबियात अणखी

होते त्यास धरून अठाजणाचा सिरछेद केला, म्हणून आज्ञा. ऐसीयास श्रीकृपेनें व वडिलांचे आशिर्वादें खैर जाली. हे वर्तमान यैकोन परम समाधान जाले. स्वामी अवतारी. श्रीचे सुदर्शण फिरत असतां हरामखोरानी शस्त्र चालविले. त्या प्रमाणे केल्या कर्माचें फळ पावले. स्वामी आमचे छत्र. कल्याण जालें. मोठा संतोश जाला. याजउपर जाबता उत्तम प्रकारें राखावा. कोणहाचा इतबार न धरावा. खास चौकीस दक्षणी मातबर वतनदार पाहून ठेवावे. म्हणजे त्याजपासून अंतर होणार नाहीं. जाबता राहेल. *सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ती.

¶*Dattaji Sindia from Kunjpura congratulates Bhausaheb on his narrow escape from the murderous assault by Mujfarkhan on 28th October 1759. He further advises him to employ as personal guards reliable Maratha land-holders.*

No. 12] [*5-11-1759*

श्री.

पो. छ. २४ रबिलोवल

श्रीमंत राजश्री पंतप्रधान यांप्रति वासुदेव दीक्षित अनेक आसीर्वाद उपरी. येथील क्षेम कार्तिक वद्य १ सोमवार जाणऊन स्वकीयें कुशल लेखन केलें पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले पावोन वर्तमान कळों आलें. श्रीमंत भाऊ यांस खिर्नी[१] मुसलमान याने दरबारांत हुल कटारीची चालविली. चुबकणी[२] लागली. दों चौ दिवसां बरी होईल म्हणून लिहिले. देवां ब्राह्मणांचे आसीर्वादें क्षेम जालें. आम्ही परस्परें वर्तमान पुर्वी आयेकिले होतें त्यावरून चितांत बहुत विक्षेप आला. आपले पत्रावरून समाधान जालें व बो। हरी दीक्षिताचे पत्रीं खुनी जितके होते त्याचे पारपत्य जालें. बहुत उत्तम जालें. पुढें हि येवनसंसर्ग थोडाच असलियाने उत्तम आहे. हे परम दुष्ट. यांचा भरवसा नाहीं. † बहुत काय लिहिणे हे आशीर्वाद.

¶*Vasudeo Dixit sends his congratulations to Bhausaheb on the latter's lucky escape. There is a warning against employing Mohammadans as guards, which shows how feeling ran high at the time against Mohammadan religion.*

---

१ खिर्नी=आक्रम म्ह. द्वेष धरणारा. २ चुबकणी=हलकी जखम, ओरखडा.

† यापुढील शब्द बालबोधीत बाजाच्या हातचे.

No. 13] *[27-12-1760*

श्री.

पौ

छ ६ जमादिलावल

शुक्रवार दोन प्रहर

सेवेसी आज्ञाधारक रामजी नाईक सां. दंडवत विज्ञापना. नवाबाचे आजी सुक्रवारी कूच जाले. निंब्रेदेहऱ्याचा घाट आजीच चढून वरते जावे यैसी तजवीज आहे. गोपाळराव याचे राऊतानी काल दाहावीस तेथे कहीची[१] उजवे बाजूकडून नेली. सुरतासिंग याचा ब्याही पंनास राऊतानिसी परमानंदाचे खेडल्याहून काल दोन प्रहरास नवाबास येऊन भेटला. सेवेसी श्रुत होय, हे विज्ञापना.

¶*News-letter from the Nizam's Camp.*

No. 14] *[6-1-1760*

श्री.

विज्ञापना छ १६ जावल सोमवार मुकाम जाल्याचें वर्तमान यापूर्वीच सेवेसी लिहून पाठविले आहे. त्याजवरून श्रुत जाले असेल. मुकामाचे झंडे उभे करून बहीरबुनगे[२] उतरऊन फौजा चहुकडे मिसलीवरच उभे आहेत. स्वामीच्या फौजा डावे बाजूस नमूद जाल्या म्हणोन इकडूनही राजे विनायकदास व मुरादखां व सदासिव नारायेण व शंकरी वरायेणा डावे बाजूस जाऊन उभे राहिलेत. वरकड मिसलेवरच[३] आपलाले उभे आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*News-letter from Peshwa's agent with the Nizam giving the disposals of the enemy's forces.*

No. 15] *[8-1-1760*

श्री.

पौ छ २६ जावल

सितैन पौश्य मास बुधवार.

राजश्री नाना[४] व बळवंतराव[५] यासीं

विनंती† उपरी. आमचे व श्रीमंताचे बोलणे जालें. सारांष तूर्त पौष वद्य शष्टीस याची आज्ञा घेऊन भातवडीचे मुकामास आलों. दर मजलीने येतो. सविस्तर

१ तट्टं. २ बाजारबुणगें. ३ नेमलेली जागा.

४ पुरंदरे. ५ मेहेंदळे. † पत्र सखारामबापूचें.

कलेल. व आणीक कितेक मजकूर श्रीमंतानीं श्रीमंतास लिहिला आहे. त्यावरून सर्व भाव कलेल. बोवा[१] चौ कोसावरी आलें आहेत. येथेंच राहणार. लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Sakharam Bapu writes from the Peshwa's Camp to Purandare and Balavantrao in Bhausaheb's Camp.*

No. 16] [*8-1-1760*

श्री.

पो छ २६ जमादिलोवल

सितैन पौष्य बुधवार.

† सेवेसी विज्ञापना. पौष वद्य शष्टीस श्रीमंतापासुन निरोप घेऊन भातवडीस मुकाम केला. येथून दरकूच स्वामीजवळ यावें. काही मजकूर आहे तो दर्शनांती श्रुत होईल. सांप्रत मोगल कोठें, आपली फौज कोठें हे ल्याहावे. आम्हाबा राजश्री सदाशिव रामचंद्र वगैरे मिळोन हजार राऊत आहेत. तेथें फौज किती जमा जाली ते ल्याहावे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Sakharam Bapu writes to Sadashivrao Bhau.*

No. 17] [*9-1-1760*

श्री.

पौ. छ १८ (?) जावल

मवाप्रहर दिवस

विज्ञापना छ १९ जावल गुरुवार चार घटका दिवस. वर्तमान, प्रात:कालचे तीन घटका रात्रीं नगारा कुचाचा होऊन तयारी लष्करची जाली होती. आतां कमा विचार जाला, त्याजवरून मुकामाचे झंडे उभे करऊन मुकाम केला. कोणते कारणार्थ मुकाम जाला, हे मागून सेवेसी लिहून पाठवीन. हे विज्ञापना.

¶*News sent to the Peshwa from the camp of action. It should be remembered that Bhausaheb was in charge of operations near Udgir, and that the Peshwa Nanasaheb was behind near Ahmednagar.*

---

१ महादोबा पुरंदरे. † पत्र सखारामबापूचें.

No. 18] [11-1-1760

श्री.

पौ छ २६ जावल

सितैन पौस्य बुधवार

सेवेसी विज्ञापना श्रीमंताचा निरोप घेऊन घाटावर भातोडीचे मुकामावर येऊन स्वामीस विनती पत्र सेवेसी पाठविलें होते. पौष्य वद्ये नवमीस मंदवारी क्षेत्र राक्षेसभुवनास अलो. कूच दर कूच येतोत. स्वामी कोणे ठिकानी आहेत व मोगल कोणे ठिकानी आहे हे वर्तमान करार[1] कलत नाही; तर अज्ञा लेहून पाठवावी त्यो[2] रोखे येऊ. सेवेसी श्रृत होये हे[3] विज्ञापना.

¶*Sakharam Bapu asks Bhausaheb which way he should come to join the main army.*

No. 19] [11-1-1760

श्री.

पो छ २३ जमादिलौवल रविवार तिसरा प्रहर

श्रीमत राजश्री दादासाहेब स्वामीचे शेवेसी.

विनती सेवक विठल सिवदेव कृतानेक सा। नमस्कार विनंति विज्ञापना. येथील कुशल ता छ २१ जमादिलौवल मंदवार मु॥ हेर (बेर?) कुमठे स्वामीचे कृपेकरून येथास्तीत असे विशेष. स्वामीनी कृपा करून पत्र पाठविले. तेथे आज्ञा की, रविवारी आम्ही मोगलाजवळ दों कोसावर येतो. तुम्ही फौजेत येऊन सामील होणे. त्यास आम्ही मार्गावरच आहो. स्वामीही येथेच ये (तात). डावे उजवे फौज आली तरी बातमी राखून येऊ. आज मोगला उदगिरीपलिकडे दोन कोसावर होता. तो शेहरा किलयासेजारी आला. काल जाधवराव आले होते. त्याची उटे तटे आणिली. आज मोगलाची रँव[4] पडल्यावर बैले ढोरे काही तटे आली. केवल रवेचे आलिकडे दरा पुढे देऊळ होते. गोल्यागोली जाली. त्यासही मार्ग नाहीं. आम्हास नाही. ळुंगारे[5] आडवे तिडवे जाऊन बैले बदुखा येक बाण घेऊन आले. मोगल दहा पंधरा हजार सुमारे दिसतो. सिदये[6] गारदी आठदहा हजार

---

१ नक्की, खात्रीशीर.

२ या पुढील मजकूर सखारामबापूंच्या हातचा.

३ येथून सदाशीव रामचंद्र लिहितो काय?

४ रांग.

५ लुटारू.

६ सिद्दी.

तोफा येणे प्रो आहे उदैक कूच होईल. मुकाम होईल ते सेवेसी लिहुन पाठऊन. अलादा पत्र तपसीलवार लिहिले आहे ते पाहून श्रीमंत रा। भाऊसाहेबाकडे पाठवावे. सेवेसी श्रुत *

¶*Vithal Shivdeo gives the movements of the enemy's forces to Dadasaheb and also an account of a skirmish.*

No. 20] [*11-1-1760*

श्री.

छ २३ जमादिलौ—

वल रविवार तिसरा प्रहर

विनंती सेवक विठल सिवदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. येथील कुशल ता। छ २१ जमादिलौवल मंदवार मु। हेर (बेर?) जाणून स्वामीचे कृपे-करून येथास्तित असे विशेष. काल छ २० रोजी वर्तमान सेवेसी लिहीले होते की मोगल उदगिरी पलीकडे दों कोसावर घाटाखाले होता. जाधवरायाचा मुकाम मात्र फौजेचा उदगिरीवर होता. आम्हाकडील लोक जाऊन कहीची उटे सत्रा आठरा काही नटे यैसी घेऊन आले. काल मोगलाचे कूच होणार होते ते मुकामच जाला. खासे जाधवराव काही फौजेत नवत. माग मौजे मृगावर होते. ते आज प्रहरा दिवसा आम्ही तयार होऊन त्याच्या गोटा सेजारी माळावर जाऊन उभे राहिलो. तो तेहि पलीकडून येऊन दाखल जाले होते. तो आम्ही गेलो. मग त्याचे कूच होऊन ढाला[१] पाडून गावात शेहरात राहिले. किल्यावरी तोफा जाल्या. मग आम्ही मोगलाच्या रोखे गेलो. उजवे हाते जाधवराव, उदगीर डावे हाते लस्कर ऐसी जागा पाहून डोंगर होता तेथे उभे राहिलो. लुगारे डोंगर आडदरा होता. आम्हास चाढून जाता न येता. त्यास येता नये. यैसे बांकी जागा होती. लुगारे राऊन डावे उजवे होऊन नवाबाच्या लस्करासेजारी जाऊ (न) तीस चालीस बईल दोन च्यार बंदुखा येक बाण लगीचा यैसा घेऊन आले. तो पावणे दोन प्रहर जाले असता नवाबाचे येकाकीच डेरे पडू लागले. फौजा तयार होऊन पुढे आल्या. मागून कूच होऊन फौजा हरोल आला. मागून बुनगे नवाब थैम जो दरा वाटेचा त्या माथावर आम्ही करोल उतरून आवाज केले. मग त्या पलीकडे दुसरी वाट आडवाटेने हरोल चढून त्या पलीकडील रस्ता त्याने तोफखाना यैसे चढोन आले. नवाब * * आले. तेव्हा हारोल किल्या सेजारी आला. मागून चडोल[२] चालिला. यैसी सर्व फौजसुधा मुकाम उदगीर पाठीसी

---

१ निशाणें. २ पिछाडी.

देऊन मुकाम जाला. ढाला जाल्या नवत्या. हारोल मात्र आला. दिवस सा सात घडी राहिला. मग आम्ही सरोन. माघारे आलो. छेबिन्यास[१] व रात्री कहीवर घालावे. याकरिता आम्हाकडील लोक व दारकोजी निबालकर यैसे ठविले. आम्ही आलो. मोगल दाहा हजारपर्यंत आहे. सिवाये प्यादा गारदी बुनगे येकचे (?) होते. दाहा हजार पर्येत तेहि असतील. सिवाये तोफा येण-प्रा आहे.. उदईक कूच होईल की मुकाम होईल ते पाहावे. त्याप्रा सेवेसी लिहून कळऊ. श्रृत होये हे विज्ञापना.

¶*Vithal Shivdeo narrates the first encounters with the enemy.*

No. 21] [*12-1-1760*

श्री.

छ २२ जमादिलोवल

शनवार

श्रीमंताची फौज सावरगावावरून चिकोरेयाचे घाटे येणार. त्या सुमारे राऊत पाठवावे.

No. 22] [*12-1-1760*

श्री.

छ २२ जमादिलौवल

सितैन पौष्य दोन

प्रहर शनवार

सेवेसी विज्ञापना. बोरीचे मुकामास येऊन बातमीचे वर्तमान लिहून पत्रे स्वारांजवळ दिल्ही. इतक्यांत दुसरी बातमी आली की जाधवराव पुढें हरोलीसे[२] आले व मागाहून मोगलाचेहि कूच जालें. उदगिरीस आज शुक्रवारी येणार. बहूत काये लिहीणे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*News about the movements of the Mogul and Jadhavrao's army.*

---

१ सैन्याभोवती रखवाली करणारी टोळी. २ हरोली=बिनी, अघाडी.

No. 23] [12-1-1760

श्री.

छ २२ जमादिलावल शनवार
सितैन पौष दोन प्रहर दिवा

सेवेसी विज्ञापना काल गुरुवारी आमचा मुकाम राजुरी तळेगावच्या दरम्यान होता. तेथून उडते वर्तमान लिहून जासूद जोडी सेवेसी रवाना केली. आज शुक्रवारी प्रहर रात्रीस कूच करून मौजे बोरी प्रो वरवळ येथें दो प्रहरा येऊन मुकाम केला. मोगलाचे तथ्य बातमीस पथकें आम्हाकडील हणमंतराव कदम व मुल्तानजी कदम व सटवोजी गावडे व कृष्णाजी पंत यांजकडील लोक पुढें पाठविले होते. त्यास तहकीक बातमी आजची. कालचा मुकाम मोगलाचा आवल-कोंडा उदगीरी पलीकडे चों कोसाचा व आजही तेथेंच आहे. मौजे दाबका-हटकराचा गाव होता तो मारिला. गर्दी पाडिली. चंद्रसेन जाधव यांचा दीड दोन हजार मुकाम आज शुक्रवारचा उदगीरीवर आम्हा जवळून तीन साडेतीन कोसावर आहे. लोक आम्हाकडील पुढें गेले होते. त्यांचा व जाधवराव यांचा मुकाबला जाला. त्याजकडील कही पुढें आली होती. त्यापैकीं आम्हाकडील लोकांनीं व सटवोजी गावडे याजकडील लोकानीं तटें उंटें व बैल वगैरे कांही पाडून आणिलीं. कलहास आरंभ आज जाला. याउपरी त्याजकडील कही काबाड परिछीन पाडून आणीत जावे कीं काय येविशीं जैशी आज्ञा होईल तैशी वर्तणूक केली जाईल. स्वामींनी आज्ञापत्रीं लिहिलें होते कीं खासा स्वारी सावरगावावरून चिकोऱ्याचे घाटे येईल. ऐसीयास लिहिले प्रमाणें त्यामार्गें स्वारी यावयाचें करावें. मोगलाचा मुकाम तेथेंच जाला. आवलकोंडावरच† जाला आहे. उदगीरी खालता पाचा कोसावर आहे. बहुधा उदगिरीस येणे होईल न होईल ते उदईक कळेल. बहुतेक वांदेरा[१] सोडून येत नाहीं. वांदेरेणेच चालेल. आज-रात्रीं बातमी होईल ते उदैक सेवेसी लिहून पाठऊं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶The writer Vithal Shivdeo Vinchurker gives information about the encampment of the Nizam's army and of a skirmish that took place between his own men and those of Jadhao.

---

† पत्र विंचुरकराचें.

१ मांजरा नांवाची नदी उदगीरजवळील.

No. 24] [13-1-1760

श्रीशंकर.

छ २३ जमादिलोवल
सितैन रविवार

*सेवेसी विज्ञापना—राजश्री विठलपंतानी सविस्तर स्वामीकडील निरोप सांगितला. त्यासी रात्री बाहेर राहावें हे आपले स्वरूपास योग्य दिसत नाही. हे निर्बलाने करावें. स्वामीचे बल त्याचे तिपट आहे; आणि ही मसलत आमचे विचारे बरी दिसत नाही. त्याचा छपा येईल ऐसे दिसत नाहीं. आला तरी छबिना मातबर असिल्यास जसे बनेल तसे करावयास कामास येईल. दुसरे स्वामी बाहेर राहतील तेव्हा फौज जवळ फार राहणार नाहीं एक दोन दिवस राहील, मग फार थोडी फौज राहील. हलकेपण दिसेल. विचार इभ्रामखानासहि पुसावे. सारांश मातबर एकदां लडाई मारावी हा विचार मुख्य. किरकोळ दुरून तोफा मारल्यानें काय होणार? जर मोगलाचे कूच जाहले तरी एक दोन दिवसांत सुमार पाहून लडाई मातबर साऱ्या फौजाची करावी हे विनंती. जर जागा धरून बसला तरी याचे विचार दुसरे आहेत. तेंहि सांगू हे विनंती. जर मध्यें ओढा नसता तरी रात्री जागल्यानें छपा घालावयास अथवा पहाटे आवाई करावयास ठीक पडते. आतां ओढा मध्यें बाका आहे. तेथे त्याच्यानें बाहेर येवत नाहीं; व आपल्यानें जावत नाहीं. तेथे बाहेर जागून मेहनत वृथा होईल, ऐसे सुचतें. त्यात जशी स्वामीची मर्जी असेल तसें ल्याहावें हे विनंती.

¶*Raghunathrao advises Bhausaheb an immediate bold attack in consultation with Ibrahim Khan and deprecates light and dilatory skirmishing.*

No. 25] [16-1-1760

श्री.

पौ छ २६ जमादिलोवल
सितैन पौष्य बुधवार

विनंती सेवक आंताजी माणकेस्वर सा। नमस्कार विज्ञापना. नारोपताने लोक निसबतीस द्यावयाची विनंती केली. स्वामीनी त्याजवळ सांगितले. तुम्हाजवल सामान आहे ते कैसे आहे? आसो. इभरामखान गाडदी याजवरी लढाई पडली. त्याच्या उपरालियास फौज आमची उठली. मधे आडवे जाधवरायाची फौज आली. त्याची आमची लढा [ई] येक घटिकाभर जाली. नेहमी तरवारच चालली. ते दीढ हजार, आम्ही दोनसे, सटवोजी गावडे दोनसे, रायाजी

पवार पंचवीस स्वार, याप्राा जाली. तरवार फार चालली. येक प्यादा नवता त्यास उतम प्रकारे सारले. रामाजीपंत आमचे भाचे, लक्ष्मणपंत पागे यानी आधी तरवारने हटले. त्याजवरी शंभर माणसाने तरवारेने हटले. आमच्या आसामिया पाच ठार, गावडेकर्डील च्यार ठार, वरकड घोडी पडली. घोडे माणूस तरवारेचे जखमी, गावडे आम्ही मिळून चालीस आहे. थोडक्याने फाराची मोडसी उतरली. ते ग्वावदानी द्रिष्टीने पाहिले नाही. रामापा घोरपडा आमचा जडजखमी आहे. रामाजीपंत भाचा वाचता दिसत नाही. आद्याप श्रीमत दादासाहेब अथवा विठलराव पाच राऊत आले नाहीत. येथे आम्ही आहो. जाधवरायाची फौज आद्याप बोळ्यापार आहे. आम्ही वर आहो. गावडे गोटास गेले. गहावया (आग्रह) बहूत केला. न राहिले. आमचे जखमी व मुडदे सर्वे लाविले. आम्ही सडे शंभर निवडक येथेच आहो. श्रीमत आलियाखरीज जात नाही. पाच हजार फौजेच्या खावदाची न व्हावी येसी जाली. रा बाबुजी नाईक उजवे बाजूस उभे होते. तेथेच आपल्या ठिकाणीच होते.. उठले नाहीत. सेवकाच्या निसबतीस हजार स्वार जरूर लढाईपरियेत द्यावे. च्यार हजार फौजेच्या ग्वावदावाा चाकरी घ्यावी. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Antaji Manakeshwar describes a skirmish which his men encountered with those of Jadhavrao who was thrown back. He also gives his own casualties.*

No. 26] [*16-1-1760*

श्रीशंकर.

पौ छ २६ जाावल
सिनेन पौस्य बुधवार

चिरंजीव राजश्री नाना[1] यासी आसिर्वाद उपरी. हिरागज हती पाठविला तो पावला. तो ठेऊन घेतला. ते दोघेहि माहात जवळ ठेविले. त्याजकडील दुसराहि हती पाठऊन देणे. आम्हाकडे दुसरा हती अधिक पाहिजे. नेगी[2] समसेर तुम्हाकडे पाठऊ; व लक्ष्मी तोफ मात्र मातबर आम्हाजवळ आहे. दुसऱ्या लाहान आहेत. दुरून मार द्यावयास येकच कामाची आहे. तिचा कणा आथवा काही गाडा जाया [जाला] म्हणजे मार द्यावयास ठीक पडत नाही. यास्तव तेथे मातबर आठ

---

१ पुरंदरे. २ हत्तीचें नांव.

तोफा आहित. त्यापैकी येक आथवा दोन तोफा पाठवणे. हे आसिर्वाद. हेच पत्र तीर्थरूपास दाखवणे जर्सी मर्जी असेल तसे लिहिणे, हे आसिर्वाद.

¶*Raghunathrao asks for big guns.*

No. 27] [*16-1-1760*

श्री.

छ २६ जमादिलावल सितैन.

सेवेसी विज्ञापना. आज्ञेप्रमाणे आज येथे आम्ही राहून तोफाची मारगिरी पाहाटे करावी म्हणतो. त्यास आज्ञा. पाहाटे तोफाचा मार दाट देतो व तूर्तहि तोफ लागू केली आहे. आम्हाकडे मातब्र तोफ येक आहे. वरकड लाहान आहित. त्या दूरचे मारगिरीस उपयोगी नाहींत. यास्तव लागूं केल्या नाहींत. पाहाटे जवल जाऊन लाहान तोफा देखील मारगिरी करावी किंवा दुरूनच थोरल्या तोफाचे गोले मारावे ते ल्याहावे. आज आज्ञेप्रो येथेच राहू * हे विनंती.

¶*Raghunathrao asks for orders as to how he should put to use the guns—both small and big.*

No. 28] [*16-1-1760*

श्री.

पौ छ २६ जमादिलोवल

सितैन पौषमास बुधवार.

सेवेसी विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ २६ जमादिलोवल सौम्यवासर मुा परली येथे स्वामींचे कृपेकरून येथास्थित आसे विशेष. उदईक घाट चढोन वरता मुा होईल. आपला मुा कोठे आहे ? पुढें आम्ही कोणत्या रोखे यावे हा प्रकार काहीच कळत नाही, व एक दोन पत्रेही पाठविली; परंतु त्याचेही प्रत्योत्तर आली नाहीत. तरी आम्ही कोणत्या रोखे यावें, हे लेहून पाठवावयासी आज्ञा केली पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*A Maratha officer asks for orders from which side he should act.*

No. 29] [16-1-1760

श्री.

पौ छ २६ जमादिलोवल.

सितैन पौस्य बुधवार.

सेवेसी विज्ञापना. चिठी पाठविली ती पावली. ऐशास आम्ही स्वामीचे बुनगे-याचे सुमारे मध्ये राहिलो. पुढे छेबिने[१] आपले पहिले तळाचे सुमारें ठेविले. राा बाबुराव सदाशिव आमचे तोफाचे मारगिरी होते त्या गावापासी सडे फौजेने राहिले आहेत. काही मोगलाची पिछाडी व डावीबाजू याप्रमाणें वर्तमान आहे. राऊताबराबर दोन राऊत देऊन बाबुजी नाईक याजकडे पत्र रवाना केले. आमचे बुनगेयाचे तोडावर आणखी फौज ठेविली. स्वामीचे बुनगेयाचे सुमारे आम्ही राहिलो. आज्ञेप्रमाणे बंदोबस्त उत्तम केला असे हे विनंती.

¶*The letter appears to be addressed by Raghunathrao to Bhausaheb.*

No. 30]

श्री.

विनंती. लक्ष्मण तोफ करकबास गेली. तिचा गोळा दाहा सेरी आहे. तिचे गोळे सिल्केस दोनसे आहेत हे विनंती. गोळे पाठवावयाची तरतूद जाहाली म्हणजे गोळे सिध्ध आहेत हे विनंती.

¶*News of the Gun Laxman and its balls.*

No. 31] [16-1-1760

श्री.

पौ छ २६ जमादिलोवल

सितैन पौष्य मास बुधवार

सेवेसी विज्ञापना. मोगलाचे कूच जाले. जवळच मुकाम केला. कोणीकडे जातो हे कळत नाहीं. त्यास बुनगे आपले व आमचे ज्या ठिकाणी आहे तेथे असो द्यावे. उद्या कोणत्या रोखे जातो हे कळलियावर त्याप्रमाणे आम्ही डावे बाजूस जाऊं * हे विनंती.

¶*News of the enemy's movements.*

---

१ गतपहारा, चौकी सैन्यापुढील.

No. 32] [19-1-1760

श्री.

पो। छ २९ जमादिलोवल
सितैन माव सणवार

शेवेसी विज्ञापना. चिठी पाठविली. तेथे आज्ञा की, दिवसास मोगलाचे पिछाडीस चालावे; रात्री दादासाहबाचे लगते राहावे. आज्ञे प्रमाणे राहू. आजी आम्ही पिछाडीस नाही. दादासाहेबांची चिठी आली कीं, आजी मोगल चालून येणार; तुम्ही आम्हाजवळ येणे. त्यावरू (न) पिछाडी सोडून फौजेसंनिध आलो. मोगलाने मुकाम करून, चालून गोटा बाहेर थोडासा आला. परंतु जुज जाले नाहीं. कळावें हे विज्ञापना. छ २९ जमादिलावल.

¶*News of the day's operations.*

No. 33] [17-1-1760

श्री.

पो.. छ [१]२६ जमादिलोवल
सितैन पोष्य मास बुधवार.

सेवेसी नागोराम चरणावरी मस्तक ठेऊन सिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ २७ जमादिलावल संध्याकाळ पावेतो मुकाम वडवाल पा। वडवाल फौजसुधां सेवकाचे वर्तमान यथास्थित विशेष. स्वामींचे आज्ञापत्र साडणी स्वारा समागमे आले कीं स्वारी खंदारचे सुमारे गेली. मोगलाची गाठ लवकरच पडणार. तरी सत्वर येऊन पोहचणें व आणीकही समागमे लोक असतील त्यांस ताकीद करून समागमे घेऊन येणे म्हणून आज्ञा. त्यास आज्ञेप्रमाणे सत्वर येऊन पोहचतो. लस्करापासून अलीकडे साहा कोसावर आहो. उदैक शुक्रवारी प्रहर दाहा घटका दिवसात सेवेसी पोहचतो. समागमे कडू व वागमारे सरलस्कराकडील आहेत. त्यास समागमे आणिले आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. मागाहून समशेरबहादर व गाईकवाड व हरी गोपाळ व राजश्री सखारामपंतबापु वगैरे हेहि एका दो दिवसात येऊन पोहचतात. मागाहून फौजाची [२]आमदरफ्त फार आहे हे विज्ञापना.

¶*Nago Ram communicates to Bhausaheb the strong concentration of fresh forces that were speedily coming to join the main army. Nago Ram Bhagwat was a Konknasth Brahman, whose son Balavantrao Nagnath became notorious in Bajirao II's days.*

---

१ पैवस्ती चुकीची आहे. २ जाणेयेणें, येरजारा.

No. 34] [16-1-1760

श्रीलक्ष्मीकांत.

छ २६ जमादिलोवल.
पौष्य सितैन मंगलवार.

राजश्री बालाजी पंडित प्रधान गोसावी
यांसि.

॥ सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित जानोजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंति उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे विशेष. गोसावी यानीं पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ श्रवण जाला. पत्रीं आज्ञा जे निजामआलीच्या मनांत करारप्रमाणें वर्तावयाचे नाहीं. परिछिन्न बिघाड करितात त्यास आपण वराडची कुल जप्ती पत्र पावतांच करून आपली फौज त्वरेनें जमा करून * * * सामील व्हावे म्हणोन लिहिलें. येशी यास (जे सम) ई जेसी आज्ञा येते त्याप्रमाणें वर्तणूक करीतच आहो. आज्ञेप्रमाणें जप्तीहि होईल. परंतु इकडील प्रसंग जो जाला तो परस्परें विदित जालाच आहे. रघोजी करांडे याणी इमानांत अंतर करून चिरंजीव मुधोजी भोंसले यांसी मिळून मनमाने तैसी अमर्यादा करून वर्तणूक केली, ते अर्थ कोठपर्यंत ल्याहावा. जनामध्यें आपशब्द उठविला कीं नागपुरास नेऊन आम्हास दगा करावयाचें केले होते. येतद्विशई आपणासहि त्याणी लेहून पाठविलेंच असेल. त्यास आजीनागाईत आमचे वंशांत वडिलवडिलां-पासोन युध्यप्रसंग होत आले आहेत; परंतु कोण्ही कोण्हाचा विस्वासघात केला येसे जाले नाहीं. ते गोष्टी आम्हापासून केसी होऊ (शकेल). * * * त्याणी लटिका दोष ठेविला. तरी * * * च फळास आला. आमचे चितांत त्याचा ...(घात ?) करावा ऐसे असतें तरी कदापि जये न ** याचा परिहार ल्याहावासा नाहीं. गोसावी यांचेही निदर्शनास येईल. नागपुरास आणिल्यावरी आज्ञेप्रमाणें कारभार करावयाचा तह असतां फौजेंत फितात करून लोक फोडून फौज जमा करूं लागले. हेही गोष्टी चितांत न आणितां त्यास मध्यस्ताकडून सौरश्याच्याच गोष्टी सांगोन पाठविल्या जे तुमचा आमचा बनाव बमन नाहीं. तुम्ही आपले तालुकियात जाणे. कराडे यांसही सांगोन पाठविले कीं तुम्ही त्यांस पोहचाऊन आणिले तसे देणे. त्यावरी करांडे याणी आमचे ठाई दुर्बुधि धरून चिरंजिवाचा प्रतिपक्ष केला. तमाम वराडची फौज माहाल मुकामे आमच्या नांवें सनदा देऊन सीमावलंघनचें सोंग वादून दाहावा * * * * केली. मनमानें तेंसा पैसा घेतला * * * * पण व्हावे हे इच्छा चितांत धरली. वरचेवरी वराडांतून मामलेदारांचे व मोकासदाराचे बोभाट नागपुरी येऊ लागले.

कराडे यांस जेथवरी सामोपचारें लेहून पाठवावयाचे ते पाठविले. परंतु गर्वोन्मत्त होऊन चितांत न आणिले. निदान जाणून सन्निध दोन अडीच हजार फौज होती तेच फौजेनसी कूच करून, मजल दरमजल वर्धापार होऊन, पेठ नांदगांव येथे मुकाम करून, आणखीहि करांडे यास गौरवयुक्त पत्र पाठविले. त्याचे प्रत्योत्तर आनेक प्रकारें वल्गना करून लिहिले आणि दुसरे दिवसीं फौजेनसी चालून आले. आम्हाजवळ फौज होती तेव्हड्यानसी युद्धास उभे राहावे लागले. युध्यसमई गोसावियाचे (सम) स्त लोकानी घोडे चालविले. त्या * * * (शिपा) येगिरीची शर्त केली. परंतु आम्हासी * * * बाधली आहे आणि पूर्ण कृपा आम्हावरी आहे. याजमुलेंच पराभवास पावले. दाहा बारा हजार फौज दोन आडीच हजार फौजेनें मोडावी येसे नव्हतें. परंतु पुण्यप्रताप

श्री
शाहूराजपदांभोज-
भ्रमरायितचेतसः । बिंबा-
त्मजस्य मुद्रैषा राघवस्य
विराजते.

गोसावी याचा आगाध तेणे करून फते जाली. तदोतर * * * जीवाम्य श्रम करून पाहिले. छापा * * * वयास आले. सर्व करून सेवटी क * * * * कराडियानें भेटीचे सुत्र लाविले. आम्हीहि मनसबियावरी नजर देऊन मान्य केले. भेटीस आले. दुसरे दिवसी चिरंजिवास आणून भेटविले. सांप्रत मागती कारभार करावयाचा मुद्दा घातला आहे. आमचे आज्ञेप्रमाणें वर्तल्यास कारभारहि केला तरी चिंता काये ! त्यास त्याची रीती जे आहे ते गोसावी यांसी विदित आहे. या उपरी जो तह होईल तो मागाहून लेहून पाठवितो. साहेब कामावरी नजर देऊन प्रस्तुत सर्व गोष्टींची क्षमा करून कराडे आदी करून लहानथोराची दिलभरी करून फौजेचा गाहा करित असो. आज्ञेप्रमाणें जतीहि करितो. आपले फौजेनसी सिधच आहो. जे समई आज्ञा येईल ते स (मई मजल) दरमजल येऊन पोंहचत आसो. सवि (स्तर वृतां) त विदित व्हावा म्हणोन लिहिले असे. रा * * * माहे जमादिलवल. सूज्ञांप्रती[1] विशेष काय लिहिणे. कृपालोभ आसू दिला पाहिजे हे विनंति.

मोर्तब सुद.

¶*Janoji Bhonsla was ordered by the Peshwa to mobilise his forces and to wrest the province of Berars from the Nizam as the latter violated the terms. Janoji first gives an account of his family dissensions and the rising of Mudhoji Bhonsle aided by Raghoji Karande. The rising is however put down by him. He then carries out the orders of the Peshwa.*

---

१ येथून अक्षर लेखकाचें.

No. 35] [Jan. 1760

श्री

*राजश्री बाबुराव सदासिव स्वामी गोसावी यासी

विनंती उपरी. आम्ही आज ज्या जागां तोफा लाविल्या होत्या तेथेंच पाठीमागें रात्रीचें सडेच उभे राहिलों आहों. आमचे उजवे बाजूस चिरंजीव दादा आहेत. तोफा लाविल्या त्या जागां येसवंतराव पवार वगैरे लोक ठेविले आहेत. त्याचे पाठीमागें आम्ही आहों. दादाचे उजवे बाजूस तुम्हीच आहा. तुम्हाजवळ फौज थोडकी आहे. तिकडील बाजूचा सर्व बंदोबस्त आपणाकडेच आहे. आम्ही सारेच येके बाजूस आहों. याकरितां तुम्हीं तिकडील बंदोबस्त चांगला करावा. तुम्हा पलीकडे कोणी लोक नाहींत. याकरितां आपण दोनसे स्वार तलावियासी ते बाजूने पाठवावे म्हणजे तिकडे दबाव पडेल. आज पहिला दिवस बुनग्याच्या पेंचाकरितां आज हिकडेच राहणे जाले. तिकडील बंदोबस्त उत्तम करावा हे विनंती.

¶*Sadashivrao suggests to Babuji Naik certain arrangements which he is to carry out.*

No. 36] [19-1-1760

श्री.

पौ छ २९ जावल
सिंनन माव सणवार

वडिलांचे शेवेसी विज्ञापना. स्वामींनी चिठी पाठविली ती पावली. मोगलाकडील बातमीची चिठी पाठविली तीहि पावली. आम्हाकडील बातमी आली. तोफा काल फार लागू जाल्या. यामुळे मोगलाने विच्यार केला आहे की, अज तोफा जवळ आल्यास तुटून पडावे. लढाई करावी. यैसी तहकीक बातमी आली आहे. त्यास ते तुटल्यास आम्हास लढाई करणे, घोडे घालणे, जरूर प्राप्त जाले. त्यास आम्हाकडे फौज थोडी आद्याप चांगल्या माणसाचा जथ नाहीं. इकडे ते तुटल्यास स्वामींनी बातमी राखून तिकडे दाटी करावी; म्हणजे दुरुख लढाई पडेल राजश्री बापूजी नाईक दुमदारीस आहेत. त्यास आम्ही लिहिलें आहे की, आम्हाजवळ आज येणे. स्वामींनी त्यास ल्याहावे. ते आम्ही येकत्र जालियास जे होणे ते होईल. दारकोजी निंबाळकर सटवोजी गावडे स्वामीकडे पाठविले ते पावले असतील. बापूजी नाईक यांनी दुमदारीस आसावे. परंतु लढाईचे समई तोफा लागतील तेव्हा त्यानी आम्हावर नजर राखून आसावे. ते इकडे चालून आलियास त्यांनी सत्वर सामील होत जावे. यैसें त्यास निक्षूण ल्याहावे. मुख्य मोगल

१ टेहळणीसाठीं.

तोफामुळे फार घाबरला आहे. त्याने कोठेतरी येकदा तुटावे, तोफावर पडावे, हा निश्चये केला आहे. यास्तव स्वामींनी चांगला बंदोबस्त करून तोफा मारीत जावे. केवल तोफाचेच भरवसीयावर आसू नये. स्वामीचे मोगल तोफावर तुटला, तरी आम्ही हिकडे पायबंद देऊन लडाई पाडली पाहिजे. आम्हावर तुटला तरी स्वामींनी पायबंद द्यावा म्हणजे काही चालणार नाही. ईश्वरी दयेने सत्वरच मोगल जेर व्हावासा आहे. मोठी लडाई करावयाचा निश्चये करणे तो मी जवल येऊन ठहराव करीन. स्वामींचे विचारास आले तरी करावे. इभराईमखान वगैरे सारे बलाऊन निश्चये दोहो चोहो दिवसी तरी केला पाहिजे. हे विनंती. दमाजी समसेरबाहादर व आमची खासी हुजरात, माने, निबालकर वगैरे सारे जमा जाहालीयावरी करावे हेहि उतम आहे. हे विनंती.

¶*Raghoba writes to Sadashivrao, "The attack of our artillery was very effective. The enemy has taken fright. As I have a small force, you should check the enemy from behind if he attacks me. We hope to give him a crushing defeat. All sardars should be speedily summoned for the occasion."*

No. 37] [*19-1-1760*

श्री.

पो छ २९ जमादिलोवल

सितैन माव सणवार.

सेवेसी विज्ञापना. आम्हाकडील तोफा चालत नाहीं, म्हणोन लिहिलें. त्यास तोफा चालविल्यावर त्याने दाटी करून पांच हजार पर्यंत चालोन घेतले. तेव्हां तोफा पाठीमागे आणून आम्ही पुढें तोडावर उभे आहों. केवळ गळी पडत नाही. आपणाकडील मार फार जाला. याजकरितां तिकडेहि दाटी केली. आपण खबरदार आहेत. आम्ही होऊन गळी पडत नाहीं. तो चालोन आला तरी आपणांसहि उभे राहिले पाहिजे. मोगल काहावला आहे. आम्हाकडील पंधरा बार पावेतो जाले. आपणाकडीलहि तोफा फार जाल्या. पांच कोस पाणी नाहीं. तोफाच्या मारानें निभाव न होय याजकरितां मुकाम केला. तोफेवर दाटी केल्यामुळें तोफा काढिल्या. आतां स्वस्थ उभे आहों. हे विनंती. स्वामीकडील वर्तमान वरचेवरी ल्याहावें.

¶*Description of an action of the artillery.*

No. 38] [पौ. 29-12-1759

श्री.

पौं छ ८ जोवल रविवार

प्रहर रात्र.

विज्ञापना. रविवार संध्याकाळचा अर्धघटका दिवस वर्तमान. स्वामीच्या फौजा पछाडीकडे होत्या; याजकरितां राजे विठलदास वगैरे सरदार मागे उभे होते; याजकरितां यापुर्वी चिठी पाठविली होती की, लस्करांतून फौजा तयार होऊन बाहीर आहेत. त्यास प्रस्तूत राजे विठलदास व सरदार आपलाले डेऱ्यास आले. किरकोळ स्वार उभे आहेत हे विज्ञापना.

¶ *News of Vithal Sundar's movements.*

No. 39] [पे. 20-1-1760

श्री.

पौ छ १ जमादिलाखर

शनवार.

राजश्री बळवंतराव गणपतस्वामी गो

विनंती उपरी. काल्ही आम्हाकडील तोफांची मारगिरी जाली. गोळे काही कारीगर जाले असतीलसे वाटते. तुम्हाकडे बानमी आली असेल. दुसऱ्या तोफा तुम्हाकडून येणार. त्या अद्याप येत नाहीं; तरी लौकरच रवानगी करणे. राजश्री दमाजी बावास इकडे पाठवावें म्हणोन तीर्थरूपासी बोलिलों; व तुम्हासी बोलिलों आहों. त्यास येथून धर्माजी गोपाळ कारकून पाठविले आहेत. तरी दमाजी बावाची लवकर रवानगी करावी व तोफा आज येत असे करणे. *तुम्हापासी ही तोफाच्या तोटाच असेल यास्तव येकच तोफ मातबर पाठवणे. येथेही एक मातबर मल्लावन या नावाची आहे. दोन तोफा असिल्यास मारगिरी उत्तम होईल. काल्हही मारगिरी उत्तम केली, हे विनंती.

¶ *"The action of our artillery proved very effective yesterday. Send some more guns, at least one if not more. Send also Damaji"—writes Raghunathrao to Balvantrao Mehendale.*

No. 40] [*22-1-1760*

श्री.

पौ छ ३ जमादिलाखर सोमवार

सेवेसी विज्ञापना, आज्ञापत्र पाठविले ते पावले. बुनग्याचा मुकाम फार जवल केला. हे कामाचे नव्हे. पाहटेचे प्रहररात्रीच कूच करून साकुराकडे येक घटका रात्र असता निघोन जाणे म्हणोन आज्ञा. आज्ञेप्रमाणे वर्तणुक करितो. परंतु आज मोगलाने तिन्ही कडे रवेचा मोहरे पाडिला. बातमीचे राऊत वानरेचे पाण्याकडे जातो. याप्रो रोख आहे, म्हणोन सागत आले व येथुनही रोख त्याप्रो च दिसला. त्यावरून पाहता आपले सडे फौजेस बुणगे पाच कोस राहते. इतके दूर राहिल्याने बुणग्यात राउताचा भरणा थोडा. बुणग्याचे सलतान[१] भारी. आटोपून राहावयाची वरचेवर ताकीद करीतो. परंतु जागा पुरत नाही. तीन कोसाचा तल पडावयासि येतो. दूर राहिल्याने रात्रीचा विषय. गलबल जाहल्याने बदोबस्त होणार नाही. बुणगे फुटोन येकेक माणुस येकेक वाटेस होऊन आपले लस्करचेच लुटून नेतील. यामुले सडेफौजेचे दोन कोसाचे अंतरे राहिले पाहिजे. त्याचे हरोलीचा मोहरे दुरचा दिसत होता. च्यार घटका दिवस राहिला. तो पावेतो मुकाम करावयाची चिठीची वाट पाहून मग मुकाम केला. उंटें तटे नित्य उठोन उपासी मरतात. सकालापासून ओझी लादली होती. त्यावरून उतरून कहीस पाठविली तो चिठी आली. उद्यापासून केवल सडे फौजेचे पाठीमागेच चालोन मागे पाचा कोसाचे अंतरे राहत जाऊ. म्हणजे सोईवार पडेल जिवाजीपंत दिा निंबालकर याजबराबर आज्ञा आली की रात्रीचे राऊंत बुणग्यात फार जातात व सडे स्वारीत बटकी उंटे फार येतात. त्यास ताकीद करावी व लोकांची गुरेढोरे गाव लुटितात. त्याची ताकीद करावी म्हणोन आज्ञा. आज्ञेप्रो ताकीद वरचेवर करितो. परंतु बंदोबस्त होत नाही. फारच लुटीचा बोभाट आणितात. कोठे मुदा लागो देत नाही. याचे बदोबस्तास बाहेर राऊत ठेवावा तर अवघा येवज थोडका. यात छबिना व बातमी व डेऱ्याची चौकी व अणखी कामगिऱ्या फार पडतात. पाचसे रावतानी आटोप कसा होतो? दुसरे पाचशे राऊत तेथून पाठवावयाची आज्ञा जाहली तर काही बदोबस्त होईल. नाहींतर होत नाही. मोठे पथके मल्हारराव व सटवोजी जाधवराव व यशवंतराव पवार वगैरे यासी रुबरूच बरेवजेने ताकीद जाहली पाहिजे. पुणेंयाहून दोनसे गोणी दारू व च्यार तोफा त्रिंबक खडेराव याजकडील दोनसे गाडदी घेऊन रेणापुरावर आले आहेत. हे वर्तमान कलताच रातोरात पचवीस राऊत व येक कारकून मोगलाची गाठ पडो न देतां संभाळून आणावया-

१ पसारा, सामानसुमान.

विसी रवाना केले आहेत. इभ्रामखानाकडील जखमी चाकुरास अद्याप जात नाहीं. व पालख्या लोकांच्या व कामाठी बिगारे दिल्हे आहेत ते सोडीत नाहीं. त्यास ताकीद करावी हे विज्ञापना.

¶*The letter mentions the situation of the Maratha forces at Udgir. The writer complains about the lack of discipline among them and asks for severe action.*

No. 41] [*22-1-1761*

श्रीगजानन.

पौ छ १० जमादिलाखर

मंगळवार.

सेवेसी विनंती सेवक मल्हार चिंतामण वाघ कृतानेक सां नमस्कार विनंती विज्ञापना येथील क्षेम ता माघ सुध पंचमी मु॥ लस्कर नजीक वासीम येक कोस मागें जाणोन निजानंद वैभव लेखन करावयास आज्ञा करीत असीले पा. यानंतर येथील वर्तमान तपसिले सांडणी स्वाराबरोबर व जासुदा समागमे सेवेसी लेहून पाठविले. त्याजवरून सविस्तर अवगत जाहलेच असेल. सांप्रत वर्तमान तर रा मुधोजी भोसले याजकडील लोकांचा राडा फार. त्यास कांहीं खर्चावेचास यांनीं द्यावे. ऐसा विचार त्याचा याचे चितात. त्याजकडे लोक जे आहेत त्यास रुपया देऊ नये. जितके फजीत जाले तितके बरे. ऐसा प्रकार. याजमुळे राडा तुटून मजल दर मजल यावें, त्यास विक्षेप पडतो. एतद्विशई कारभारी मातबर अंगावर घेऊन, समयावर दृष्ट देऊन, लस्कर चालवी ऐसा नाहीं. आम्ही जितका वाल्वोध करावयाचा तितका करून कूच करवितों. याचे खासे राहुट्या डेरे मात्र पडतात. वरकड डेरे ढाला तमाम उभ्या राहतात. त्यास लोकांचे डेरियास जातां एक एकासी बोलता तळावरच दिवस जातो. रात्रौ प्रहर दीड प्रहर रात्री गोटास यावे. येणेप्रोंच आज पावतो जाले. जे लोकासी बोलावे तितके लटके. आज कूच करून मजलीस चला, तुमचा फडशा करून देऊं ऐसे बोल्हन त्यात आगत्यगैरआगत्य पाहून रा जानोजीबावा आपले लोकांचा फडशा करितात. परंतु रा मुधोजी भोसले याजकडील लोकांस आईबाप नाहीं. प्रस्तूत रा रघोजी कराडे याचे हाती लागलियासिवाय बंदोबस्त होत नाहीं. ऐसे जाणोन आम्ही रा रघोजी कराडे यास एकांती जाऊन बहुत प्रकारें सांगितले कीं श्रीमंतानी तुम्हांस रा मल्हारबा होळकर आमचे घरी मातबर तैसे तुम्ही या दरबारी मातबर. आमचे लक्ष तुम्हावर आहे. पैवस्ता कारभार

तुमचे मातबरीवर केला. त्याचा परिणाम सिधीस न गेला. प्रस्तूत तुम्ही उभेयतांस वडील. घरचे बारीक बारीक पेच एकीकडे ठेऊन आम्हावर लक्ष ठेऊन चाकरी करून दाखवावी. ऐसे श्रीमंताचा मनोदय असतां तुम्ही मलईत मिळोन आपला स्वरूपनाश[१] करून घ्यावा हे उत्तम नाहीं. आम्ही श्रीमंतास परिछीन लेहून पाठवितो कीं रघोजी कराडे याचे कूच होत नाहीं. याजमुळे रा जानोजी भोसले यास पायबंद बसतो, ऐसे बहुता प्रकारे सांगोन वाटेवर आणून जानोजी भोसले याचे कूचाबरोबर त्यानी कूच करावे ऐसा करार करून घेतला. आम्हापासी दरबारचे कामकाजाचा बंदोबस्त करून द्यावा म्हणोन वचन घेतले. या उपर रघोजी कराडे स्वामीवर लक्ष ठेऊन येतात. रा मुधोजी भोसले याचे येणे जानोजी भोसले याजबरोबर होता दिसत नाहीं. रघोजी कराडे इकडे आले. वराडी पतकेही याजकडेच दोनचार आलीं. राहिली तीही येतील. मुधोजी भोसले हजार दोन हजार काय जे राहतील ते एका दो दिवसाचे आंतरीयानें येतील, ऐसा सुमार दिसतो. एकत्रता लबाडीची ती सेवटास कैसी जाईल? याउपर मजल दर मजल येत असो हे वि (ज्ञापना).

¶*The writer Malhar Chintaman Vagh explains the difficulty which he had in persuading the Bhonsles—Mudhoji and Janoji—to march towards Udgir. Both were suspicious of each other. Raghoji Karande was however after much persuasion prevailed upon to proceed to Udgir with his forces.*

No. 42] *[23-1-1760*

श्री.

छ ५ जमादिलाखर बुधवार

* सेवसी विज्ञापना आज आम्हाकडून तोफाचा मार उतम जाहाला. तीस चालीस बार जाहाले. लक्ष्मीमीचे बार फार कारीगर जाहाले. चंडोलीस हती जखमी होऊन आंबारी उतरून घेऊन हती तेथेच राहिला. स्वामीकडेहि आंतील बातमी आलीच आसेल. मोगलाने आज मुकाम जवल लौकर केला, याचे काये प्रयोजन हे कले नाही. आज तीस चालीस बार पछाडी व डावी बाजूचे रोखे जाहाले. परंतु आजचे बार फार नेटाने जाहाले. परंतु आतील

---

१ दुर्लौकिक. * पत्र दादासाहेबांचें भाऊसाहेबांस.

खबर येईल तेव्हा कलेल. विठल सिवदेव याजकडील जुझहि बरेच जाहाले. तेथे काय खबर आली ते ल्याहावी हे विनंती.

Raghunathrao gives to Sadashivrao an account of the fight on his side and asks for information on the others.

No. 43] [*23-1-1760*

श्रीगजानन.

पो छ १० जमादिलग्वर

मंगळवार.

पुा सेवेसी विनंती सेवक मल्हार चितामण कृतानेक विज्ञापना. येथील क्षेम ताा माघ सूव शष्टी मुा पेणगंगासरद नडसी व वासीम. स्वामीचे कृपेकरून वर्तमान यथास्थित असे यानंतर काली राा मुधोजी भोसले रुसवा करून तळावर राहिले. त्याची समजावीस करावयास राा जानोजी भोसले राहिले होते. रात्री संध्याकाळ पावेतो राहून पंनास हजार रुो त्यास द्यावे. त्यापैकी सात हजार रुो तूर्त पिराजी नाइकाची निशा गाडदीयाची करून दिली. बाकी राहिला येवज वराडप्रांते लाऊन द्यावा ऐसा करार जाला. दोन प्रहर रात्रीस जानोजी बावा लस्करास आले. आज त्याजमुळे मुकाम जवळ पेणगंगेचा तीकोसाचा केला. परंतु याजबराबर येतील न येतील ऐसे आहे. त्याजवळ भाडवल हजार दोन हजार राहिले. बाकी सर्व लोक यांजकडे. देखील राघोजी कराडे आले. त्यास विचार पडला जे याउपर याजबरोबर जातांच बरे. प्रथक गेलो तर फौज कांहींच नाहीं, याजकरितां येतील ऐसे आहे. याउपर गुंता राडा[१] फार करून राहिला नाहीं. मजल दरमजल यावें. सांडणी स्वार स्वामीकडून आले. ताम्राची गाठ पडून युध्य जालें. हे वर्तमान कळलियाउपर यास आम्ही चैन पडू देत नाहीं. स्वामी तर गगास येतील. परंतु येथील कारभार वेस्तविस्ता[२]. भयें प्रीत दाखऊन जे करणे ते करावे लागते. कागदपत्र येतात त्याजबरोबर आम्हास आज्ञापत्र असावे. याचे पत्रात दाखला मलार चितामण मुजरद पो असतां अद्याप येणे होत नाहीं, हे अपूर्व आहे. ऐसे सरकारचे पत्रीं आगत्यरूप लिहिले असावे. म्हणजे आम्ही तातड करूं ते उपयोगी पडते. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ भानगड. २ अव्यवस्थित, व्यस्तावस्थ.

No. 44] *[24-1-1760*

श्रीगजानन.

पौ छ १० जमादिलाखर
मंगळवार.

सेवेसी विनंती सेवक मल्हार चितामण वाघ कृतानेक साां नमस्कार विनंती विज्ञापना. येथील क्षेम ताा माघ सुध ७ गुरुवार मुाा लस्कर पेणगंगा पाा नडसी स्वामींचे कृपावलोकने करून आज्ञाधारकाचे वर्तमान यथास्थित असे. यानंतर येथील वर्तमान तपसीले सांडणी स्वारा बरोबर सेवेसी लिहिले. त्या अलीकडे दोन पत्रे जासुदा बरोबर लेहून सेवेसी रवाना केलीं. त्याजवरून येथील गर्भ[1] सर्व अवगत जाहलाच असेल. सारांश स्वामींचे पायासीं राजश्री जानोजी बावा याचें लक्ष फार. ताम्राची गाठ पडली. रात्रीचा दिवस करून जावें. समयास गेली याने सर्व गोष्टी उत्तम ऐसे जाणोन आपणाकडील लोक राजश्री रघोजी कराडे वगैरे वराड प्रांतीचे राजश्री मुधोजी बावा याजकडे गेले होते. त्यांचे मनोधारण करून सर्व एकत्र केले. राजश्री मुधोजी बावा खासे आपले हजार दोन हजारानसी मात्र निवडले. त्याचीही समजावीस करून समागमे घ्यावे म्हणोन एक दिवस आपले कूच करऊन मागे राहून त्याचे गोटांत जाऊन फारफार रीतीने समजाऊन पनास हजार रुपये त्यास वराडप्रांते देवावे. त्यात तूर्त साता हजारांची निशा[2] गार्दी याची पिराजी नाइकांची करून दिल्ही. त्यांनीही कूच करून यावें ऐसा करार करून घेऊन आपण दो प्रहरा रात्रीस आपले गोटास वासीम नजीक मुकामास आले. त्याचे दुसरे दिवसी पेणगंगेचे मुकामास आले. अद्याप ते मागोन आले नाहीत. त्यांचा मार्ग पहावा तर क्षेपनिक्षेप समागमे येतील, ऐसा भरवसा दिसत नाहीं. आम्हासी तर राा मुधोजी भोसले यानी करार शफथपूर्वक केला आहे कीं श्रीमंता पासीं याचे अगोधर एक दिवस अगर मागोन एक दिवस अगर समागमे येऊन पोहचतो. पुढे परिणाम श्रीमंत जसा लावतील तसा सुखरूप लाऊत. सारांश त्यांचा मनोदय ऐसा होता जे आपल्या कडील लोक जे आहेत त्याची समजाविसी आपण सांगो तैसी करावी, म्हणिजे लोक आपले लगामी राहतील. यासही भारी लोक ही रजावंद. श्रीमंतापासीही लौकीक की फौज मुधोजी भोसले याची फार. ऐसा प्रकार करून दाखवावा ऐशास राजश्री जानोजी बावा याची मर्जी. आम्ही हे एकत्र जालों; द्वैत उडालें. तेव्हां यानी आमचे डेरियाजवळ डेरा द्यावा. लोकांनी आपलाले मिसलीस उतरावें, म्हणजे एकत्रता खरी. लोकांची समजावीस करावी; हे मुधोजी बावाचे मर्जीस न ये. संशय परस्पर पूर्ववत प्रमाणेच धरून वचकोन दूरूनच लोकांची समजावीसी करून घ्यावी; ऐसा प्रकार

१ भावगर्भ. २ जामिनकी पटविणें.

दिसोन आलियानंतर रा। रघोजी कराडे याजकडे आम्हास पाठऊन त्यास बहुता प्रकारे वाटेवर आणिले. सर्व निमित्य श्रीमंताकडे जावयाचे तुम्हामुळे पडते. ऐसे आम्ही बहुता प्रकारें उमजऊन श्रीमंताचे लक्ष तुम्हावर. तुम्ही मलईत[*] याउपर मिळोन समयास अंतरावें. येणेकरून परिणाम सुधानाहीं. स्वरूपनाश मात्र आहे. श्रीमंतानी आपले दरबारी मल्हारजी होळकर तैसे तुम्ही या दरबारी मातबर, ऐसें म्हटले असतां तुम्ही लक्ष न राखावें. तेव्हां पुढें काय विचार? तेव्हां त्याणीहि स्वामीचे चरणावर लक्ष ठेऊन मलई सोडून रा। जानोजी बावा याजकडे तमाम तिकडील लोकसुधां येऊन सामील जाले. याउपर येथील फितूर राहिला नाहीं. दहा हजार फौज चांगली जमा जाली आहे. बारीक बारीक प्रकार सर्व सेवेसी आलियानंतर निवेदन होतील. सरकारची दोन आज्ञापत्रे पावली. सांडणी-स्वाराबरोबर आज्ञापत्र नवतें. सेवकानें सेवा करावी. विसाजीपंत जोग याचे मामलतीचा कारभार विल्हे लागला नाहीं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Nos. 43 and 44 are two more letters of Malhar Chintaman Wagh describing the differences between Janoji and Mudhoji Bhonsle.*

No. 45] [*24-1-1760*

श्री.

छ ६ जमादिलाखर.

सुक्रवार.

सेवेसी विज्ञापना रा। दमाजी गायकवाड यासी रा। लक्ष्मणराव खंडागळे याणी गंगेच्या काठीं लुटून घेतले. सर्व घोडेपिढे नेले. जखमा खाशास लागल्या आहेत. तेथून परेलीच्या घाटे चढोन दीड कोसावर राहिले आहेत. खंडागळे जोगाईचे आंब्यावरून येत आहेत. बुणग्यात फौज नाहीं तर लवकर दोन हजार फौज बुणगीयाचे रखवालीं [स] पाठविली पाहिजे. येक दोन दिवस राहून त्याचा शह टळल्यावर फिरोन माघारी जाईल. गायकवाडाची बातमी रा। कृष्णाजीपंताचे राऊत घेऊन आले. त्यावरून सेवेसी सुचना लिहिली असे. आजचा मुकाम जोगाईचे आंब्यावर आहे, म्हणोन बातमी आली. आमचा मुकाम आजचा मौजे वाम्हणीचे अलीकडे कोसावर येऊन आज्ञेप्रो केला आहे. राऊत † सत्वर आलीयास बरे आहे. रा। छ ५ जाखर तीन घटका रात्र आवर्साची हे विज्ञापना.

¶*Nana Fadnis' letter about Damaji Gaikwad having been plundered.*

---

* बंडखोरी † पत्र नाना फडणविसांचें, असें यापुढील अक्षराच्या वळणावरून म्हणावें लागतें.

No. 46] [25-1-1760

श्री.

छ ७ जंमादिलाखर

शनवार

सेवेसी विज्ञापना जे. खडागल्याचे बातमीकरिता स्वार पाा होते. त्यासी अजी शुक्रवारपरियेत जोगाइचे अब्यास तो आला नाही. तेथे बातमी लागली की सुक्रवारचा मुकाम धारूरचा आहे. याउपरी पुढे कोणत्या रोखे लस्करास सामील होईल ते पाहावे. याप्रमाणे बातमी आणविली आसे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना

¶*News in continuation of the previous letter.*

No. 47] [25-1-1760

श्री.

छ ६ जमादिलाखर

शुक्रवार

*शेवेसी विज्ञापना. चिठी पाठविली ती पावली. खंडागल्याची बातमी आणवणे म्हणून आज्ञा. त्यास कालच राऊत कृष्णाजीपंताकडील पाठविले आहेत. बातमी आली म्हणजे लिहितो. बुनगे फार लांब राहू नये. आम्हापासून दीड कोस-पर्यंत लांब असावे म्हणजे ठीक पडेल. ऐसियास बुनागियाचा कारभार अनिवार. रव पडणे ते तीन कोस पावेतो मनास येईल तिकडें जातें. ताकीदही करितों; परंतु अनिवार. उपाय नाही. याजकरिता यवनापासून चौहू पाचा कोसावर राहिल्यास ठीक पडेल. याहून जवळ राहिल्यावर गाठ पडेल ती काय कामाची. व आपली चिठी येते त्याच सुमारे राहातो. परवाचे दिवसीमात्र गुता पडला होता. याजकरिता लांब पडलो. जसी आज्ञा त्याप्रों करू. आज भातागलीवर नदीकाठी यावें. मग मोगलाचा रोख कलेल. त्याप्रो मुकाम करावा. त्यास भातागली येथून कोसभर आहे. तेथे येतो. पुढे चिठी येईल त्याप्रो राहू. येसाजी भगवंत यास चिठी लिहीली होती. ते त्यास बोलाऊन आणून दिल्ही. त्यास सागितलें कीं सत्वर जावें. त्यानी प्रतिउतर दिल्हे की शरीरी समाधान नाही. याकरिता आज जावयाचे न बनेल असे आहे. उदईक जाऊ. त्यास सागितलें की, काही ल्याहावयाचा मजकूर असला तर श्रीमंतास ल्याहावा. त्यास ते म्हणाले की काही नाही. मुकामाची चिठी सत्वर आली पाहिजे. रा छ ६

---

*. सबंध पत्र नाना फडणविसाच्या हातचें आहे.

जाखर बारा घटका दिवस प्रातःकालचा हे विज्ञापना. रात्रीस चौकीस राघो केशव राऊत मुधा जोगाईचे आंब्याचे वाटेवर पाठविले होते. हे विज्ञापना. हणमंतराव कोठे आले हे मशारनिलेस पुसलें. त्यानी सांगितले की आमची बानमी काही आली नाही. परंतु धारूरास आले आसे लोक म्हणतात. याप्रों सांगितले हे विज्ञापना.

¶*News-letter from Nana Fadnis.*

No. 48] *[25-1-1760*

श्री.

छ ७ जमादिलाखर

सितैन शनवार

सेवेसी विज्ञापना. प्रातःकाली आज्ञापत्र पाठविले, तेथे आज्ञा की, सडेस्वारीचे पाठीमागे येऊन कोस दीड कोसाचे अंतरे राहणे. त्यावरून कूच करून अर्ध कोस आलो. तो दुसरी चिठी आली की, भातागलीजवळ मुकाम करणे. आज्ञेप्रो तेथे मुकाम करावा; त्यास पाण्याची सोई नाहीं. त्यामुळे अलीकडे अर्ध कोस येऊन वानरेचे काठी भातखेडलेयावर येऊन मुकाम केला. रा छ ६ जाखर तीन घटका दिवस संध्याकालचा. हे विज्ञापना.

¶*The writer says that he could not encamp near Bhatagali owing to scarcity of water. He has therefore encamped at Bhatkhedle on the Manjra.*

No. 49] *[24-1-1760*

श्रीशंकर.

छ ६ जाखर सितैन

सेवेसी विज्ञापना. शुक्रवारी प्रहर रात्रीस दरवेशमाखां बाहादूर येऊन राजश्री महिपतरावजीस घेऊन गेले. सेवकहि समागमे गेलो. निजाम आलीखानाची भेट जाली. घटिका दोन बसून राजाजीस अज्ञप्राने बोलून त्याचे हाती दिल्हे. वगैरे मजकूर आज शनवारी मुकाम जाला. राजाजीही कबूल केले आहे की येका प्रहरांन उरकून आजच त्रितीये प्रहरी आज्ञा देवावितो. हेहि पुढे बेदरचे

रोहके कूच दरकूच जाणार. नकल कागदाची जाली आहे. काही थोडीसी राहिली, ते दो चौ घटकात सिध करून रवाना करितो. सविस्तर राजश्री महिपतरावजीहि विनती लिहीली आहे. त्याजवरून श्रुत होईल. बहुत काय लिहीणे * * *

¶*News of negotiations started by the Nizam.*

No. 50] [*25-1-1760*

श्रीगणराज.

पौ छ १० जमादिलाखर
मंगलवार

* सेवेसी गोपाल गोविंद कृतानेक. साष्टांग नमस्कार विज्ञापना ताा छ ६ जााखर माा नगर स्वामीचे कृपें करून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. छ २९ जाावलचीं पत्रे आलीं. त्यांत तोफांचे गोल्यानी रेणुकादास व दोन हती ठार जालें, म्हणून श्रीमंताचे पत्री लिहिले होते. मोंगल बहुत घाबरा जाला असेल. याप्राा गोले लागू जाल्यास मग कलतच आहे. लडाईचे प्रसंगी सेवकाने संनिध असावे, सेवा चाकरी करून दाखवावी, बहूत मानस होते. परंतु योग बनोन न आला. सेवकाने बहूत आग्रह करून निरोप मागितला. परंतु निरोप न होय. प्रस्तुत श्रीमंताची शरी [र] प्रकृत बरीसी दिसते. याच प्रकारे प्रकृत ठरल्यास भगवंत कृपा करील. स्वामीकडील पत्रे बरचेवर येत नाहीत. यास्तव चिंता करीत असतात. दररोज पत्र दिनचर्यचे लिहावया आज्ञा करावी. * * ची फौज प्रस्तुत दीड हजार पावेतो आहे. आणखी हजार पावेतो येतील. सेवेसी विदित होय हे विज्ञापना.

¶*Letter by Gopalrao Patwardhan to Bhausaheb, regretting that he has not been allowed by the Peshwa to join in the struggle and saying that the Peshwa was improving in health. This is an important information, which shews that Peshwa Nanasaheb was already losing health and that fears were being entertained on that account.*

No. 51] [पौ. *31-1-1760*

श्री.

पौ छ १२ जमादिलाखर

* सेवेसी विज्ञापना मोंगलांसी जुझावयाचा विचार कोणते दिवसी, कोणते समई आपण केला असेल तो लिहून पाठविला पाहिजे त्याप्रमाणे सिध आहों.

दोन तोफा आम्हाबरोबर ठेवावयाची आज्ञा जाली आहे. याजकरितां गंगाधर परशराम याचें लोक व गाडदी त्याचे व त्याजकडीलच दोन तोफा ठेऊन घेतों. वरकड तोंफा गाडदी महिपंतरायाकडील त्र्यंबक खंडेरायाकडील सर्व सेवेसी पाठवितो. यैसे करितां गंगोबाच्या देखील दोन्ही तोफा व त्याचेहि गाडदी सारेच पाठवावयाची आज्ञा जाली, तरी तेही पाठऊन देऊन. जैसी मर्जी असेल तैसी आज्ञा करावी. जेवेळेस निश्चये लढाईचा ठरेल त्याची चिठी आम्हांस आगोधर पावली पाहिजे. आम्ही तयार आहो. आम्हास एक दिवस आगोधर सूचना ठीक कळली पाहिजे की यावेलेस उठावे. मग च्यार घटका अलीकडे किंवा पलीकडे लागोत. परंतु अमक्या दिवसीं, अमक्या वेळेस हा आजमास ल्याहावा; म्हणजे जपोन राहून जे होईल ते करूं. आज रात्रौ मोगलावर बाण टाकावे; करोलानी सडकावे; वगैरे तरतूद करितो. ईश्वरी दयेनें थोडे बहुत साधेलसे वाटते. कळावे हे विनंती:

¶*Raghunathrao asks for the exact time at which he is expected to attack.*

No. 52] [*26-1-1760*

श्री.

छ ७ जमादिलाखर
शनवार

सेवेसीं विज्ञापना बसालतजंग कोठें आलें हे बातमी वरचेवर राखत जावी. जवलपास आल्याम सडी फौज त्याजवर पाठऊन तिकडेंच पारपत्य करावें. मोंगलाची गुंजे[१] बलावली म्हणजे भारी पडेल. निंबालकर दोवें व खंडागलें कोठें आहेत. फौजा कोणें ठिकाणीं आल्या हे बातमी आपण राखत आहेतच. *परंतु सूचना लिहिली आहे. स्वामीची तर्तुद उत्तमच आहे; तथापि लिहिले असे हे विनंति

¶*Letter of Raghunathrao to Bhausaheb suggesting him to dispose of Basalat Jung before he joined the main army of the Nizam. It is significant in what awe the writer holds the addressee.*

---

१ जमाव.

No. 53] [27-1-1760

श्री.

छ (८) जाखर

रविवार

राजश्री सखाराम भगवंत स्वामी गो यासी
सखाराम नसले तरी बळवंतरायासी गो यासी

विनंति उपरी. खर्चास यैवज तीर्थरूप राजश्री भाऊसाहेबानी पाउण लक्ष देविले; त्यापैकी दाहा हजार बाबूजी नां याजकडून देविले. बाकी पांसष्ट हजार; त्यांत चालीस हजाराचें होंन पंचवीस नख्त त्यांत दाहा बागडकोटी, पंधरा आरकाटी, येणे प्रो यैवज आला. त्यास आठवडां व गाडदीं वगैरे खर्चास होन उडोन गेलें. अद्याप आठवडा पुर्ता जाला नाहीं. पंचवीस हजार रोख आहेंत. तेवढे लागतील. यास्तव तुम्हास चिठी लिहिली असे. तरी तीर्थरूपांजवळ या प्रमाणें सांगोन आणीख काही यैवज मागोंन घ्यावा. पोंटास फौजेस व गाडद्यास जरूर दिल्हे पाहिजे. यास्तव यैवज पाठवावा आठवडी व दरमहा वगैरे खर्च नेहमी आहेच. या खेरीज ऐवज किरकोलही जखम्यास व पडल्या घोड्यास जरूर जरूर लागतो. यास्तव ऐवज आणीक पाउण पावेतो मागणे; म्हणजे पंधरा दिवसाची बेगमी आम्हाकडे सरासरी महिन्यास दीढ लक्ष रुा पाहिजेत. सरासरी आजमास लिहिला आहे. तीर्थरुप नाना स्वामीसही ऐवजाविसी येक दोन पत्रे पाठविली आहेत. तिकडून ऐवज येईल त्याचाहि जाब काल आला आहे कीं जितकी तर्तूद होईल तितकी करितो. त्यास ऐवजाचा तोटा फारसा पडणार नाही आम्हाकडे महिना दीढ लक्ष पाठविल्याने पुरेलसे वाटते. परंतु होनाचे नाणे फार; याजमुले पंचवीस अधिकच लागतील आजमास लिहिला आहे. पावणे दोन पावेतो पाहिजेत. कागद तीर्थरुपास दाखवणे. दमाजी गायकवाड व रायाजी पवार व तोफ मातबर येक ऐसी घेऊन येणे हे विनंति. दमाजी रायाजी आले म्हणजे भाऊसाहेबी आगाडीचे आगे आणीक येक टोली करावयास लिहिले आहे. तेथे धोंडो दत्तात्रय व बाजीराव गोविंद नेमिले; तेथेच ही दोन्ही पथके राहातील तीन च्यार पथकाची निराली टोली आमचे डावे हाते राहील. या प्रो बंदो बस्त करू हे विनंति.

¶*The writer asks funds from the headquarters of Bhausaheb. The addressee Sakharam Bapu appears to be with the Peshwa at Nagar. He also communicates the Maratha disposals. The letter appears written long before the date of receipt fixed at the top.*

No. 54] [28-1-1760

श्री.

पौ छ ९ जाा वल

इंदुवार दोनप्रहर

विज्ञापना. छ ९ जमादिलावल सोमवार प्रातकाल दोन घटका रात्र असतां कुच्याचा नगारा जाला. लस्करची तयारी होत आहे. या दिवसांत आमके जागा मुकामास जातात हे कलत नाहीं. येकीकडे रूख दाखवितात; येकीकडे चालतात. श्रीगोंद्यास जावें हा येक मार्ग आहे. तेथील मोठा भ्रम आहे. आज पाहावे कोणत्या मार्गे जातात; कोणता रुख धरितात. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*This appears to be a news from the enemy's camp.*

No. 55] [29-1-1760

श्री.

पौ छ १० जमादिलाखर

मंगलवार

सेवेसी विज्ञापना. चिठी पाठविली ती पावली. आज्ञे प्रमाणेच आमचे चितांस आलें. परंतु आमची फौज थोडी. आमचे लोक कितीक आले नाहींतच, याजकरितां आम्हाकडील पथकें शंकराजी घोरपडे, दमाजी गायकवाड, रायाजी पवार तिकडे आहेत. त्यास क्षेपनिक्षेपें[1] आज्ञा करून इकडे रवाना करावे. दुसरें दुमदारीस[2] बाबुजी नाईक दमाजी गायकवाड यास उठवावे. त्यास हे आमच्या विचारें येत नाहीं. येक आंग पाठीमागील मोकळे त्यास असावे; म्हणजे जो निघेल त्यास खाली जागा असावी. आम्ही मोगलाचे डावे बाजूस तोफखानीयास लगतेच उठूं. आमच्या उजविया हातेंच डावेच बाजूस नाईक व दमाजी गायकवाड उठवावें. केवळ पाठीमागें पछाडी खालीच असावी. श्रीकृपेने आगाडी बंद होईल. उजवे बाजूस आपल्या फौजाचे नेट बसले. डावे बाजूस आम्ही नाईक, दमाजी मुधां नेट पडेल. तेव्हां येक आंग पछाडी खालीं असावी. येस आमच्या विचारें आहे. कितीक गरीब किरकोळ पलतील त्यास एक वाट असावी. मार्गच बंद जालिया माणसास निदान पडते. तेव्हां गरीबासुधां नेट करणे प्राप्त त्यास होतें. याजकरितां पछाडी खालीं असावी. घोरपडे, पवार,

---

१ निश्चून, टाकोटाक. २ दुमदारी=पिछाडी.

दमाजीबावास सत्वर पाठवावे. दोन तोफा देखील आम्ही येथें ठेवित नाही. सारीच तोफा गाडदी तिकडे पाठऊन देतो. आपले विचारें पछाडीसहि थोडीसी फौज असवीच; तरी दमाजी गायकवाड, मल्हार नाईक उभयेतांस पछाडीस उठवावे. परंतु बाबूजी नाईक तर आम्हाजवळ आमचे उजवे बाजूस असावे. निशाणाजवळ नाईकीचा माणूस मातबर नाहीं तर सकराजी घोरपडे यासी जरूर जरूर पाठवावे. एक जुज जाहलियानें सर्वहि आभास कलेल. उत्तर आले म्हणजे तोफखाना गाडदी पाठऊन देऊ; हे विज्ञापना. बाबुजी नाईक याचे विचारें एकदा जुजल्याखेरीज निजामअलीचीहि हिमत तुटणार नाहीं. हे विज्ञापना. जुझहि करणे तरी त्रयोदशीस करूं नये. तो दिवस स्वामीस व मला वाईट. कळावे हे विनंती.

¶*The arrangement of the various divisions of the army and also the moves and the countermoves are given in this letter.*

No. 56] [*29-1-1760*

श्रीशंकर.

पौ छ १० जमादिलाखर
मंगळवार

सेवेसी विज्ञापना. जुझाचे मजकुराचे पत्र पाठविले, ते पावले. आम्ही प्रो सिध आहो. उद्या बुधवारी करूं नये. गुरुवारी अथवा शुक्रवारी बरे आहे. जसे मर्जीस येईल तसे ल्याहावे. अमक्या दिवसी असे ल्याहावे, म्हणजे तयार आहो. हे विज्ञापना.

¶*The handwriting appears to be of Raghunathrao who advises Sadashivrao on astrological grounds not to begin the action " to-morrow Wednesday ".*

No. 57] [*29-1-1760*

श्रीगजानन.

पौ छ १० जमादिलाखर
मंगळवार

पु॥ सेवेसी मल्हार चितामण सां नमस्कार. रा। मुधोजी भोसले याजकडील लोक इकडे आले हजार दोन हजार ते राहिले. तेव्हा मागे राहून एकले जावे, ते केवळ फिके दिसोन येते. पंनास हजार रु॥ देऊ केले. हे राहतील ऐसा कितेक विचार करून येथून दो कोसावर येऊन राहिले. उदईक येथें येणार. दोन

मजली मागे गहिली होते, ते दो कोसावर आले. त्याजकरितां मुकाम करावा ऐसा याचा विचार. परंतु याउपर हे मुकाम करून राहतील तर यासी बेमुरवत होऊं. यास विना वाईट बो[ल]ल्याशिवाये उमज पडत नाहीं. यैसा प्रकार येथील. याजकरितां जसा प्रसंग पाहावा तैसी वर्तणुक करावी. याउपर थोडे बहुत कांही मिळवावयाची ही आशा प्राप्त जाली आहे. यविशईचेहि आम्ही जे बोलणे ते बोलिलो आहो. त्यास चालते मजलीस जे येईल ते घेऊं. यैसे शफतपूर्वक बोलतात. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. येथील शफतेचे प्रमाण वचनाचे प्रमाण येकंदर नाहीं. कुवेभाग (= वाईट चाल?) पडली आहे. अवघा गवगवा. रोज लोकांनी ढाला डेरे जागा जागा उभे करून राडा करावा. याउपर याणी रोखे-पत्रास प्रारंभ केला आहे. आज सिरपुरचा रोखा माघारा फिरला; म्हणून तोफा रवाना करितात. आम्ही जाऊन आडथळा केला कीं, तुम्ही तोफा रवाना करितां, तेव्हा तुमचे मनांत कृत्रिम आहे. लौकर जावयाचें नाहीं. ताम्रासी तुम्हांसी अंतरयामी सख्य आहे हें खरे. श्रीमताचेही चितांत तुमची यैसी जलदी पाहून सर्व गोष्टी विपर्यास येतील. परिणाम सूध होणार नाहीं. यैसें बहुता प्रकारें सांगितले. त्यांस त्यानीं उतर केले कीं लटका दबाव पडावा, म्हणून तोफा रवाना करितों. दोन कोस तोफा गेल्या नाहीत, तों जमीदार भेटीस येतील. आम्हास आपले बरे समजत आहे. तुम्ही जलदी करितां, ते आमच्याच बऱ्याची. रातचा दिवस करून जाईन तर मी जानोर्जी भोसला; ऐसी बोलणे मात्र बोलतात. परंतु दिसोन कांहाच येत नाहीं. रा मुधोजी भोसले आजच लस्कराजवळ येऊन उतरले. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *The wavering state of mind of the Bhonsles of Nagpur is well described here.*

No. 58] [पौ. *30-1-1760*

श्री.

पौ छ ११ जमादिलाखर

बुधवार.

* विज्ञापना सखारामपंत आले. सर्व कललें. यैशास[१] आज मोगलाचें कूच जालें होतें. परंतु मुकाम जाला. यैशास गाडदी व तोफा येथून रवाना कराव्या. त्यास अज जरी केल्या; तरी संशय अविश्वास होईल. याजकरितां सकालचे कूच होताच

* सबंध पत्र राघोबाच्या हातचें. १ यैशा=औशा—(गांवाचें नांव).

तोफा दुमदारीनेच काढून आपणाकडे गाडदीसुधा येतील. वरकड तोफखान्याचे डावे बाजूस आपण उठावे. उजवेकडे आम्ही आहो, मल्हारराऊ[1] गायकवाड दुमदारीस आसतील. निश्चये आपण केलाच आहे. या प्रमाणे करावें. गुरु, शुक्र, शन, तीन दिवस बरेच आहित. त्यात जे वेळेस आपण उठतील तेच वेळेस आम्हीही उठू. आम्ही अज जुना तळ सोडून आगाडीचे रोखे येऊन राहिलो. उदईकहि याचप्रो आपणहि रहावें. म्हणजे जुझास सोये पडेल. पुढें जुझ करणे. मागें आगर बाजूस राहणे लांब पडतें. याजकरितां आगाडीच्या सुमारेच रा (?) दोन रोज राहावे. विठलपंतास बलावणे आले. त्यासी त्याजकडे छबिना आहे. संकालीच येतील. हे विनंती. जुझाचे निश्चयास्तव बलावले असेल. तरी सविस्तर ल्याहावे. त्या प्रोच अमलांत येईल. जरूर बलावावयाचे असेल, तरी सकाळी येतील. हे विनंती. तोफा पिछाडीने पाठऊं अथवा आगाडीने पाठऊ. बनेल तिकडून इभ्रामखान, केशवराव [पानसे] येतील. तिकडे पाठवितो, हे विनंती.

¶*Raghoba suggests the right moment to attack the enemy.*

No. 59] *[30-1-1760*

श्रीशंकर.

पौ छ ११ जमादिलाखर

बुधवार.

*सेवेसी विज्ञापना. स्वामीनी लडाईचे वर्तमान लिहिले, ते कळले; व तीर्थरूप नानासाहेबाची पत्रें पाहावयास पाठविली ती पावली वाचून पाहिली. ऐसीयासी जर जुझ न केले तरी सिपायगिरीस उचित दिसत नाहीं. तिहि पक्षानी मोगल बुडिवासाच आहे. परंतु सिपाईगिरीचे तेज फार आहे. ऐसीयासी केवल सफेजंगी जेव्हा करणे तेंव्हा करावी. परंतु तूर्त योजिला प्रकार गुरुवारी अथवा शुक्रवारी केल्यास बरेच आहे. तोफखान्याच्या डावे बाजूस मोगलांचे उजवे बाजूस स्वामीची फौज. आमची तोफाचे उजवे बाजूस, मोगलाचे डावे बाजूस याप्रमाणें उठावे. मागे दमाजी व मल्हार नाईक[2] उठवावे. त्या आलिकडे बाबुजी नाईक आमचे उजवे हाते; याप्रमाणें बंदोबस्ती करितों. दमाजी गाईकवाड

---

१ दमाजी गायकवाडाचा पुतण्या. २ रास्ते.

व[1] शंकराजी घोरपडे व रायाजी पवार पाठवावयाविसी दोनतीनदा लिहिले; परंतु त्याची रवानगी न जाली. तरी ऐसे न करावे. अगत्य अगत्य शंकराजीस लवकर पाठवणे. त्या खेरीज मातबर माणूस आम्हाजवळ कोणी सिपायात नाही. स्वामीजवळ पाटणकर आहेत. घाटगे वगैरे आहेत. आम्हाकडील पथके मातबर कोणी आले नाहींत. महादाजी नाईक वगैरे अद्याप आले नाहींत. यास्तव जरूर पाठवावे. त्याचे मनात नसिले तरी स्वामिनी त्यास समजाऊन पाठवावे. तेहि यावयास अंतर करणार नाहीत. जसे स्वामीचें मर्जीस येईल, तसे करावें. आमचा आग्रह नाही. कोणीकडून तरी काम जाले म्हणजे उत्तम. आम्ही जितकी सिपायगिरी होईल तितकी करीतच आहो. फळदाता ईश्वर आहे. स्वामीचे पुण्य मातबर आहे. तरी ईश्वर कृपा करीलसे वाटते. निश्चय कोणता तो पत्री ल्याहावा. अमक्यावेळेस हेहि ल्याहावे. आज मुकाम जाहला. बहुधा सलाबत-जंगाचे ओर्डीमुळें जाहला असेल. हे राजकारण जाहले तरी फारच उत्तम. मग सहजातच होईल. स्वामीच प्राक्तनवान आहेत. सर्वहि सुगमच पडेल हे विनंती

¶*Raghunathrao suggests to Bhausaheb to bring into execution the scheme already planned and to defer for some time a strong attack. The respectful attitude of Raghunathrao towards Sadashivrao is also apparent.*

No. 60] [पौ *1-2-1760*

श्री.

पौ छ १३ जाखर सितैन

शुक्रवार

सेवेसी विज्ञापना. आम्ही तो काल मोगलापासून फार दूर राहिलो. पाणी मधे नाही. याजमुले लाब राहावे लागले. आता प्रहरा दिवसा येऊन पोहचतो. मुहूर्ताचा मजकूर

पाच घटिका सकालच्यापासून दहा घटिका मध्यम मुहूर्त आहे.

दाहा घटिकापासून पंधरा घटिका पावेतो फारच उत्तम आहे.

पधरा घटिकापासून दोन घटिका मधम.

येणे प्रमाणे आसे. तोफाखाना आघाडीस नेमणुके प्रमाणे सुरू करावा. उपरात ते चालून येतील. तेव्हा दुतर्फा लडाईची उठावणी करावी. याप्रमाणे असे. त्रिंबके[2] खंडेराव व महिपतराव येऊन पावतील. आम्ही प्रहरा दाहा घटीकाने तोफाचे

---

१ धारकर, यशवंतराव पवाराचा धाकटा भाऊ. २ ओढेकर.

उजवे बाजूस येतो. येकसमयावछेने काम करावें. वरचेवरी साडणी पाठवीत जावी. आज जुझ ईस्वरी कृपेने मातबरच करितो. दमाजी गाईकवाड व बाबूजी नाईक आमचे उजवे हाते पछाडीसचे बाजूस उठवितो. फलदाता ईस्वर आहे. आमचे जागे थोढा असला तरी तोफा मारू. आणि पछाडी करून सारीच उठावणी करू. कलावे स्वामीनीहि असेच करावे. वरचेवरी बातमी पाठवावी. नजरानजर जाहाली तरी फारच चागले. फारकरून तोफाचे दोही बाजूने दोन्ही फौजा उठाव्या, हा विचार बरा. ईश्वर घडून आणवील ते खरे. हे विनती. १

¶Raghunathrao writes to Sadashivrao astrological aspects of the right time for attack and then gives his boastful determination to give the enemy a fierce fight. He also gives the arrangement of his army.

No. 61] *[Feb. 1760*

श्री.

विनंती उपरी. पहिला आमचा तळ होता, तोच बुनगे सुधा उतरावयास अनकूल होता. अतां तीन कोस येथून घाट पडला. या करिता कूच करून घाटाजवळ बेटातच यावे लागले. याकरिता कूच केले. बेटात जाऊन बुनगे उतरावयास लावितो. आज दोन प्रहरपर्यंत फौजच उतरेल. लोक फार राहिले होते. नावा विशी कोण्ही कजिया न करीत ते करावे. राजश्री तात्यास सागून पाठवावें; आम्ही झाडून उतरू, तेव्हा त्यानी उतरावे. त्यास अवरोध आहे, आणि आमचे त्याचे धड एकाचे उतरणे होणार नाही. एक हाती काम फार; दरमहाचा व आठवड्याचा रोजमरा न द्यावा ऐसे आपले चिती; परंतु गोपाळपंती सांगितल्यावरून आपल्यास पैका आकार कसासा वाटला असेल. तूर्त दाहा पांच आले असले तर त्याजकडे खर्च व चौथाई तिकडे लोक गेले त्यास नेमली आहे. आणि दाहापाच जाले तर यावयास पाच सात रोज पाहिजेत. आला आधिक आगळा ऐवज तर सांगू; तुम्हासही लागला तर देऊं; त्यासही पंधरा रोज तरी लागतील. याकरितां हा दरमहा चा रोजमरा व एक-आठवडा द्यावा. निदान कर्जाऊ तरी द्यावे. आनमान न करावा. बहुत काय लिहिणे हे विनंति.

¶The whole letter is in Vithal Shivdeo's handwriting. He makes certain suggestions of strategical importance.

No. 62] [पौ 1-2-1760

श्री.

छ १३ जाखर सितैन.

*सेवेसी विज्ञापना, मोगलाचे आघाडीस डेसण[1] पाहून तोफाची मारागिरी करावी. दुतर्फा फौजा तयार लगत्याच अर्तील सोय पडल्यास घोडे घालावयास जपून असावे. इकडील फौज तयार होऊन आघाडीचे बाजूस लौकरच येतो. सारांश मोगलाची वाट धरावी. ओढा नाला पुढे देऊन, आगाडीस तोफखाना पसरावा. त्यामागे फौज बंदोबस्ताने आसावे. याप्रो दोन च्यार दिवसात ज्यास * * * * ते करावें. हे विज्ञापना

¶*This is a letter of Raghunathrao to Sadashivrao.*

No. 63] [1-2-1760

श्री.

छ १३ जाखर सितैन.

सेवेसी विज्ञापना. आज्ञापत्र पाठविले. तेथे आज्ञा की, प्रात:काली कूच करून लादून राहाणे. गऊत पाठऊन बातमी राखीत जाणे. येथून चिठी जाईल त्या प्रो मुकाम करणे; म्हणोन आज्ञा. आज्ञेप्रो कूच करून लादून राहातो. मोगल कोणीकडे जातो; त्याची बातमी येईल, व आज्ञा मुकाम करावयाची येईल त्याप्रो मुकाम करू. रा छ १३ जाखर हे *विज्ञापना.

No. 64] [1-2-1760

श्रीशंकर.

छ १३जाखर सितैन.

सेवेसी विज्ञापना. फार वेळ जाहाला. याजमुळे फौज विसकटत चालली. सकाळी आपले तोफाची बातमी राखुन मोगलाने आगाडी फिरविलीसी वाटते. आत आपली तोफ लागू जाहाली असेल. पुढे जसी आज्ञा तसे ल्याहावे. हे विनंति.

---

१ मान्याची जागा. * पत्र नाना फडणीसाचें.

No. 65] [1-2-1760

श्री.

पै वस्ती छ १४ जाखर

सितैन शनवार.

सेवेसी विज्ञापना. आज्ञापत्र पाठविले. तेथे आज्ञा की, लादून तलावरच राहाणे. मोगलाचे चालीचा रोख कोणीकडे होतो तो रव पडलियावर तुम्हास लेहून पाठऊ. त्याप्राो कूच करून जेथे लेहून जाईल तेथे मुकाम करणे म्हणोन त्यावरून संध्याकालचा पाच घटका दिवस पावेतो चिठीची वाट पाहिली. परंतु चिठी आली नाही. मोगलाचे कूच होऊन पश्चमेचे रोखे गेला. यैसी बातमी आली. त्यावरून तलावरच मुकाम केला. याउपर चिठीची वाट पाहावी तर येथून कूच करून गेल्यास तीन कोस अलीकडे कोठे पाणी नाही, दिवस थोडका राहिला. कूच केल्याने गलाटा होईल. याजकरिता चिठीचा उजूर न धरिता मुकाम केला. उदईक कूच करून कोणत्या रोखास यावे त्याची आज्ञा जाहाली पाहिजे. *राा छ १३ जाखर हे विज्ञापना

¶*The writer Nana Fadnis gives information about the movements of the army of the enemy and asks for orders for further action.*

No. 66] [पाौ 2-2-1760

श्री.

छ १४ जाखर

माघ सितैन.

*सेवेसी विज्ञापना. मोगलाचे आघाडीस दोन्ही फौज आपली व आमची राहावी. तोफखाना आघाडीस लागू करावा. तेव्हा तो चालून घेईल. उपरात घोडे घालावयास उतम आहे. आथवा तोड चुकावेल तरी उतम आहे. दोन्ही फौजा येकत्र लगत्या असल्यास, काम मातबर होईल. मोगलापासून कोस दीड कोस रात्रीचे राहात जावे. प्रात:काली जलद तयार होऊन जात जावे. याप्रमाणें दोनच्यार दिवस मेहनत केलियास कार्य सिध होईल. दोन्ही फौजानी वाट धरित जावी; आगाडी बंद करावी; म्हणजे केव्हा तरी चालून घेईल. तेव्हा लडाई करावी. आज हतीस गोला लागला; आणि कही माणसे मेली. मोगल घाबरा जाहाला असेल. पुढे तजवीज आपण कोणती योजिली. इभ्रामखानाचे विचारे कोणती ते सविस्तर ल्याहावे. मोगल हलका दिसतो. सफेजंगीच्याच लडाईत बुडेलसे वाटते.

तीर्थरूप नानासाहेबाचे व स्वामीचे पुण्य मातबर आहे. ईश्वर यश देईल. वरचेवरी वर्तमान लिहित जावे. बहुत काये लिहीणे. दमाजी गाईकवाड व घोरपडे पावले. दमाजीची व बाबूजी नाईकाची टोली निराळी करून पछाडीस ठेवितो; म्हणजे दोन्ही फौजा जवळ राहावयास कामास येईल. हे विनंती.

¶*Raghoba's letter to Bhausaheb.*

No. 67] [*2-2-1760*

श्रीशंकर.

छ १४ जाखर

शनवार माघ सितैन.

* सेवेसी विज्ञापना पहिल्याने जुझावयाची आज्ञा आली होती. मग न उठावयाची आली. ऐसियासि स्वामीस जुंझच करणे तरी आगाडीस तोफा व सारे गाडदी वगैरे येखादा लहानसा ओढा पुढे देऊन सामान उभे करावे; आणि मार द्यावा. दोन्हीकडून दोनी फौजा उठवाव्या. मग जे ईश्वरे नेमिले आसेल ते होईल. वरकड लागभाग कोठे मिलता दिसत नाही. लाग असला तरी फौज असत नाहीं. यकूण विना स (फेजंगी[१]) * * * * * ची तर्तूद केलिया कसे काम होईल? फार स * * * न करणे; तरी जुंझ लागलियावरी तोफा काढून घ्याव्या. गाडदी सडे मात्र उभे राहून मार आगाडीस द्यावा. दोहीकडून फौजा उठतील असे केलिया मातबर जुंझ होईल. यात स्वामीचे मर्जीस येईल त्याप्रो॰ आम्ही शिध आहों. आम्हाकडे तिलतुल्य गुतां दोहीं गोष्टीचा नाहीं. स्वामींनी पुर्ता विचार करून करणे ते करावे. जर सफेजंगी करू नये असे असिल्यास च्यार महिने तरी जुझावे लागेल. हे विज्ञापना.

¶*Raghunathrao has been all along advising to give the enemy a crushing fight, otherwise the operations, he says, shall have to be continued for four months more.*

No. 68] [*Feb. 1760*

श्री.

† सेवेसी विज्ञापना. कालचा विचार कीं प्रात:काली तोफा घेऊन याव्या. फिरोन रात्री चिठ्या आल्या कीं, तुम्ही कहीवर जाणे. त्यास रात्री बुनगे न आले. यामुले लोक उपासी. घोड्यास दाणे मिलाले नाहीत. रात्री छेबीने पाठविले.

---

* म्सबंध पत्र राघोबादादाच्या हातचें. १ निकराची लढाई. † पत्र विंचुरकरांचें.

आम्हाकडील लोक याना या रात्री बाण देऊन, त्यांच्या गोटावर पाठविले. पाच बाण सोडले. आवई मात्र जाली. परंतु बाण काही कारगार जाले नाहीत. लोकास उजगारा पडला. बुनगे प्रात:काली आले. लोक जेवायास गुतले. दिवस चार घडी आला. कहीचा समये गेला. स्वामीची स्वारी आली तर बरे. नाही तर उदैक चौ घटका रात्री तयार होऊन गेलियास कही सापडेल. दिवस चढल्यास लाग नाही. आपली स्वारी येती की नाही लेखन करावयास आज्ञा करावी. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना. पथकापथकाचे लोक कहीवर निवडून हजार दोन हजार गेले असेत, हे विज्ञापना.

¶*Vithal Shivdeo's letter.*

No. 69]

(आरंभीचा बराच मजकूर कागद झडल्यामुळें गेला आहे.)

नाही. झाडून गाडदी व तोफा नाइकाबराबरी रवाना जाले. येक जातीनसी त्रिबक खंडेराव आहेत. याजकरितां येथेच ठेविले. दुसरी गाड्याची पथके दोन आहेत. ते दूर करावयाचेच आहेत. याजकरिता त्यास दूर करितो व त्याची समजावीसहि पडत नाही. यास्तव दूरच करावे लागतात. तोफेचा मजकूर तरी गाढ्याविना पाठवितां येत नाही. याजकरिता समागमे घेतली. कादर आगापासी येक तोफ आहे, ते पाठवावी. तरी गाड्याविना पाठवितां न ये. याजकरितां समागमेच घेतली. कलावे. * येक तोफ दीड दोन सेर गोल्याची कादर आगाचे तसलमातीस होती. तिला माघारी आपणाकडे पाठवावी, तरी नवा कोसाचे अंतर सोमवारी होते, ते आपले कूच आठ कोस जाहाले असें. आठ कोस (अपूर्ण)

¶*The writer Raghunathrao writes about the difficulty of transporting the guns.*

No. 70] [*6-2-1760*

श्री.

पौ.

पौ छ १८ जमादिलाखर

सेवेसी विज्ञापना. चिठी पाठविली. प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत जाहला. मोगलाची कही जाऊ न द्यावी म्हणौन आज्ञा. त्यास तेणेप्रमाणे फौजसुधा

---

* यापुढील मजकूर राघोबाच्या हातचा आहे, त्यावरून पत्र राघोबाचें होतें हें निश्चित आहे.

येऊन बसलों आहों. कहीचे लोकास बाहेर निघों देत नाहीं. येतात त्यास तार्कीद करून माघारे लावीत आहों. कारकुनासमागमे आज्ञा आली कीं, तुम्हीं व बाबूजी नाईक जेथे आहां तेथे राहाणे. त्यास आमचा मुकाम जेथे आहां तेथे करविला. सेवेसी विदीत होये हे विज्ञापी.

¶ *The writer suggests the forage parties of the enemy to be stopped.*

No. 71] [*Feb. 1760*

श्रीगणराज.

सेवेसी विज्ञापना. आज्ञेप्रमाणे आम्हीं प्रातःकालापासून तयार होऊन उभे आहों. यवनाचेहि कूच जाले. आजी मंगलवारी लागभाग पाहून सोय दिसेल तसे उठू. राजश्री आनंदरावदाजीकडील मजकूर कलला. आज्ञेसिवाये नाहीं. विदित होय. हे * विज्ञापना.

¶ *The writer appears to be Gopalrao Patwardhan.*

No. 72] [*Feb. 1760*

श्री.

आशिर्वाद[१] उपरी. आमचा मुकाम कालेगांव येथें जाला. येथून मोगल तीन कोस आहे. आपला मुकाम कोणे जागां किती लांब जाला? तेथून मोगल किती लांब आहे, ते लिहावे. उदईक आपण लौकरच तयार होऊन सर्व निकडील मिसलीचे लोकास तार्कीद करून लौकर येत ते करावे. रा। दमाजी गायकवाड यांस ही चिठी पा।. आज ते पुरते उभे नवतेसें वाटतें. याकरितां तार्कीद करावी. याउपरी बच्यार्जी विश्वनाथ या समागमें कांहीं ऐवज तीर्थरूपांनीं रवाना केला आहे. त्यास ते तरेचे सुमारे आले आहेत. याकरितां आपण पाचसातसें राऊत पाठऊन ऐवज आपणाजवळ आण * * * आलियावर मग इकडे रवाना करावा. राजश्री तुकोजी सिंदे आले. तेही आपले दम्करांत आहेत. त्याम पुसिलें म्हणजे बच्यार्जीपंताचे वर्तमान ठीक सांगतील. पुसोन रातोरात पाचसातशे राऊत रवाना करावे. *सखारामपंताचा घात जाला. समाधान करावें. आम्ही लांब आहों. आटोपून सकाळच येऊं, आशिर्वाद.

¶ *Bhausaheb asks the whereabouts of the army of the enemy and requests more contingents to be sent to him. He also consoles Sakharampant Panse (?) for the loss he sustained in the death of Keshavrao Panse on the field of Udgir.*

---

१ पत्र भाऊसाहेबाचें. कोणास? * हा सखारामपंत केशवराव पानसे याचा पुतण्या कीं काय?

No. 73] [*Feb. 1760*

श्री.

सेवेसी सटवोजी जाधवराऊ विज्ञापना ऐसीजे. आजी रात्रीची चौकी हुजूरचे पुढे उजवे बाजूने बुनर्गायाचे दरमियान ठेऊन खबरदारी करणे म्हणून आज्ञा. त्यास काल आपण जेथे बसलो होते त्याच्या उजव्या हतेच चौकी बसवितों; आणि नित्य दोन छबिने पाठवीत असतो. खबरदारीस आतर करीत नाही. हे विनंति.

No. 74] [*Feb. 1760*

श्री.

* विनंती उपरी. आम्ही दोन कोस आलो आहों. येथून मोगलाचे लस्कर कोस दीड आहे. चौक्याहि जागा जागा बसविल्या आहेत. जवळ बाण टाकाव-यासीहि पाठविले आहेत. प्रात:काळी भोजनोत्तर सत्वरच यावयाचे करावें. बुनगे तेथेच तयार असूं द्यावे; तो आम्ही मोगलाचे कूच मुकाम प्रात:काळीं लेहून पाठ-वितो. आपण राहिले आहेत तेथून मोगलाचे लस्कर तीन साडेतीन कोस लांब आहे. त्यामध्यें वेढे खोडे फारच आहेत, हे विनंती.

¶*The whole letter is in Nana Purandare's handwriting.*

No. 75] [*Feb. 1760*

श्रीशंकर.

* सेवेसी विज्ञापना. तोफेचे लाग फार दिसतात, आणि तोफा नाहींत तरी लौकर पाठवाव्या. कांही चिता नाहीं. न पाठविल्या तर तितकेच काम उणे पडते. जसे स्वामीचे चितास येईल तसे करावे. हे विज्ञापना.

¶(*Raghunathrao's letter.*)

No. 76] [Feb. 1760

श्रीमार्तंड भैरव जीतु (जयतु) प्रा.

*विनंती उपरी प्राथकालीच पत्र आपणाकडे पा॥ त्यावरून ध्यानास येईल. बहुतेक आपण कूच करून आज वाडीवर जातील. आपण गेले म्हणजे आम्ही जातेगावीहून कूच करून कनलीकर सुधा डोंगरात जातो. कळावे. मुकाम नेहमीच होईल. कालचे वर्तमान आपणाकडील काय ठार कोणी जाया जाले म्हणून वर्तमान आहे. काल आमचे लोकानी दाटी करून खिडकीपर्यंत गेले. मागे फिरते समई व आणिक लोक जातां दोन तीन जाया जाले. कळावे. कृष्णाजीपंताचे पत्र पा॥ आहे. पावेल. आपले कडील व वरचे सविस्तर ल्याहावे. श्रीमंत दादासाहेब कूच करून कोठें आले हे ल्याहावें.

No. 77[[Feb. 1760

सेवेसी विज्ञापना. स्वामीनी चिठी पाठविली ते पावली. उद्यापासुन दोन हजार फौज मोगलाच्या नमुदास[1] प्रातःकालीच पाठवीत जावी, म्हणोन आज्ञा. ऐसीयास आज्ञप्रमाणे प्रातःकालीच दोन हजार फौज मोगलाचे नमुदास रवाना करितों. प्रस्तुत छविन्यास दोन हजार फौज चिरंजिवास पाठविलें आहे. सेवेसी श्रुत होये, हे विज्ञापना.

No. 78]

श्री.

सेवेसी विज्ञापना. गणतीबद्दल कारकून आले. निमे गणत्या जाल्या. तो हूल पडली. त्यामुळे कारकून पळोन गेले. आम्ही त्यास सांगितलें कीं आवाई लटकी आहे. प्रहरभर राहून गणती घेणें. परंतु ते आपली घोडीपीढी सांभाळावयास गेले. फौज मागून पुढून जमा जाले म्हणजे फौज घेऊन येतो. अजमासहि पाहावा. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶(*Vithal Shivdeo's handwriting.*)

---

[1] मुकाबल्यास.

No. 79] [3-2-1760

श्री.

पौ छ २० जमादिलाखर

माघ सितैन.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान साहेबाचे
सेवेसी

विनंती सेवक मोराजी शिंदे मुकाम राजपुरी. चरणावर मस्तक ठेऊन शिर साष्टांग दंडवत विनंती विज्ञापना. ताा छ १९ जमादिलाखर पावेतों साहेबाचे कृपादृष्टी करून सेवकाचें वर्तमान यथास्थित असें विशेष. साहेबाचें अज्ञापत्र छ ७ जमादिलाखरचें सादर जालें. तेथें आज्ञा जे मोंगल उदगिरीवरी आहे. त्याचें लष्करावरी सरकारच्या तोफा लागूं होऊन पौष्य वद्य द्वादशीस मंगळवारी तोफाचा मार दिला. गोले सलाबतजंगाचे डेऱ्यापुढें जाऊन माणसे, घोडी, बैल जाया जाहाले. तेव्हां त्यानी डेरे उपटुन पलीकडे नेलें. मार तोफांचा न राहीच, तेव्हां त्याजकडील गाडदी पुढें आले. मग सरकारचे इभ्रामखान वगैरे गाडदी त्याजवरी चालून गेले. गाडद्या गाडद्यांची लढाई जाली. इभ्रामखान यांणीं फारच दम धरून टहरून[1] लढले. झुंज बरेंच जाहले. त्याजकडील शे सत्राशे गाडदी जखमी व ठार जाहाले. पांच सात जमातदारही त्याजकडील चांगले पडले. सरकारचेही दोनशे पावेतो गाडदी जखमी व ठार जाहाले. च्याळीस पनास जाहले. प्रस्तुत मोगल किल्ह्यावर आश्रा करून विचारात पडला आहे. दाणा वैरणीचे संकट त्यास आहे. याप्रकारचें वर्तमान आहे, म्हणोन आज्ञापत्र सादर जाहले. त्यास साहेबाचे पुण्ये प्रतापेकरून शत्रु पराभवाते पावतील. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञापि.

¶*The letter describes the havoc played by the artillery under Ibrahimkhan into the enemy's camp, and also the precarious condition of the enemy.*

No. 80] [7-2-1760

श्रीगजानन.

सेवेसी विनंती. सेवक मल्हार चितामण वाघ सां नमस्कार विनंती. येथील क्षेम ताा छ १९ जमादिलाखर च्यार घटका रात्र मुाा आले सरकारची पत्रे सलुख्याची रदबदली लागली म्हणौन व येथून कूच जालियाउपर हला करावी

---

१ गाडून उभे राहून.

लागते. तर जलदीने आज यऊन पोहचणे म्हणौन आज्ञा. यैशास आज्ञापत्र सादर होताच कूच करीत होते. परतु च्यार घटका दिवस राहिला. याजकरिता मुकाम केला. उदईक प्रहर रात्री कूच करून दर्शनास येणार. बिघाड आसावा. आपले चाकरीचा मजुरा घडावा. यैसे इच्छा फार आहे. आज तमाम लोकास ताकीद केली आहे. सामाने बाधोन आपलाले मि..............सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना..................जी बावा चौ कोसावर परलीचा घाट चढोन आले; म्हणौन वर्तमान येथे आहे. हे विज्ञापना.

¶ *Wagh writes news of Janoji Bhonsle's movements to Sadashivrao.*

No. 81] *[7-2-1760*

श्रीगजानन.

पौ छ २२ जमादिलाखर

सेवेसी विनंती. सेवक मल्हार चिंतामण वाघ कृतानेक सां नमस्कार विनंती विज्ञापना. येथील क्षेम ता माघ वद्य ६ गुरुवार संध्याकाल मुा जोगाईचे आंबे स्वामीचे कृपेकरून वर्तमान येथास्थित आसे. यानंतर आज्ञापत्र सादर जाले. तेथे आज्ञा जे विसा कोसाची मजल करून लौकर येऊन पोहचणे. यैशास आज्ञेप्रमाणे लाब लाब मंजली करून मुा मजकुरास. आले. उदईक प्रहर सा घटका दिवसांत सेवेसी येऊन पोहचतात. फौजेत धमक फार आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना. हे जुझ मातबर जाले. सल्यावर गोस्ट पडली. आपण समयास आंतरलो म्हणौन बहूत सर्द जाले. ईस्वर बिघाड करून आमची उजागरी करील तर उतम आहे, म्हणौन हे इच्छा करितात. यास यैसा प्रकार घडोन येईल, यैसा भरवसा नवतां. गुदस्ता याचे त्याचे. जुज जाले होते. त्याचे मर्दुमीचीच तारीफ करीत होते. परतु स्वामीचे पुण्य समर्थ. येणे करून सर्व कल्याणरूप होऊन येत. हे विज्ञापना.

¶ *The writer describes the attitude of the Bhonsle brothers.*

No. 82] [7-4-1760

श्रीगणराज.

छ २० साबान चैत्र सितैन.

राजेश्री गोविंदराव तात्या स्वामीचे सेवेसी.

पो गोपाल गोविंद नमस्कार विनंती उपरी. आजी सोमवारीं च्यार घटी रात्री किले दौलताबादेत सरकारचे लोक मांकोट दरवाजीयांत गेले. रात्र जाली. आंतील लोक निघून पावले. यास्तव दरवाजीयांत ठेविले. प्रातःकालीं आंत जातील. मुख्य किला स्वाधीन जाला. याउपर कांहीं गुंता नाहीं. मुख्य माहाकोट दरवाजा आमचे स्वाधीन जाला. बहुत काय लिहिणे ? हे विनंति.

¶*Capture of the fort Daulatabad, communicated by Gopalrao Patwardhan to Govindrao Limaye Khasgiwale.*

No. 83] [11-2-1760

श्री.

चिरंजिवाचे पत्राची

नकल छ २९ जाखर

सेवेशीं विनंति. दौलताबाद किला नवाबाजवळून करार करून घेऊन किलेदारास पत्र नवाबाचे मोहरेनसी घेतले. तेच पत्र सेवेसीं पाठविलें आहे. घ्यावे आणि राजश्री गोपालरायासारखा शाहाणा माणूस लोक देऊन पाठवावे. किलेदारास परवाना द्यावा आणि लोक किल्यांवर चढवावे. येथे नवाबापासी तिलमात्र गुंता राहिला नाहीं. जाजतीं जागिरीचा कुन्हा[1] मध्यस्तासीं असा नवाच काढून बोललों कीं पंचेतालीस लाखाची जागीर कबूल केलीत. परंतु आमची चौथाई वजा करून पंचेतालीस भरून द्यावे. याप्रमाणे नेटी लाऊन जाबसाल केला. तेव्हा हाहि प्रकार कबूल जाले. पंधरा लाख जाजती जाहालें. येकूण साठ लक्ष करार जाहाले. यों साठ लक्ष करार जाहाले. हे जाजती व्हावयास कारण हेच कीं विठल सुंदर नवाबाजवळून बरतरफ करवीत होतों. तेव्हा विठल सुंदराचा पेगाम[2] बजीद होऊन आला कीं सर्व प्रकारें पदरचा आहे. कृपा करावी. चांकरी करून दाखवीन. पुढें सर्व प्रकार निष्टेने वर्तणूक करीन. यैसे बोलू लागले. तेव्हा ही नवीं जागीर जाजती, हा चौथाईचा कुन्हा ठेऊन पंधराची कबूल करविली. व दौलताबाद

---

१ कुन्हा = खोंच, कपट. २ बोली.

किला घेतला. येणेप्रो॥ करून विठलपंतानी निजामअलिखानापासीं राहून आमचे मर्जीप्रो॥ वर्तणूक करावी. चालावे. तिलमात्र अंतर पडू देऊ नये. याप्रो॥ शफतपूर्वक केलें. तदोतर विठलपंतास निजामअलिखानापासी राहाविले. येविसी निजामअलिखानाची रदबदल दाट होती, यैकाविसी जाहाली, व आपले कांहीं जाजतीं चांगलें जाहाले, यास्तव केलें सविस्तर स्वामीस कलावें. किलेदारीची सनद मागाहून पाठवितों. तूर्त इनायेतनामा[1] पाठविला आहे. हा पुढे पाठवावा व लोक पाठवावे. रा छ २३ जालाखर. हे विनंति. किल्याच्या आसाम्या येथे नेमल्या आहेत. यास्तव तेथे कोणास देऊ नयें. आसेर, बरानपुर, मोले येथील (स) नदा देऊन, बच्याजीपंतास हजार फौज करोन रा केलें. विज्यापुरची सनद नागोरामांस बसलतजंगाकडें हजार फौजे देऊन पहिले रा केलें. त्याकडे रा परवाना पाठविला कीं जागा खाली करून देतों. पंचेतालीस सिवाय चोथायात पंधरा होतात. दाहाचे बोलोनच आहे. पंधराचेही होईल. परंतु सेवटी जालियावर सेवेसी लिहून. हे विनंति.

¶ *Sadashivrao writes to the Peshwa the terms of the treaty that he had offered to Nizam.*

No. 84] [*13-2-1760*

श्री.

पौ छ २५ जमादिलाखर
मितेन.

रावसाहेब मेहरवान मुखलीशान सलामत.

छ बादज शौक मुलाकात बाहजत आयातमशहूद खातरबाद येथील खैरसला जाणून आपली खैर आफियत हमेशा लिहून दिल ताजा करीत असावे. दिगर छ १७ जमादिलाखर रोजी वर्तमान एकिलें जे श्रीमंत भाऊ साहेबी आपणच मोगलाचे लशकरात युध्याचा प्रसंग केला. त्यास कितीक हातीनसीन सरदार तिकडील दस्तगीर जाले. बहुत उत्तम प्रकारें श्रीमंताचे लोकांनी फते केली. यासी श्रीमंताचा प्रताप महिमा ऐसा आहे कीं जिकडे सरकारची फौज जात आहे तिकडे फतेच होऊन येती. ज्या कामावर आपण खुद बदवलत कमरबंदी केली असेल तेथ फते[2] हात जोडून तिष्ठत उभी राहील. हे वर्तमान ऐकोन चितास बहुत खुशी हासील जाली. ईश्वर हे फत्तेची खबर सर्व खैरखैवा[3] लोकास मुबारक

---

१ आज्ञापत्र, शिफारसपत्र. २ विजय.
३ खैरखवा=खुशाली. खैर आफियत=खुशाली.

करो. आपणाकडील वर्तमान लवकर कळत नाहीं यास्तव चित चिंताग्रस्त असते. तर सविस्तर आपले खैर आफियतचे वर्तमान पाठवीत असावे, की चिताचे समाधान होत जाईल. ज्यादा काय लिहिणे. प्यार मोहबत असो दीजे. हे किताबत.

¶*The writer, a Muhammadan, congratulates the Peshwa on the success at Udgir and praises the bravery displayed by Bhausaheb.*

No. 85] [*15-2-1760*

श्री.

छ ९ रजब सीतैन

श्रीमत राजश्री भाऊसाहेब स्वामीचे सेवेसी. विनति सेवक राघो बापूजी कृतानेक साष्टाग नमस्कार विनति विज्ञापना. येथील वर्तमान छ २७ जाखर मुा नजीक आबड स्वामीचे कृपेकडुन येथास्थित आसे. यानतर श्रीमत राजश्री नानासाहेब याणी प्रो माारचे जमीस फौजसुधा पां आहे. त्यासी येथे येऊन येथील जमीचा फडशा रा पाडुरग सिवदेव याचे मारफतीने वाइघाने उरकिला आहे. त्यास मौजे पाटोदे प्रो आबाड येथील (पाटील) रा मुधोजी भोसले सेनाधुरंधर याणी गावमाारास घासदाण्याचा रोखा करून धरून नेला आहे. त्याजकडे घासदाणा रु. ४०० चारसे करार करून गावास जासुद वसुलास पाा आहे. आणि पाटील माार यास वोलेस लस्करात ठेवले आहे. त्यास येथे गावकरी सदरहु रुा मजुरा मागतात. येतदविशी पाटील माारास सोडून द्यावयाची व रुा न मागणे म्हणून आज्ञा करणार स्वामी धणी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञप्ति.

¶*The writer Ragho Bapuji is deputed to take possession of the province of Ambad by the Peshwa. He complains against Mudhoji Bhonsle arresting the Patil of the place, and asks for his release.*

No. 86] [*16-2-1760*

श्री.

पाो २८ जमादिलाकर

सितैन माघ शुक्रवार.

श्रीमंत माहाराज राजश्री भाऊसाहेब स्वामीचे चरण सेवेसी. सेवक आज्ञाधारक सिवराम आनंदराव सांा नमस्कार विनंती उपरी. काली नवाबाकडील जासूद--

माहालात सहज वर्तमानास्तव गेलो होतो. ते स्थली आमचा श्नेहस्त खंडोजी ना याची भेटी जाहली. त्यासी आपण विचारिल कीं श्रीमंताची व नवाबाची सांप्रती बोली चालीचा प्रसंग सिध्धांत जो करार जाहला आहे ते गोस्टी करार वाके चालेल की न चालेल. तुमचे द्रीस्टीस कैस दिसतें; म्हणोन विचारिल असतां त्यानी उतर दिल्ह कीं मोगलाची जात काबूची. समयें पाहोन लेकी (खी?) देऊन घात करणार. त्यानी वेलावर द्रीस्टी देऊन तुम्ही जे मागतील ते गोस्टी त्यानी कबूल जाहाले आहेत. सेवटप्रांत होणार नाहीं. तीघ भाऊ येक जागा होऊन, मराठी फौज रा जानबा व वेंकटराव व खंडागले वगैर अमीर लोक बिछेडले[1] आहेत, त्या आवघ्यास मिलवोन घेऊन मागतां येकदां हरशामृश करतील; हे गोस्टी निजामअलीखा याचे चिती आहे. बोलोन दाखवीत नाहींत. होणार जे असल तें चुकत नाहीं. परंतु रंग येसा दिसोन येतो. ईस्वराचे चित्तीं जे असेल ते होईल. याप्रमाणें बोली आइकली; आणि बशालतजंगाचे वर्तमान तरी आलंद व गुंजोटी विध्वंश करीत अवशाकडे * * * * आहेत; त्यासमागमे पठाण व मुरापुरचा बेडर आहे, आणि मावोन रा मुरारजी घोरपडेहि आले म्हणोन बोलवा आइकली. दाहा बारा हजार फौज चागली, व गारदी प्यादे दाहा हजार, व तोफ लहान थोर ४०, व जेजाला तीन च्यारसे, सामान चागल आहे, म्हणोन बोलवा आइकली. सेवेसी कलावें म्हणोन लिहीले अस. स्वामीचिथे[2] वर्तमान वरचेवर येत असल. सेवकान आइकील ते वर्तमान सेवेसी निवेदन करावें लागतें. रा जाधवराव यानी परवा घोडी व हती गुलामअली कर्जदाराचे भरीस दिल्हा म्हणोन लिहील होते, त्या गोष्टीचा शोध घेता वर्तमान आइकिल की माहाराज त्याचे भेटीस येणार. भेटीस आल्यानंतर तो हती करितां भीड पडलिया देण लागल. यास्तव लटका कर्जदार उभा करून, पागाचे सात आठ घोडी चांगली व हती गुलामआली पठाणाकडे ठेविले; आणि निजामअलीखा यानी येक हती थोर जाधवराव यासी पाठविला आहे. कही कबाड बैल घोडी आजी मागती राजश्री बाबूजी नाईक याचे गोटाकडे लस्करचे लोक गेले. रस्त तो रोज बरोज येत जाते. सेवेसी कलावे. महाराज पुण्यश्लोकी. आपण सेवक पदरचे असो. आपल वर्तमान सेवेसी विदित आहे. हे विनंती.

¶*News-letter from a spy sent by the Peshwa into the Nizam's camp. The ultimate result of the campaign turned out to be as hollow as this spy forecasted.*

---

१ विघडले. २ स्वामींचे येथें.

No. 87] [20-2-1760

श्री.

पौ छ ९ रजबू सितैन
फाल्गून.

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब
स्वामींचे सेवेसी.

विनंती सेवक रामचंद्र कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ २ माहे रजब माा लस्कर नवाब बसालतजंग नजीक कल्यान जाणौन माहाराजानी निजानदवैभवलेखनआज्ञा करीत असिले पाहिजे. यानंतर माहाराजानी श्रीमंत राजश्री नानासाहेब यास पत्र दिल्हे. त्याजवरोन वस्त्रे व पालखी वगैरे देऊन पत्रे लिहून दिल्ही की, यास तुम्हाकडे वकिलीस पाठविले आहेत. जो जाबसाल करीत जाल तो यासी करणे. ऐसीयास सेवक कूच दर कूच येऊन राजश्री नागो राम याच्या लस्करात कल्यानाहून साता कोसावर आहे. तेथे उतरलो. तो छ १ माहे मजकुरी च्यार घटी दिवस राहिला ते समई माहाराजाची पत्रे व खलिता नवाबास आला. ते पत्रे राजश्री नागो राम यानी दाखविली, व म्हणाले की, आताच जा व मुलाजमतहि करा; आनि सनदा द्यावयाविशई काय जाबसाल करितात? माहाराजानी लिहिले की जलद सनद करोन पाठवने. त्याजवरोन पाच राऊत समागमे वेऊन च्यार घटका रात्रीं नवाबाची भेट घेतली. पुढे नवाबाजवळ सेवक आला नव्हता. तेव्हा राजश्री भवानजी ताकपीर व धोंडो आगदेव हे पाठविले होते. त्याचीहि मुलाजमत जाली होती. माहाराजानी लिहिले त्याप्राा सविस्तर मजकूर केला. आणि सनद विजापूरची तयार करोन घेतली. आनी राजश्री नागो राम याजकडे राजश्री धोंडो आगदेव याचे हवाला करोन पाठविली. माहाराजास कलावे. कोनी मातबर मानूस सेवेसी पाठवितो म्हणोन बोलले. कोण मुकरर करून पाठवितात त्याप्राा लिहीन. सविस्तर वर्तमान माघून लिहितो. येथे फौज तो सात हजार गाडदी व पाच हजार फौज गुलाम मोहेदिनखान व राजे ब्रिजनाथ व दोन हजार खाजगत येकून सात हजार श्वार आहेत. व तोफ बासष्ट आहेत. कलावे. येथे वर्तमान आहे कीं, सलाबतजंगाचे व याचे मानस येक आहे. याची त्याची भेट होणार. हे येका दो रोजानी कूच करोन सिरसीस तेहि येणार व हेहि जाणार. ऐसे वर्तमान आहे. पुढे जे होईल ते सेवेसी लिहीन. बहूत काये लिहीणे. हे विज्ञापना.

¶*Letter of Ramchandra Krishna to Bhausaheb acquainting him how the Nizam gave a pledge in writing to hand over Bijapur to the Marathas.*

No. 88] [20-2-1760]

श्रीविठलराज.

छ ५ *जाखर सितैन

श्रीमंत महाराज राजश्री भाऊसाहेब
कृपासागर स्वामीचे सेवेसी.

आज्ञाधारक त्रिंबक जगंनाथ सां नमस्कार विज्ञापना ऐसीजे. येथील वर्तमान ताा छ ४ माहे रजब मुकाम किले धारूर माहाराजांचे प्रतापे-येथास्थित असे विशेष. छ ३ माहे मजकूरी राजश्री हणमंतराव निंबाळकर यांस येवनाकडे वकील आहेत त्यांची पत्रे आलीं. त्या * * * * * लिहिला आहे कीं चिंचोलीवर नवाबाचा मुकाम आहे * * * * * सल केली. येथूनच कूच करून अवसी याचे रोखे भागानगरास जानार आहेत. भालकीपर्यंत गेलियावर जाधवरायास निरोप देऊन आपण स्वस्थानास जावें. जाधवराव वकिलासी बोलले कीं राव येथें आले असते तरी त्यासी व नवाबासी आपन गोडी करून देतों. वकिलानी त्याचा जौब दिधला कीं आमचे येजमानाचे वाकडे काय आले कीं आपन गोडी करून द्यावी. पूर्वी नवाबास भीमातीरीं वेढा पडला होता त्या वर्षी आपन आले नव्होतेन. तैसेच राव धारूर पावतर आले. पुढे येयाचा प्रसंग दुर्घट देखिला. तेथेच मुकामान केले. हे वर्तमान ऐकून राव निंबाळकर वकिलाचे जौबसालावर बहुत समाधान पावले. व त्यांस उतर लिहून पाठविले कीं तुम्ही जाधवरायासी जौबसाल यथास्थित केला. छ मजकूरी राजश्री हणमंतराव निंबाळकर यांची मातोश्री व पांच कुटुंबे येथें येऊन पोहोचली. राजश्री लक्ष्मणराव खंडागळे हे येथे आहेत. माहाराजांचे सेवेसी विनंतीपत्र पाठविलें असे. त्याचीं उतरे यावयाची मार्गप्रतिक्षा करितात. राजश्री गणपतराव सबनीस व महिपतराव शंकर येथें आले. रायांची व त्यांची भेट करऊन त्यांचे समागमे राऊत देऊन वाटे लाविले. विशेष काय लिहिणे. हे विज्ञाप्ती.

¶*The writer gives some idea about the attitude of Nimbalker and Jadhao after the negotiations.*

---

* पैवस्तीचा महिना चुकीचा दिसतो.